साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास........................०४

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...,, 8 as
Single copy ................ ....... ... 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 1 FEBRUARY 1897 | NO 5

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८९७ इ० | अंक ५

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षीत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मार्गे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला ०।७।९६. } R. Aitken Agent

## नोटीस.

तीा० रा० रा० झामसिंग वल्द लछीराम, व ठाणसींग वल्द लछीराम राहणार खोलखेड तालुके खामगांव जिल्हे अकोले यांस.

नोटीस देणार बेनिसींग वल्द गोंडीसींग व रामसींग वल्द गोंडीसींग राहणार खोलखेड तालुके खामगांव जिल्हे अकोले. नोटीसीनें असें कळवितों कीं, आजपावेतों तुह्मी व आह्मी एकत्र होतो. व आपण सर्वांनीं मिळून व वडिलार्जीत स्थावर जंगम इस्टेट संभाळून वडिल: मागे, रोखीचा, व धान्याचा वगैरे सर्व प्रकारचा व्यापार करून सर्वांनीं मिळून आजपावेतों वडिलार्जीत स्थावर जंगम इस्टेटी शिवाय आपण सर्वांनीं आणखी ज्यास्त जिनगी मिळविली, कोणाचे ही फुटकी कवडी देणें नाहीं, परंतु कांहीं कारणामुळें तुमचे आमचे जमत नाहीं. व आतां आह्मांस तुह्मांपाशी कोणच्याही प्रकारानें राहणें नाहीं करितां तुह्मांस ही नोटीस दिली आहे तर नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत वडिलार्जीत व आह्मी व तुह्मी मिळून संपादन केलेली स्थावर जंगम इस्टेट व रोकडीचा व गल्याचा वगैरे व्यापार या सर्वांची वाटणी रीतसीर करून निकाल करावा असें झालें नाहीं तर रिती प्रमाणें कोर्टांत काम चालवून सर्व प्रकारचा खर्च ह्या नोटिसी सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जो होईल तो सर्व तुमच्यावर पडेल हें तुह्मांस अगोदरच कळविलें आहे. ह्मणून दिल्ही नोटीस सही ता- २७ माहे जानेवारी सन १८९७ इ.

(सह्या) सह्याच्या निशाण्या वखर. बेनीसींग वल्द गोंडीसींग व रामसींग वल्द गोंडीसींग राहणार खोलखेड यांच्या हातच्या असेत.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ३० शके १८१८

गेल्या २४ वे तारखेस वऱ्हाड स्टांडिंग कांग्रेस कमिटीच्या आश्रयाखालीं उमरावतीस एक मोठि सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं राव साहेब देवराव विनायक हे होते. या सभेच्या निमंत्रण पत्रिकेतच सभेचा उद्देश व भावी कर्तव्य या विषयीं उत्तम खुलासा केला आहे तो असा:—

"सन १८९७ सालची राष्ट्रीय सभा भरविण्या संबंधानें व्यवस्था करण्याची पाळी मध्य प्रांत व वऱ्हाड यांची आहे. वऱ्हाड प्रांतांत यंदा अवर्षण असून मध्य प्रांतांत तर मोठा दुष्काळच आहे, तेव्हां यंदा सभा दुसऱ्या एखाद्या प्रांतांत होऊन, सन १८९८ सालीं स्थिति जास्त अनुकूळ होण्याची आहे, त्या वेळीं इकडे सभा होईल तर बरें, असें मध्य प्रांत व वऱ्हाड यांतील प्रमुख मंडळींचें ह्मणणें होतें परंतु इतरही प्रत्येक प्रांतानें ही दुष्काळाची सबब पुढें आणिली तेव्हां मध्य प्रांत व वऱ्हाड यांसच सन १८९७ सालच्या सभेची व्यवस्था करण्या संबंधाचें आपलें कर्तव्य कबूल करणें भाग झालें. कित्येकांचा असा गैरसमज झाल्याचें दिसतें कीं सध्यां नागपूर प्रांत व वऱ्हाड यांची पीकपाण्या संबंधानें स्थिति कशी आहे इकडे पूर्णपणें लक्ष न देऊन पुढील राष्ट्रीय सभेची व्यवस्था इकडे करण्याचें कबूल करण्यांत आलें आहे; तरी वस्तुतः प्रकार तसा झालेला नाहीं.

आतां मध्य प्रांत व वऱ्हाड या पैकीं कोणते प्रांतीं यंदाची सभा भरवावी हा प्रश्न आहे. व या बाबतींत विचार करितां सहजच दिसून येतें कीं सन १८९१ सालीं या दोन प्रांतांनीं मिळून राष्ट्रीय सभा केली तेव्हां ती मध्य प्रांतांत ( नागपूर येथें ) भरली होती व व्यवस्थेचा बहुतेक बोजा मध्य प्रांताचे मंडळीवर पडला होता, तर हें योग्य आहे कीं यंदाची सभा वऱ्हाड प्रांतीं होऊन तिची व्यवस्था वऱ्हाड प्रांतांतील लोकांनीं करावी. राष्ट्रीय सभेच्या बैठकीची व्यवस्था करणें यांत एक प्रकारचें शिक्षण मिळतें. व ही व्यवस्था वऱ्हाडच्या लोकांनीं केल्यानें त्यांची व्यवस्थाशक्ति, व राष्ट्रीय सभेकरितां सर्व वर्षभर काम करण्याची पद्धतशीर रीत या परीपक्व स्थितीस येण्यास मोठी मदत होईल. वऱ्हाडांत सभा भरल्यास अर्थात वऱ्हाडांतून जास्त प्रतिनिधि व प्रक्षेक सभेकरितां येतील व त्या योगें अर्थातच राष्ट्रीय सभेची माहिती प्रांतांतील लोकांस जास्त होईल; तसेंच, आपले प्रांतांत सभा होत आहे असें लोकांस दिसून आलें ह्मणजे ते वर्गणी जास्त उत्सुकतेनें देतील. तरी लोकांच्या उत्सुकतेचा या वेळी उपयोग करून घेणें चांगलें आहे. अवर्षणाच्या काळांत वर्गणी जमा करणें किती कठीण आहे, प्रांतांत काम करण्यास उत्सुक अशी मंडळी किती कमी आहे, व सभेच्या बैठकीसाठीं अवश्य लागणाऱ्या साहित्याची अनुकूलता वऱ्हाडांत किती कमी आहे, हें दिसत नाहीं असें नाहीं. तथापि या अडचणी ह्मणजे अगदीं दुर्निवार्य आहेत असें नाहीं. सर्व वर्षभर पद्धतशीर रीतीनें अंगास झीज लावून काम करण्याची आस्था ठेविली तर खात्रीनें या सर्व अडचणी दूर होतील."

रा० सा० देवराव विनायक यांनीं राष्ट्रसेवा करण्याविषयीं मोठ्या अंतःकरणपूर्वक व कळकळीनें सर्व मंडळीस प्रोत्साहन दिलें. पुष्कळशी भवति न भवती झाल्या नंतर अखेरीस उमरावतीस १३ वी राष्ट्रीय सभा भरविण्याचा सर्वांचा संकल्प ठरला.

रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं सूचविलेकीं स्वागत मंडळींत १०० पेक्षांकमी गृहस्थ नसावेत. स्वागत- मंडळींत शेरीक होण्यास वर्गणी ५० रुपये किंवा आधिक रुपये दिली पाहिजे. आणि विद्वत्ता, राष्ट्रीय सभे विषयीं सेवादक्षता किंवा इतर गुण या बद्दल वेळो वेळ जिल्हा कमिट यांनीं योग्य गृहस्थांच्या शिफारसी कराव्या. ही सूचना पसार झाली.

स्वागत-मंडळी निवडून नेमण्या पूर्वी सध्यांच्या चालूं तुर्तातुर्त कामा सांठीं एक निराळी १००।१२५ इसमांची मंडळी नेमण्यांत आली. तिचे मुख्य अंमलदार- येणें प्रमाणें:-

| हुद्दा. | रा० रा० |
| --- | --- |
| अध्यक्ष— | गणेश श्रीकृष्ण खापर्डे |
| उपाध्यक्ष— | देवराव विनायक |
| | बाळाजी नरसिंह मुधोळकर. |
| चीटणीस— | रंगनाथ नरसिंह मुधोळकर. |
| | बाळकृष्ण हरी करंदीकर |
| खजिनदार— | प्रल्हाद नारायण जोग. |
| हिशेबनीस— | विश्वनाथपंत काळे. |

वर्गणीची वांटणी जिल्हेवारीनें येणें प्रमाणें ठरविण्यांत आली आहे:—

| नांव | रक्कम हजार रुपयांत |
| --- | --- |
| उमरावती | १० |
| आकोला | ७ |
| वर्णी | २ |
| इलिचपूर | २ |
| वाशिम | २ |
| बुलढाणा | २ |

दुष्काळ—पाहिलें पीक तर बहुतेक बुडालें. रिलीफ कामावर आजच लाखों लोक लागले आहेत व दर आठवड्यास त्यांची संख्या अधिक होत आहे. कोणताही देश धुळीस मिळण्यास तीन कारणें असावी लागतात. एक दुष्काळ, दुसरें लढाई व तिसरें ह्मटलें ह्मणजे रोग. सध्यां आपले देशांत तीनही आहेत ह्मटल्यास वावगें होणार नाहीं दुष्काळानें तर सर्वच कहर उडवून दिला आहे हें प्रत्येकांस अनुभवानेंच कळत आहे. लढाई, चित्रळ स्वाकीन वगैरे वरच्या निष्कारण मोहिमीचा खर्च अन्यायानें हिंदुस्थानावर लादलेलाच आहे. रोगानें मुंबई सर केली व आतां जमीन दोस्त करून पूर्ण जयश्री मिळविण्याचे तयारींत आहे, व तेथून राजधानींतून पुढें सर्वत्र हिंदुस्थानांत आपला अंमल गाजविण्याचा क्रम सुरूं आहे.

तरी पण आपण अगदीं निराश होऊन स्वस्थपणें बसणें योग्य नाहीं. होईल तसें संकटाचें निवारण करण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. लढाई वगैरे संबंधानें सरकारास अर्ज वगैरे करून दाद मागितली पाहिजे. रोगासंबंधानें स्वतःची राहणी स्वच्छ ठेविली पाहिजे. व दुष्काळाचे निवारण करण्यास आपले धान्याचा सांठा जतन करून ठेवावा, व जरूर लागेल तसा परदेशांतून धान्याचा पुरवठा करून घ्यावा. आतां आपलेंच मूर्खपणानें धान्याचा सांठा तर शिल्लक राहिला नाहीच. व त्याचा परिणाम हजारों गरीब लोक खाण्यास न मिळाल्यामुळें खुद्द सरकारच्या ( पुअर हाऊस ) अन्नछत्रा मध्यें प्राणास मुकत आहेत त्यावरून व्यक्त होत आहे. आतां दुसरा मार्ग ह्मणजे परदेशांतून धान्य आणणें, व ह्यासाठीं पैसा जमविणें परंतु पैसा जमविण्याचे आधीं धान्य कोठें कोठें व किती मिळेल ह्याबद्दल माहिती आधीं असणें अवश्य आहे. कारण पैसा विपुल जरी असला तरी धान्यच नसल्यावर त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें उघड आहे.

हिंदुस्थानांत सामान्यतः तांदुळ ज्वारी बाजरी, हरबरा, गहूं , सांतू, मका . व राजगिरा ह्या धान्याचा उपयोग खाण्याकडे करितात. त्यां पैकीं ज्वारि, बाजरी, राजगिर वगैरें हीं हिंदुस्थाना बाहेर . कोठें पिकत नाहींत. इजिप्त देशांत कांहीं ज्वारी उत्पन्न होते. परंतु ती फारच थोडी वती तेथेंच खपून जाते. अबिसिनियाच्या किनाऱ्याकडे हिंदुस्थानांतूनच ज्वारी रवाना होते. युरोपा मध्ये तर पांखरें कोंबड्या ह्यांना घालण्या पुरतांच हीं धान्यें हिंदुस्थानातून नेतात. हरबराही दुसरीकडे कोठें होत नाहीं जपान व चीन येथें त्याच जातींचें एक धान्य उत्पन्न होतें पण तेंही तेथेंच खपून जातें. राहून राहिली तांदुळ, गहूं , सातू व मका हीं धान्यें यंदाचे ब्रह्मदेशांतलें तां-

दुळाचें पीक बरेंच आहे. पण फार नाहीं तरी बंगाल व मद्रास इकडे ब्रह्मदेशांतून सरासरीनें दहालक्ष टन तांदूळ बाहेर देशी रवाना होतात. व जरी हिंदुस्थानाला तांदुळ तेथून आणता आले नाहींत तरी सियाम, कोचीन चीन, जपान येथूनही थोडे आणतां येतील. येथून ही सुमारें दहालक्ष टन तांदूळ दर वर्षी बाहेर देशी रवाना होतात.

गहूं, सातु व मका हीं धान्यें युनायटेड स्टेट्स (अमेरिका) आर्जेनिटाईन रेपाब्लिक रशिया, व रशिया आणि तुर्कस्थान ह्या मधले प्रदेशांत मात्र विपूल तयार होतात असें ह्मटलें तरी चालेल. थोडी मदत इजिप्त मधून ही होईल. आस्ट्रेलिया मधूनही कांहीं मदत झाली असती. पण तेथील यंदांचीं पिकें बातावेताचींच आहेत. युरोप खंडांतले देशांत स्वतां पुरतीहि हीं धान्यें पिकवीत नाहींत. फ्रान्स व जर्मनी ह्या दोन्ही देशांत युनायटेड स्टेट्स, रशिया व हिंदुस्थान येथूनच धान्यें वारंवार न्यावीं लागतात.

रशियांतून सरासरी २६८०००० टन गहूं दर वर्षी बाहेर देशी रवाना होतो. व शिवाय कणीक निराळीच. यंदांचे तेथलें पीक चांगलें नाहीं असें ह्मणतात. तरी पण यंदा निदान पंधरा पासून वीस लक्ष टन गहूं बाहेर पाठवितां येईल.

हंगेरी बलगेरिया रोमानिया वगैरे येथून ही दहा बारा लक्ष टन गहू आणतां येईल. युनायटेड स्टेट्स (संयुक्त संस्थानें) मधून दरसाल बावीस ते पंचवीस लाख टन गहू बाहेर देशीं रवाना होतो. व गव्हाच्या केलेल्या कणीक व इतर जिनसा ह्या पुष्कळ जातात. तेथलें पीक यंदा थोडें कमीच झालें आहे. तरी निदान वीस लक्ष टन गहू बाहेर देशीं पाठवितां येतील इतकें पीक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नुकत्याच आलेल्या तारेवरून कळतें कीं आर्जेटाईन रेपब्लिकडून सात लक्ष टन गहूं आणतां येईल.

मिळून सुमारें ५० ते ६० लक्ष टन गहूं हिंदुस्थानांत खाण्यासाठीं आणतां येणार आहे. गव्हाची कणीक अगर मक्यांचें पीठ किंवा त्यांच्या केलेल्या जिनसा ह्या हिशेबांत धरल्या नाहींत. कारण हिंदुस्थांत त्यांचा खप होणार नाहीं.

रशियांतून किंवा युरोपाच्या आग्नेय प्रांतातून [हंगेरी धरून] वीस लाख टन सातू आणता येईल. व एक लाख टन अमेरीकेतून आणतां येईल.

युनाटेड स्टेट्स [अमेरिका] येथून मकईचें उत्पन्न अतिशय परंतु त्या प्रमाणानें बाहेर देशीं पाठविलें जात नाहीं. बाहेर फक्त १ लक्ष टन मात्र पाठवितात. बाहेरून मागणी आल्यास २ किंवा ३ लक्ष टन मका बाहेर सहज पाठवितां येईल. निदान एक लक्ष टनला तरी खोट पडणार नाहीं. आर्जेटाईन रेपाब्लिक मधून निदान ५ लाख टन व कानडाहून निदान १ लाख टन मका आणता येईल. व रशिया, युरोपांतील आग्नेय दिशेकडील प्रांत व इजिप्त मिळून सुमारें दहा लक्ष टन मका धाडूं शकतील.

मिळून ११००,००० टन तांदूळ
५० ते ६० अगर ६५ लक्ष टन-गहूं
२, ०००, ००० टन-सातू
२५ ते ३० लक्ष टन मका

इतकें धान्य आपल्यास बाहेरून आणवितां येणार आहे.

स्टॅटिस्ट नामक पत्रामध्यें कोणचे देश किती धान्य बाहेर पाठवूं शकतील ह्याचा हिशेब दिला आहे तो असा:—

| | टन. |
|---|---|
| अमेरिका व कानडा— | २८९३००० |
| रशिया— | ३२'४००० |
| रोमानिया तुर्कस्थान वगैरे.— | १७१४००० |
| हिंदुस्थान व इराण— | ९३००० |
| चिली व युरग्वे— | १०७८०० |
| आर्जेटिना— | ९३६००० |
| इतर लहान देश— | ३२१००० |
| एकंदर | ८८३८००० |

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

(रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला.)

उत्तम शिक्षक आणि यशस्वी शिक्षक ह्मणजे चांगलें शिकविणारा शिक्षक आणि पुष्कळ मुलें पास करणारा शिक्षक.

सर्व सुधारलेल्या देशांत शिक्षण या विषया संबंधानें हल्लीं अनेक दिशांनीं विचार चालूं आहेत ते योग्यच आहेत. कारण शिक्षण हें सर्व सुधारणेचा पाया असून एकंदरींत सर्व सुखाचें तें महा कारण आहे ज्या प्रमाणें सर्व गोष्टींत हल्लीं असें पाहणें चाललें आहे कीं श्रम थोडे लागून फलप्राप्ति मोठि व्हावी तसाच हल्लीं चाललेल्या यत्नांचा शिक्षणा संबंधानें रोख आहे. दुसरा असाही त्या यत्नांचा हेतु आहे कीं, शाद्बिक ज्ञानाकडची लोकांची प्रवृत्ति काढून ती आर्थिक ज्ञानाकडे वळवावी. हा यत्न फारच योग्य आहे, कारण शाद्बिक ज्ञान हें ज्ञान या संज्ञेस सर्वथैव योग्य नाहीं. आर्थिक ज्ञान हेंच वास्तविक ज्ञान होय. पूर्वीच्या शास्त्रीय शिक्षण- पद्धतीचा कल जरी शाद्बिक ज्ञानाकडे होता असें आपणास वाटतें तरी आर्थिक ज्ञान हेंच खरें ज्ञान हें प्राचीनास माहीत नव्हतें असें नाहीं.

शाद्बे ब्रह्मणि निष्णातो न निष्णायात् परे यदि।
श्रमस्तस्य श्रमफलं ह्यधेनुमिव रक्षतः।

श्री० म० भा०

अशीं दुसरीं वचनें आहेत. मग हल्लींचा यत्न अर्थ-- ज्ञानाच्या संबंधानें जो विशेष चालला आहे त्याचें वैचित्र्य तें काय? त्याचें वैचित्र्य हें कीं आरंभा पासूनच आर्थिक ज्ञान व्हावें. प्राचीन शिक्षणांत असें गृहीत घेण्यांत येत असें कीं अप्रौढ वयामध्यें शाद्बिक ज्ञान झालें तरी होवो कारण प्रौढ वयांत विचार शक्तीचा विकास झाला ह्मणजे त्याच शाब्दिक ज्ञानाचें आर्थिक ज्ञान अनायासें होईल. पूर्वींची पद्धति हल्लींच्या विचारांत बरीच दोषास्पद झाली आहे, परंतु विचारांती ती अवश्यमेव दूष्य करावी या विषयीं आमचें मन साशंक आहे. आतां अर्वाचीन विचार सरणी प्रमाणें आरंभा पासून वास्तवीक ज्ञान व्हावें अशी जी आधुनिकांची इच्छा, ती पूर्णपणें सिद्धीस जात आहे कीं नाहीं हें अनुभवी लोकांस माहित आहेच. दुसरें ती इच्छा सफल होण्याचा गुण तिच्यामध्यें आहे किंवा नाहीं हा प्रश्न विचारणीय आहे मनुष्याच्या ज्ञानशक्तीचीं जीं सर्व अंगें, तीं त्याच्या बाल्यावस्थेंत मुकुलित अवस्थेंत असतात हें स्वाभाविकच आहे. त्यांचा विकास होईल तितका लवकर करणें हा आधुनिकांचा यत्न दिसतो. या सर्व अंगामध्यें विचारांग हें मुख्य होय. व याचाच विकास करण्या विषयीं हल्लींच्या यत्नांचा मोठा मारा आहे. हा यत्न थोडासा अकालिक दिसतो. कारण विचार करणें ह्मणजे सृष्टींतील पदार्थांच्या सूक्ष्म संबंधाकडे लक्ष्य देणें होय.

प्रथमतः स्थूलाचें ज्ञान जसें लवकर होतें तसें सूक्ष्माचें होत नाहीं, या करितां बाल्यावस्थेंत स्थूलसृष्टी पहाण्याकडेच मनाची प्रवृत्ति विशेष असते व तिच्या अवलोकनानें मन बरेंच तृप्त झालें ह्मणजे, तें हळूहळू सूक्ष्माकडे वळूं लागतें. अशा सारख्या कारणा करितांच प्राचीनांनीं आरंभीं आर्थिक ज्ञानावर फारसा जोर दिला नसावा. त्यांनीं स्थूलाच्या ज्ञानप्राप्तीकडे फारसे परिश्रमच केले नाहींत, कारण हल्लीं जसें पशु. पक्षी वृक्ष, पाषाण इत्यादिकांच्या स्वरूप स्वभाव वर्णनांच्या संबंधानें पुस्तकांतून धडे आहेत अशा प्रकारचा पूर्वींचा यत्न दिसत नाहीं कारण प्राचीन शास्त्रीय शिक्षणपद्धतींत व्याकरण, न्याय, मीमांसा, इत्यादि शास्त्रांचें अध्ययन करविण्यांत येई तें, एकदम विद्यार्थ्यांच्या मनास सूक्ष्म अतिसूक्ष्म विचारांकडे लावण्या सारखें असे, ह्मणूनच आरंभीं शाब्दिक ज्ञानाकडे विशेष भर राहिला व आर्थिक ज्ञानाचा हवाला प्रौढवयाकडे देण्यांत आला असावा. हल्लीं प्रथमतः स्थूलांच्या ज्ञानापासून आरंभ करून हळूहळू सूक्ष्माच्या ज्ञानाकडे मनाची प्रवृत्ति वळविण्यांत येते. प्राचीनांनीं स्थूलाच्या ज्ञानास ज्ञानच मानिलें नसावें असें दिसतें, कारण तें सर्वांस न्यूनाधिक्यें करून साहजिक होतें. त्यांनीं ज्यास ज्ञान मानिलें तें सूक्ष्माचें आणि अतिसूक्ष्माचें ज्ञान आणि अशा विचारानें पाहिलें असतां अर्वाचीन पद्धति वेगळ्या दिसतात, या करितां त्यांची तुलना न केली तरी चालेल. आतां अर्वाचीन पद्धतींत तरी स्थूला पासूनच आरंभ करण्यांत येतो असें केवळ नाहीं. कारण गणित शास्त्राला पहिल्या इयत्तेंत जो आरंभ करण्यांत येतो तो केवळ स्थूलाच्या ज्ञानाचा नव्हे. तर अंशतः सूक्ष्माच्या ही ज्ञानाचा आहे. अंक सांगणें, फाडे, सवाकीं, दीडकीं वगैरे पाठ करविणें यांत प्राचीनांच्याच पद्धतीचें अनुकरण आहे असें दिसतें. याच्याही आरंभा पूर्वी किंडर गार्टन पद्धती सारखी पद्धत स्वीकारून स्थूल पदार्थांचें ज्ञान करवून नंतर मग गणिता सारख्या विषयाकडे बालकांस वळविणें अधिक चांगलें होईल. असो या बद्दल विशेष सांगण्याचा आमचा विचार नाहीं. या प्रस्तावनेंत विशेषेंकरून आमचा असा विचार करण्याचा यत्न आहे कीं, अप्रौढ वयांत सर्व विषयां संबंधानें खरें आर्थिक ज्ञान करवून देण्याचा जो मोठा यत्न आहे तो कितपत इष्ट आहे, आणि जर तो आपणस पाहिजे तितका सिद्धीस जात नाहीं अहे तर त्यांतील विचारांत चूक आहे किंवा त्याच्या सिद्धीच्या उपायांत किंवा उभयतांत.

२ मनुष्य मात्राची ज्ञानशक्ति ही सारखी आहे, परंतु ती न्यूनाधिक्यें करून जी दृष्टीस पडते तिचें कारण तिचा विकास होण्यास जसे उपाय व्हायाला पाहिजे होते तसे झाले नाहींत. ह्मणून न्यूनाधिक्य दृष्टीस पडतें, असें कोणाचें मत आहे; ह्मणजे त्यांचें मत असें कीं सर्व गोष्टी समसमान असतील तर सर्वांची ज्ञानशक्ति ही सारखीच विकसित होईल हें मत सर्व ग्राह्य आहे असें दिसत नाहीं. या ह्मणण्यांत कितीही सत्यता असो, ज्या अर्थीं सर्वत्र समसमानता रहाणें अशक्य आहे त्या अर्थीं ज्ञानशक्ति न्यूनाधिक असते असें घेऊन चाललें तरी चालेल व शिक्षकांचा अनुभवही अशाच प्रकारचा येईल असें वाटतें. दुसरी गोष्ट हल्लींच्या शिक्षण पद्धतींत एक शिक्षक भिन्नभिन्न बुद्धीच्या तीस तीस चाळीस चाळीस विद्यार्थ्यांचा एक वर्ग करून त्यांस कांहीं एक विषयाचें ज्ञान करून देण्यास कंबर बांधून बसतो.

या दोन गोष्टी गृहीत घेऊन शिक्षकास आपलें काम करण्याचें आहे असें आपण घेऊन चालूं. वर प्रमाणें वस्तुस्थिति पतकरून जो शिक्षक आपलें कामास प्रवृत्त झाला त्यास आपले काम चांगलें करतां येण्यास तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

त्यांतील पहिली गोष्ट, जें त्याला शिकविण्याचें आहे त्याचें त्याला उत्तम ज्ञान असणें. दुसरी गोष्ट, तें ज्ञान विद्यार्थ्यांच्या मनांत युक्तीनें भरवून देणें आणि तिसरी गोष्ट वर्गांत discipline ह्मणजे नियमन ठवणें ही होय. Discipline या शद्बाला Candy साहेबांनीं जे अनेक मराठी शद्ब दिले आहेत त्यांपैकींच नियमन हा शद्ब आह्मी पसंत केला आहे. आतां या तीन गोष्टी पैकीं पहिली गोष्ट, शिकविण्याचे विषय उत्तम प्रकारें शिक्षकास येणें, ती विषयीं विचार करूं. प्रस्तुत निबंधांत म्याट्रिक्लेशन पर्यंतच्या अभ्यासाविषयीं आपण विचार करतों आहों असें समजावें; कारण पुढील विद्यार्थी प्रौढ वयस्क असल्यामुळें अध्ययना संबंधानें ते आपली स्वतःची काळजी घेण्यास समर्थ असतात; करितां त्यांच्या बद्दलची जबाबदारी शिक्षकावर फारशी रहात नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. साधारण ह्मण आहे कीं एकपट चेला तर दसपट गुरू. ह्मणजे गुरुशिष्यांच्या ज्ञानांत दसपटीचें अंतर असलें पाहिजे.

या ह्मणण्या प्रमाणें पहिली इयत्ता शिकविण्यास दहावी इयत्ता पास झालेला गुरु पाहिजे व दुसरी इयत्ता शिकविण्यास म्याट्रिक्लेशन पास झालेला गुरु पाहिजे व या प्रमाणें पुढें. वास्तविक अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं पहिली इयत्ता शिकविण्यास जो गुरु असायाचा, त्याला त्या इयत्तेंतील सर्व विषय शिष्यांस सुलभ रीतीनें उत्तम शिकावितां येतील इतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं अ

सले पाहिजे. या प्रमाणेंच वरील सर्व इयत्तांचें समन्वयांचे. या कामाला परीक्षेचें ही अनुमान वास्तविक योग्य नाहीं. कारण कोणतीही परीक्षा पास होणारास सर्व विषयांचें ज्ञान उत्तम. होत असतें असें नाहीं. त्याला एक दोन विषय उत्तम येतात, कांहीं मध्यम, व कांहींत तर तो अगदींच कच्चा असतो. पण जो शिक्षक बनला त्यास सर्व विषय उत्तम आले पाहिजेत. कारण त्याला सर्व विषय शिकवावे लागतात तेव्हां शिक्षकाची योग्यता परीक्षेनें न घेतली तरी चालेल. हल्लीं पाठ शाळांतून सर्व शिक्षकांत ( Professorial system जेथें असेल तितक्या शाळा खेरीज करून) सर्व विषय शिकवावे लागतात. तेव्हां त्यास प्रत्येक विषयाचें ज्ञान जें जें त्याला शिकवावें लागतें त्याच्या त्याच्या मानानें फारच अधिकपटीनें पाहिजे.

आतां प्रत्येक विषयाच्या संबंधानें शिक्षकाचे ज्ञानाचा विचार करूं.

प्रथम गणित विषय घेऊं.

गणित विषय ( अंकगणित, बीजगणित आणि सिद्धांत ) या तिन्ही संबंधानें शिक्षकांस उपपत्तीसह ज्ञान असलें पाहिजे आणि त्याचा व्यावहारिक उपयोगही त्यास कळला पाहिजे. शिक्षकानें अनेक गणितांतील उदाहरणें पुष्कळ सोडविलीं असून तो विषय त्याच्या डोक्यांत चांगला खेळत असला पाहिजे. सिद्धांतास संबंधानें त्यानें अनेक Deductions सोडविल्या असून सिद्धांताचा व्यवहारिक उपयोग ( Practiaal application ) ही त्यास माहित असला पाहिजे.

भाषा आणि कविता या शिकविण्याच्या संबंधानें त्यानें अनेक ग्रंथ वाचलेले असले पाहिजेत आणि भाषांतर शिकविण्यास दोन्ही भाषांची तुलना करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असलें पाहिजे. तसेंच दोन्ही भाषांचें ज्ञान त्यास उत्तम प्रकारें असून शब्दाची अर्थ व्याप्ति आणि योग्य उपयोग यां विषयीं त्यानें विशेष अभ्यास केला असला पाहिजे. इतिहासाचें उत्तम ज्ञान असण्यास इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशां संबंधी जितके एकंदर इतिहास लिहिलेले आहेत तितके किंवा त्यातले बरेच शिक्षकानें वांचलेले असले पाहिजेत. आणि ज्या काळापासून ज्या काळापर्यंत ते लिहिलेले आहेत त्या काळांतील त्या राष्ट्रांच्या सामाजिक, धार्मिक, नैतिक, राजनीति विषयक स्थिती संबंधानें तीं तीं राष्ट्रें उच्च नीच अवस्था कशी पावलीं या बद्दलची माहिती त्यास उत्तम समजली पाहिजे. शिकविण्याच्या पुस्तका पलीकडे ज्याचें ज्ञान फारसें नाहीं तो हा विषय शिकविण्यास अनधिकारि होय. हें विधान इतर विषया संबंधानें ही करण्यास बाध नाहीं. भूगोलाचें ज्ञान पूर्णपणें असून Physical Geography भूतल विषयक विद्या ही उत्तम अवगत असली पाहिजे.

शास्त्रीय विषयांची त्यास पूर्ण माहिती असली पाहिजे आणि ते ते विषय सप्रयोग करून दाखवितां आले पाहिजेत. एकंदर प्रत्येक विषयाचें ज्ञान केवळ पुस्तकी नसून पूर्णतेनें असलें पाहिजे.

आतां दुसरी गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनांत उत्तम रीतीनें ज्ञान भरवून देणें ही होय. या गोष्टीच्या संबंधानें किती जरी नियम केले तरी ही गोष्ट अनुभवानें येणारी आहे. ही भरवून देण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे शिक्षकास स्वतःला उत्तम ज्ञान असणें हें होय. ज्याला स्वतःला एखादी गोष्ट चांगली समजली आहे ती तो दुसऱ्याचे मनांत हर प्रयत्नानें भरवून देऊं शकेल आता शिक्षकाच्या कामांत चातुर्यही आहे. पण तें येण्यास अनुभवच पाहिजे. तो अनुभव विद्वान शिक्षकास येण्यास वेळ लागणार नाहीं. शिक्षकाला मुलांस एखादी गोष्ट समजवून देण्यास जी अडचण पडते. ती वस्तुतः समजवून देण्याची अडचण नव्हे तर स्वतःला येत नाहीं हीच अडचण. आतां ज्ञान आणि शिकविण्याचा अनुभव हीं दोन एकत्र झालीं असतां शिकविणें सुलभ होतें. अनुभव नसेल तर शिकविण्यास थोडे परिश्रम पडतील.

येथें थोडें विषयांतर करून शिक्षकाच्या अज्ञानामुळें- आळसामुळें नव्हे- विद्यार्थ्यास चांगले समजत नाहीं व यामुळें शिक्षण आणि परीक्षण यांमध्यें एक चमत्कारिक कलह उत्पन्न होतो, व त्याचें कारण बऱ्याच प्रसंगीं उभयतांच्या लक्ष्यांत येत नाहीं याविषयीं विचार करूं.

( पुढें चालेल )

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 1 1897

Many anti—congressmen have been crying themselves hoarse against the Indian National Congress. Their bitter invectives against the Congress are taken at their proper worth and treated with the contempt they deserve in as much as it is no secret to any one that they are the outcome either of interested and jealous ambition, or of sheer ignorance. It has been proved beyond doubt that the Congress is not only not disloyal but more loyal than they themselves can profess themselves to be. Their bitter invectives against and their blind tho' impotent opposition to the Congress—a humble and voluntary helpmate to Government—are in themselves a sufficient proof of this. But we have very little to say against such men. We know they are impotent enemies and we need not fear their daggers. We want the sympathy of those who yet hold aloof from the congress merely on the supposition that the Congress is a mere useless expensive fair held at different stations each year. We want to point to them that it is no such thing. The Congress is working slowly and steadiy It has directly and indirectly done us an immence good. Our congress has shown to the world that India has persons that can unite together to discuss matters of vital importance to her and join in one chorus hymn to the Empress of India. It has shown that India is a nation. No one can deny that the construction of our present Legislative Councils is the result of the work of the Congress. Government has been listening to the wise counsel of the Congress though not acknowledging it in so many words. It pretends to turn a deaf ear to its demands but its ear is particularly keen to every syllable that the Congress utters. English nation is a large—hearted and noble nation and knows well how to appreciate just ambition and by degress one right after anothe is conferred upon the British India. Years ago special rights were given to Bombay, Madras and Calcutta to elect members to the Local and Imperial Legisltation Councils Now a Local legislatvie council has been established for the Punjab and Burmah. At present the members are only to be nominated. We have no doubt that in time they will be elected too! Will not all this and much more that may be left unsaid be sufficient to win the sympathy of unprejudiced by—standers? Berar has the honour of holding the next Congress in its capital. Let every one join the cause with a will. Berar has a very awkward position. It is neither a province under the control of the State of Hyderabad nor is it under the direct control of the British Government and so it has been labouring under one great disadvantage—one great political disability. While Bombay, Madras and Calcutta can send members to the local and legislative councils, Berar merely has to submit to the tutelage of the Residency here. May we hope that the question of securing for Berar a similar right be mooted in the coming congress.

We have little doubt that the grievances complained of by the *New Resident* in our last issue have the attention of the Postal Superintendent of Berar. We should like to go still further and point out that the Post Offices—both the General Post Office and the Sub Post Office at the Railway Station— are not really as useful to the Akola public—even the commercial public— as they ought to be both being very ill situated.

A Post Office ought to be situated in the commercial and business centers, while each of them is at a distance of more than a mile from these. We are quite confident that even if the Postal Department is not inclined to increase the number of Post Offices here, it can with the same expense, with the same number of Post Offices be more useful to the public only by altering their situation. If we look over the daily returns of business of the Sub Post Ofice at the Railway Station, we shall see that the work done there is by no means much smaller than that that done in the General Post Office, and yet the number of hands there is very small Besides a Post Office at a Railway Station is primarily intended only as a station for the Mail Agent. We do not see why one Post Office should not be opened in the heart of the city just on the same scale as that of the Post Office at the Railway Station. All business except that of the Mail Agent should be transferred to this Post Office.

People will be highly obliged if the Postal authorities will increase the utility of the Post Office at the Railway Station by transferring it to the central quarters of Akola. The clearance of Letter boxes is certainly ill timed to the wants of the public These are little things of minor details and arrangement, but if they are not carefully carried out this slight oversight entails a train of numerous inconveniences to the routine of business. Money Orders, Registration of Letters and Value Payable Parcels, Savings banks and several other departments of the greatest importance and utility will well serve the public interests provided they are placed within an easy reach of the public.

"While we speak of artificial refrigeration, it should be remembered that there is nothing essentially artificial about it. The process of refrigeration is merely a loss of heat. Water loses heat to the air, and freezes in winter; cream loses heat to the ice, and freezes in an ice cream freezer; water loses heat to an ammonia coil, and freezes into ice in a tank; meat and vegetables lose heat to cold brine pipes and are preserved. In all cases the the process is the same, and one is as natural as the other.

The only part that might truly be called artifical is the method of getting rid of the heat after the process of refrigeration has concentrated it in the circulating medium. No difference therefore exists between refrigeration and cold of winter, except that the former is constant and under control while the latter is widely and erratically variable, for which reason the resources of nature have not been able, even in cool latitudes, to compete with the art of man in the useful application of low temperatures to the preservation of perishable material."

Cassier's Magazine.

## वऱ्हाड

हवामान— पुन्हा थंडी थोडीशी पडूं लागली. गेल्या मंगळवारीं वारा अती तुफानाचा सुटला होता आणि पुष्कळ ठिकाणीं झाडांची वगैरे पडझड झाली. पावसाचें डंबर मोठेंच वाढलें होतें. क्वचित् गारपीटाचा पाऊस पडला. हवा निरोगी नाहीं.

दुष्काळाच्या कामा निमित्त क्याप्टन आयव्हर्स व रा. रा. सी. शामराव हे दोघे आफिसर अनुक्रमें बाळापूर व महान या गांवाकडे लवकरच जाणार आहेत.

रा. रा. लक्ष्मण गोविंद ओक यांनीं चालू महिन्यापासून आपल्या नोकरीची रजा घेतली आणि ते आकोलें शहरींच वकीलीचा धंदा करणार आहेत. त्यांच्या डिपुटी कमिशनर कचेरींतील ६० रुपये पगारावर कोणाची नेमणुक होणार आहे हें अजून कळत नाहीं.

वे० रा. रा. श्रीधर शास्त्री भडगांवकर हे हल्लीं येथें आले असून ते कीर्तन करीत असतात. काल यांचें येथील लायब्ररींत व्याख्यानही झालें. व्याख्यानाचा विषय वेदान्त हा होता.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ८८ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| „ ( बनशी ) | १३० रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६।= रु० मण |
| तूप | ६॥ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८९ |

## वर्तमानसार.

दुळाचें पीक बरेंच आहे. पण फार नाहीं तरी बंगाल व मद्रास इकडे ब्रह्मदेशांतून सरासरीनें दहालक्ष टन तांदूळ बाहेर देशी रवाना होतात. व जरी हिंदुस्थानाला तांदुळ तेथून आणता आले नाहींत तरी सियाम, कोचीन चीन, जपान येथूनही थोडे आणतां येतील. येथून ही सुमारें दहालक्ष टन तांदूळ दर वर्षी बाहेर देशी रवाना होतात.

गहूं, सातु व मका हीं धान्यें युनायटेड स्टेट्स (अमेरिका) आर्जेनिटाईन रेपब्लिक रशिया, व रशिया आणि तुर्कस्थान ह्या मधले प्रदेशांत मात्र विपूल तयार होतात असें ह्मटलें तरी चालेल. थोडी मदत इजिप्त मधून ही होईल. आस्त्रेलिया मधूनही कांहीं मदत झाली असती. पण तेथील यंदांचीं पिकें बातावेताचींच आहेत. युरोप खंडांतले देशांत स्वतां पुरतीहि हीं धान्यें पिकवीत नाहींत. फ्रान्स व जर्मनी ह्या दोन्ही देशांत युनायटेड स्टेट्स, रशिया व हिंदुस्थान येथूनच धान्यें वारंवार न्यावीं लागतात.

रशियांतून सरासरी २६८०००० टन गहूं दर वर्षी बाहेर देशी रवाना होतो. व शिवाय कणीक निराळीच, यंदाचे तेथलें पीक चांगलें नाहीं असें ह्मणतात. तरी पण यंदा निदान पंधरा पासून वीस लक्ष टन गहूं बाहेर पाठवितां येईल.

हंगेरी बलगेरिया रोमानिया वगैरे येथून ही दहा बारा लक्ष टन गहू आणतां येईल. युनायटेड स्टेट्स (संयुक्त संस्थानें) मधून दरसाल बावीस ते पंचवीस लाख टन गहू बाहेर देशीं रवाना होतो. व गव्हाच्या केलेल्या कणीक व इतर जिनसा ह्या पुष्कळ जातात. तेथलें पीक यंदा थोडें कमीच झालें आहे. तरी निदान वीस लक्ष टन गहू बाहेर देशीं पाठवितां येतील इतकें पीक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नुकत्याच आलेल्या तारेवरून कळतें कीं आर्जेटाईन रेपब्लिकडून सात लक्ष टन गहूं आणतां येईल.

मिळून सुमारें ५० ते ६० लक्ष टन गहूं हिंदुस्थानांत खाण्यासाठीं आणतां येणार आहे. गव्हाची कणीक अगर मक्याचें पीठ किंवा त्यांच्या केलेल्या जिनसा ह्या हिशेबांत धरल्या नाहींत. कारण हिंदुस्थांत त्यांचा खप होणार नाहीं.

रशियांतून किंवा युरोपाच्या आग्नेय प्रांतातून [हंगेरी धरून] वीस लाख टन सातू आणता येईल. व एक लाख टन अमेरीकेतून आणतां येईल.

युनायटेड स्टेट्स [अमेरिका] येथून मकईचें उत्पन्न अतिशय परंतु त्या प्रमाणानें बाहेर देशीं पाठविलें जात नाहीं. बाहेर फक्त १ लक्ष टन मात्र पाठवितात. बाहरून मागणी आल्यास २ किंवा ३ लक्ष टन मका बाहेर सहज पाठवितां येईल. निदान एक लक्ष टनला तरी खोट पडणार नाहीं. आर्जेंटाईन रेपाब्लिक मधून निदान ५ लाख टन व कानडाहून निदान १ लाख टन मका आणता येईल. व रशिया, युरोपांतील आग्नेय दिशेकडील प्रांत व इजिप्त मिळून सुमारें दहा लक्ष टन मका धाडूं शकतील.

मिळून ११००,००० टन तांदूळ
५० ते ६० अगर ६५ लक्ष टन-गहूं
२,०००,००० टन-सातू
२५ ते ३० लक्ष टन मका

इतकें धान्य आपल्यास बाहेरून आणवितां येणार आहे.

स्टॅटिस्ट नामक पत्रामध्यें कोणचे देश किती धान्य बाहेर पाठवूं शकतील ह्याचा हिशेब दिला आहे तो असाः—

| | टन. |
|---|---|
| अमेरिका व कानडा— | २८९३००० |
| रशिया— | ३२'४००० |
| रोमानिया तुर्कस्थान वगैरे.— | १७१४००० |
| हिंदुस्थान व इराण— | ५३००० |
| चिली व युरग्वे— | १०७८०० |
| आर्जेंटिना— | ५३६००० |
| इतर लहान देश— | ३२१००० |
| एकंदर | ८८३८००० |

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

(रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला.)

उत्तम शिक्षक आणि यशस्वी शिक्षक ह्मणजे चांगलें शिकविणारा शिक्षक आणि पुष्कळ मुलें पास करणारा शिक्षक.

सर्व सुधारलेल्या देशांत शिक्षण या विषया संबंधानें हल्लीं अनेक दिशांनीं विचार चालू आहेत ते योग्यच आहेत. कारण शिक्षण हें सर्व सुधारणेचा पाया असून एकंदरींत सर्व सुखाचें तें महा कारण आहे ज्या प्रमाणें सर्व गोष्टींत हल्लीं असें पाहणें चाललें आहे कीं श्रम थोडे लागून फलप्राप्ति मोठी व्हावी तसाच हल्लीं चाललेल्या यत्नांचा शिक्षणा संबंधानें रोख आहे. दुसरा असाही त्या यत्नांचा हेतु आहे कीं, शाब्दिक ज्ञानाकडची लोकांची प्रवृत्ति काढून ती आर्थिक ज्ञानाकडे वळवावी. हा यत्न फारच योग्य आहे, कारण शाब्दिक ज्ञान हें ज्ञान या संज्ञेस सर्वथैव योग्य नाहीं. आर्थिक ज्ञान हेंच वास्तविक ज्ञान होय. पूर्वीच्या शास्त्रीय शिक्षण- पद्धतीचा कल जरी शाब्दिक ज्ञानाकडे होता असें आपणास वाटतें तरी आर्थिक ज्ञान हेंच खरें ज्ञान हें प्राचीनास माहीत नव्हतें असें नाहीं.

शाब्दे ब्रह्माणि निष्णातो न निष्णायात् परे यदि।
श्रमस्तस्य श्रमफलं ह्यधेनुमिव रक्षतः।

श्री० म० भा०

अशीं दुसरीं वचनें आहेत. मग हल्लींचा यत्न अर्थ-- ज्ञानाच्या संबंधानें जो विशेष चालला आहे त्याचें वैचित्र्य तें काय? त्याचें वैचित्र्य हें कीं आरंभा पासूनच आर्थिक ज्ञान व्हावें. प्राचीन शिक्षणांत असें गृहीत धेण्यांत येत असें कीं अप्रौढ वयामध्यें शाब्दिक ज्ञान झालें तरी होवो कारण प्रौढ वयांत विचार शक्तीचा विकास झाला ह्मणजे त्याच शाब्दिक ज्ञानाचें आर्थिक ज्ञान अनायासें होईल. पूर्वीची पद्धति हल्लींच्या विचारांत बरीच दोषास्पद झाली आहे, परंतु विचारांती ती अवश्यमेव दूष्य करावी या विषयीं आमचे मन साशंक आहे. आतां अर्वाचीन विचार सरणी प्रमाणें आरंभा पासून वास्तवीक ज्ञान व्हावें अशी जी आधुनिकांची इच्छा, ती पूर्णपणें सिद्धीस जात आहे कीं नाहीं हें अनुभवी लोकांस माहित आहेच. दुसरें ती इच्छा सफल होण्याचा गुण तिच्यामध्यें आहे किंवा नाहीं हा प्रश्न विचारणीय आहे मनुष्याच्या ज्ञानशक्तीचीं जीं सर्व अंगें, तीं त्याच्या बाल्यावस्थेंत मुकुलित अवस्थेंत असतात हें स्वाभाविकच आहे. त्यांचा विकास होईल तितका लवकर करणें हा आधुनिकांचा यत्न दिसतो. या सर्व अंगामध्यें विचारांग हें मुख्य होय. व याचाच विकास करण्या विषयीं हल्लींच्या यत्नांचा मोठा मारा आहे. हा यत्न थोडासा अकालिक दिसतो. कारण विचार करणें ह्मणजे सृष्टींतिल पदार्थांच्या सूक्ष्म संबंधाकडे लक्ष्य देणें होय.

प्रथमतः स्थूलाचें ज्ञान जसें लवकर होतें तसें सूक्ष्माचें होत नाहीं, या करितां बाल्यावस्थेंत स्थूलसृष्टी पहाण्याकडेच मनाची प्रवृत्ति विशेष असते व तिच्या अवलोकनानें मन बरेंच तृप्त झालें ह्मणजे, तें हळूहळू सूक्ष्माकडे वळूं लागतें. अशा सारख्या कारणा करितांच प्राचीनांनीं आरंभीं आर्थिक ज्ञानावर फारसा जोर दिला नसावा. त्यांनीं स्थूलाच्या ज्ञानप्राप्तीकडे फारसे परिश्रमच केले नाहींत, कारण हल्लीं जसें पशु. पक्षी वृक्ष, पाषाण इत्यादिकांच्या स्वरूप स्वभाव वर्णनांच्या संबंधानें पुस्तकांतून धडे आहेत अशा प्रकारचा पूर्वींचा यत्न दिसत नाहीं कारण प्राचीन शास्त्रीय शिक्षणपद्धतींत व्याकरण, न्याय, मीमांसा, इत्यादि शास्त्रांचें अध्ययन करविण्यांत येई तें, एकदम विद्यार्थ्यांच्या मनास सूक्ष्म अतिसूक्ष्म विचारांकडे लावण्या सारखें असे, ह्मणूनच आरंभीं शाब्दिक ज्ञानाकडे विशेष भर राहिला व आर्थिक ज्ञानाचा हवाला प्रौढवयाकडे देण्यांत आला असावा. हल्लीं प्रथमतः स्थूलांच्या ज्ञानापासून आरंभ करून हळूहळू सूक्ष्माच्या ज्ञानाकडे मनाची प्रवृत्ति वळविण्यांत येते. प्राचीनांनीं स्थूलाच्या ज्ञानास ज्ञानच मानिलें नसावें असें दिसतें, कारण तें सर्वांस न्यूनाधिक्यें करून साहजिक होतें. त्यांनीं ज्यास ज्ञान मानिलें तें सूक्ष्माचें आणि अति सूक्ष्माचें ज्ञान आणि अशा विचारानें पाहिलें असतां अर्वाचीन पद्धति वेगळ्या दिसतात, या करितां त्यांची तुलना न केली तरी चालेल. आतां अर्वाचीन पद्धतींत तरी स्थूला पासूनच आरंभ करण्यांत येतो असें केवळ नाहीं. कारण गणित शास्त्राला पहिल्या इयत्तेंत जो आरंभ करण्यांत येतो तो केवळ स्थूलाच्या ज्ञानाचा नव्हे. तर अंशतः सूक्ष्माच्या ही ज्ञानाचा आहे. अंक सांगणें, फाडे, सवार्की, दीडकीं वगैरे पाठ करविणें यांत प्राचीनांच्याच पद्धतीचें अनुकरण आहे असें दिसतें. याच्याही आरंभा पूर्वी किंडर गार्टन पद्धती सारखी पद्धत स्वीकारून स्थूल पदार्थांचें ज्ञान करवून नंतर मग गणिता सारख्या विषयाकडे बालकांस वळविणें अधिक चांगलें होईल. असो या बद्दल विशेष सांगण्याचा आमचा विचार नाहीं. या प्रस्तावनेंत विशेषेंकरून आमचा असा विचार करण्याचा यत्न आहे कीं, अप्रौढ वयांत सर्व विषयां संबंधानें खरें आर्थिक ज्ञान करवून देण्याचा जो मोठा यत्न आहे तो कितपत इष्ट आहे, आणि जर तो आपणास पाहिजे तितका सिद्धीस जात नाहीं अहे तर त्यांतील विचारांत चूक आहे किंवा त्याच्या सिद्धीच्या उपायांत किंवा उभयतांत.

२ मनुष्य मात्राची ज्ञानशक्ति ही सारखी आहे, परंतु ती न्यूनाधिक्यें करून जी दृष्टीस पडते तिचें कारण तिचा विकास होण्यास जसे उपाय व्हायाला पाहिजे होते तसे झाले नाहींत. ह्मणून न्यूनाधिक्य दृष्टीस पडतें, असें कोणाचें मत आहे; ह्मणजे त्यांचें मत असें कीं सर्व गोष्टी समसमान असतील तर सर्वांची ज्ञानशक्ति ही सारखीच विकसित होईल हें मत सर्व ग्राह्य आहे असें दिसत नाहीं. या ह्मणण्यांत कितीही सत्यता असो, ज्या अर्थी सर्वत्र समसमानता रहाणें अशक्य आहे त्या अर्थी ज्ञानशक्ति न्यूनाधिक असते असें धेऊन चाललें तरी चालेल व शिक्षकांचा अनुभवही अशाच प्रकारचा येईल असें वाटतें. दुसरी गोष्ट हल्लींच्या शिक्षण पद्धतींत एक शिक्षक भिन्नभिन्न बद्धींच्या तीस तीस चाळीस चाळीस विद्यार्थ्यांचा एक वर्ग करून त्यांस कांहीं एक विषयाचें ज्ञान करून देण्यास कंबर बांधून बसतो.

या दोन गोष्टी गृहीत धेऊन शिक्षकास आपलें काम करण्याचें आहे असें आपण धेऊन चालूं. वर प्रमाणें वस्तुस्थिति पतकरून जो शिक्षक आपल्या कामास प्रवृत्त झाला त्यास आपले काम चांगलें करतां येण्यास तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

त्यांतील पहिली गोष्ट, जें त्याला शिकविण्याचें आहे त्याचें त्याला उत्तम ज्ञान असणें. दुसरी गोष्ट, तें ज्ञान विद्यार्थ्यांच्या मनांत युक्तीनें भरवून देणें आणि तिसरी गोष्ट वर्गांत discipline ह्मणजे नियमन ठवणें ही होय. Discipline या शद्बाला Candy साहेबांनीं जे अनेक मराठी शद्ब दिले आहेत त्यां पैकींच नियमन हा शद्ब आह्मी पसंत केला आहे. आतां या तीन गोष्टी पैकीं पहिली गोष्ट, शिकाविण्याचे विषय उत्तम प्रकारें शिक्षकास येणें, ती विषयीं विचार करूं. प्रस्तुत निबंधांत म्याट्रिक्लेशन पर्यंतच्या अभ्यासा विषयीं आपण विचार करतों आहों असें समजावें; कारण पुढील विद्यार्थी प्रौढ वयस्क असल्यामुळें अध्ययना संबंधानें ते आपली स्वतःची काळजी घेण्यास समर्थ असतात; करितां त्यांच्या बद्दलची जबाबदारी शिक्षकावर फारशी रहात नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. साधारण ह्मण आहे कीं एकपट चेला तर दसपट गुरू. ह्मणजे गुरुशिष्यांच्या ज्ञानांत दसपटीचें अंतर असलें पाहिजे.

या ह्मणण्या प्रमाणें पहिली इयत्ता शिकविण्यास दहावी इयत्ता पास झालेला गुरु पाहिजे व दुसरी इयत्ता शिकविण्यास म्याट्रिक्लेशन पास झालेला गुरु पाहिजे व या प्रमाणें पुढें. वास्तविक अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं पहिली इयत्ता शिकाविण्यास जो गुरु असावयाचा, त्याला त्या इयत्तेंतील सर्व विषय शिष्यांस सुलभ रीतीनें उत्तम शिकावितां येतील इतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं अ

सलें पाहिजे. या प्रमाणेंच वरील सर्व इयत्तांचें समजावयांचे. या कामाला परीक्षेचें ही अनुमान वास्तविक योग्य नाहीं. कारण कोणतींही परीक्षा पास होणारास सर्व विषयांचें ज्ञान उत्तम. होत असतें असें नाहीं. त्याला एक दोन विषय उत्तम येतात, कांहीं मध्यम, व कांहींत तर तो अगदींच कच्चा असतो. पण जो शिक्षक बनला त्यास सर्व विषय उत्तम आले पाहिजेत. कारण त्याला सर्व विषय शिकवावे लागतात तेव्हां शिक्षकाची योग्यता परीक्षेनें न घेतली तरी चालेल. हल्लीं पाठ शाळांतून सर्व शिक्षकांस ( Protessorial system जेथें असेल तितक्या शाळा खेरीज करून) सर्व विषय शिकवावे लागतात. तेव्हां त्यास प्रत्येक विषयाचें ज्ञान जें जें त्याला शिकवावें लागतें त्याच्या त्याच्या मानानें फारच अधिकपटीनें पाहिजे.

आतां प्रत्येक विषयाच्या संबधानें शिक्षकाचे ज्ञानाचा विचार करूं.

प्रथम गणित विषय घेऊं.

गणित विषय ( अंकगणीत, बीजगणित आणि सिद्धांत ) या तिन्ही संबधानें शिक्षकांस उपपत्तीसह ज्ञान असलें पाहिजे आणि त्याचा व्यावहारिक उपयोगही त्यास कळला पाहिजे. शिक्षकानें अनेक गणितांतील उदाहरणें पुष्कळ सोडविलीं असून तो विषय त्याच्या डोक्यांत चांगला खेळत असला पाहिजे. सिद्धांतास संबधानें त्यानें अनेक Deductions सोडविल्या असून सिद्धांताचा व्यावहारिक उपयोग ( Practiaal application ) ही त्यास माहित असला पाहिजे.

भाषा आणि कविता या शिकविण्याच्या संबंधानें त्यानें अनेक ग्रंथ वाचलेले असले पाहिजेत आणि भाषांतर शिकविण्यास दोन्हीं भाषांची तुलना करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असलें पाहिजे. तसेंच दोन्ही भाषांचें ज्ञान त्यास उत्तम प्रकारें असून शद्बाची अर्थ व्याप्ति आणि योग्य उपयोगीं यां विषयीं त्यानें विशेष अभ्यास केला असला पाहिजे. इतिहासाचे उत्तम ज्ञान असण्यास इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशां संबधी जितके एकंदर इतिहास लिहिलेले आहेत तितके किंवा त्यातले बरेच शिक्षकानें वांचलेले असले पाहिजेत. आणि ज्या काळापासून ज्या काळापर्यंत ते लिहिलेले आहेत त्या काळांतील त्या राष्ट्रांच्या सामाजिक, धार्मिक, नैतिक, राजनीति विषयक स्थिती संबंधानें तीं तीं राष्ट्रें उच्च नीच अवस्था कशी पावलीं या बद्दलची माहिती त्यास उत्तम समजली पाहिजे. शिकविण्याच्या पुस्तका पलीकडे ज्याचें ज्ञान फारसें नाहीं तो हा विषय शिकविण्यास अनाधिकारी होय. हें विधान इतर विषया संबंधानें ही करण्यास बाध नाहीं. भूगोलाचें ज्ञान पूर्णपणें असून Physical Geography भूतल विषयक विद्या ही उत्तम अवगत असली पाहिजे.

शास्त्रीय विषयांची त्यास पूर्ण माहिती असली पाहिजे आणि ते ते विषय सप्रयोग करून दाखवितां आले पाहिजेत. एकंदर प्रत्येक विषयाचें ज्ञान केवळ पुस्तकी नसून पूर्णतेनें असलें पाहिजे.

आतां दुसरी गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनांत उत्तम रीतीनें ज्ञान भरवून देणें ही होय. या गोष्टीच्या संबधानें किती जरी नियम केले तरी ही गोष्ट अनुभवानें येणारी आहे. ही भरवून देण्याचें मुख्य साधन ह्मटलें ह्मणजे शिक्षकास स्वतःला उत्तम ज्ञान असणें हें होय. ज्याला स्वतःला एखादी गोष्ट चांगली समजली आहे ती तो दुसऱ्याचे मनांत हर प्रयत्नानें भरवून देऊं शकेल आता शिक्षकाच्या कामांत चातुर्यही आहे. पण तें येण्यास अनुभवच पाहिजे. तो अनुभव विद्वान शिक्षकास येण्यास वेळ लागणार नाहीं. शिक्षकाला मुलांस एखादी गोष्ट समजवून देण्यास जी अडचण पडते. ती वस्तुतः समजवून देण्याची अडचण नव्हे तर स्वतःला येत नाहीं हीच अडचण. आतां ज्ञान आणि शिकविण्याचा अनुभव हीं दोन एकत्र झालीं असतां शिकविणें सुलभ होतें. अनुभव नसेल तर शिकविण्यास थोडे परिश्रम पडतील.

येथें थोडें विषयांतर करून शिक्षकाच्या अज्ञानामुळें- आळसामुळें नव्हे- विद्यार्थ्यास चांगले समजत नाहीं व यामुळें शिक्षण आणि परीक्षण यांमध्यें एक चमत्कारिक कलह उत्पन्न होतो. व त्याचें कारण बऱ्याच प्रसंगीं उभयतांच्या लक्ष्यांत येत नाहीं याविषयीं विचार करूं.

( पुढें चालेल )

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 1 1897

Many anti—congressmen have been crying themselves hoarse against the Indian National Congress. Their bitter invectives against the Congress are taken at their proper worth and treated with the contempt they deserve in as much as it is no secret to any one that they are the outcome either of interested and jealous ambition, or of sheer ignorance. It has been proved beyond doubt that the Congress is not only not disloyal but more loyal than they themselves can profess themselves to be. Their bitter invectives against and their blind tho' impotent opposition to the Congress—a humble and voluntary helpmate to Government—are in themselves a sufficient proof of this. But we have very litile to say against such men. We know they are impotent enemies and we need not fear their daggers. We want the sympathy of those who yet hold aloof from the congress merely on the supposition that the Congress is a mere useless expensive fair held at different stations each year. We want to point to them that it is no such thing. The Congress is working slowly and steadiy It has directly and indirectly done us an immence good. Our congress has shown to the world that India has persons that can unite together to discuss matters of vital importance to her and join in one chorus hymn to the Empress of India. It has shown that India is a nation. No one can deny that the construction of our present Legislative Councils is the result of the work of the Congress. Government has been listening to the wise counsel of the Congress though not acknowledging it in so many words. It pretends to turn a deaf ear to its demands but its ear is particularly keen to every syllable that the Congress utters. English nation is a large—hearted and noble nation and knows well how to appreciate just ambition and by degress one right after anotha is conferred upon the British India. Years ago special rights were given to Bombay, Madras and Calcutta to elect members to the Local and Imperial Legisltation Councils Now a Local legislatvie council has been established for the Punjab and Burmah. At present the members are only to be nominated. We have no doubt that in time they will be elected too! Will not all this and much more that may be left unsaid be sufficient to win the sympathy of unprejudiced by—standers? √Berar has the honour of holding the next Congress in its capital. Let every one join the cause with a will. Berar has a very awkward position. It is neither a province under the control of the State of Hyderabad nor is it under the direct control of the British Government and so it has been labouring under one great disad—vantage—one great political disability. While Bombay, Madras and Calcutta can send members to the local and legislative councils, Berar merely has to submit to the tutelage of the Residency here. May we hope that the question of securing for Berar a similar right be mooted in the coming congress.

We have little doubt that the grievances complained of by the *New Resident* in our last issue have the attention of the Postal Superintendent of Berar. We should like to go still further and point out that the Post Offices—both the General Post Office and the Sub Post Office at the Railway Station— are not really as useful to the Akola public—even the commercial public— as they ought to be both being very ill situated.

A Post Office ought to be situated in the commercial and business centers, while each of them is at a distance of more than a mile from these. We are quite confident that even if the Postal Department is not inclined to increase the number cf Post Offices here, it can with the same expense, with the same number of Post Offices be more useful to the public only by altering their situation. If we look over the daily returns of business of the Sub Post Oifice at the Railway Station, we shall see that the work done there is by no means much smaller than that that done in the General Post Office, and yet the number of hands there is very small Besides a Post Office at a Railway Station is primarily intended only as a station for the Mail Agent. We do not see why one Post Office should not be opened in the heart of the city just on the same scale as that of the Post Office at the Railway Station. All business except that of the Mail Agent should be transferred to this Post Office.

People will be highly cbliged if the Postal authorities will increase the utility of the Post Office at the Railway Station by transferring it to the central quarters of Akola. The clearance of Letter boxes is certainly ill timed to the wants of the public These are little things of minor details and arrangement, but if they are not carefully carried out this slight oversight entails a train of numerous inconveniences to the routine of business. Money Orders, Registration of Letters and Value Payable Parcels, Savings banks and several other departments of the greatest importance and utility will well serve the public interests provided they are placed within an easy reach of the public.

"While we speak of artificial refrigeration, it should be remembered that there is nothing essentially artificial about it. The process of refrigeration is merely a loss of heat. Water loses heat to the air, and freezes in winter; cream loses heat to the ice, and freezes in an ice cream freezer; water loses heat to an ammonia coil, and freezes into ice in a tank; meat and vegetables lose heat to cold brine pipes and are preserved. In all cases the the process is the same, and one is as natural as the other.

The only part that might truly be called artifical is the method of getting rid of the heat after the process of rafrigeration has concentrated it in the circulating medium. No difference therefore exists between refrigeration and cold of winter, except that the former is constant and under control while the latter is widely and erratically variable, for which reason the resources of nature have not been able, even in cool latitudes, to compete with the art of man in the useful application of low temperatures to the preservation of perishable material."

Cassier's Magazine.

## वऱ्हाड

हवामान— पुन्हा थंडी थोडीशीं पडूं लागली. गेल्या मंगळवारीं वारा अती तुफानाचा सुटला होता आणि पुष्कळ ठिकाणीं झाडांची वगैरे पडझड झाली. पावसाचें डंबर मोठच वाढलें होतें. क्कचित् गारपीटाचा पाऊस पडला. हवा निरोगी नाहीं.

दुष्काळाच्या कामा निमित क्याप्टन आयव्हर्स व रा. रा. सी. शामराव हे दोघे आफिसर अनुक्रमें बाळापूर व महान या गांवाकडे लवकरच जाणार आहेत.

रा. रा. लक्ष्मण गोविंद ओक यांनीं चालूं महिन्यापासून आपल्या नोकरीची रजा घेतली आणि ते आकोलें शहरींच वकीलीचा धंदा करणार आहेत. त्यांच्या डिपुटी कमिशनर कचेरींतिल ६० रुपये पगारावर कोणाची नेमणुक होणार आहे हें अजून कळत नाहीं.

वे० रा. रा. श्रीधर शास्त्री भडगांवकर हे हल्लीं येथें आले असून ते कीर्तन करीत असतात. काल त्यांचें येथील लायब्ररींत व्याख्यानही झालें. व्याख्यानाचा विषय वेदान्त हा होता.

## बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ८८ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६।= रु० मण |
| तूप | ६॥ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८९ |

## वर्तमानसार.

वायव्य प्रांताहून आलेले मुख्य दाक्तर हाफकीन यांनीं आजपर्यंत या रोगासंबंधी तपास करून असा शोध काढला आहे कीं, एकदां मनुष्यास देवी काढल्या ह्मणजे जशा पुन्हा त्यास देवी निघत माहींत, त्याप्रमाणें मनुष्याच्या अंगांत एक प्रकारची लस घातली असतां त्यांस ह्या ग्रंथीक तापाचें वीष लागूं पडत नाहीं. ही लस सदर दाक्तर साहेबांनीं घोड्यावर प्रयोग करून तयार केली आहे व त्याचा प्रयोग त्यांनीं गेल्या आठवड्यांत आपणा स्वतःवरही करून पाहिला व तो फलद्रुप झाला असें त्याचें मत आहे. गेल्या बुधवारीं भरलेल्या म्युनिसिपालिटीच्या स्टांडिंग कमेटींत त्यांचें पत्र रुजूं करण्यांत आलें होतें त्यांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, ' हल्लीं जो शोध मी चालविला आहे त्यांत हा विषारी ताप उत्पन्न करणारे जंत वाढविण्याचे प्रकार शोधून काढले आहेत. ह्या वाढलेल्या जंतूंचें वीष इतके तीव्र असतें कीं साधारण एक दोन थेंब एकाद्या लठ्ठ उंदराच्या पोटांत गेले असतां ते त्याचा संहार करूं शकतात. हे जंतू पोसलेल्या प्रवाही लसींत, राईचा अर्क अथवा कारबॉलिक ॲसिड टाकल्यानें अथवा उष्णतेची आंच दिल्यानें त्यांतील जंतू मरण पावतात मग ती लस मनुष्याच्या अथवा जनावराच्या शरीरांत कितीही गेली तरी त्यापासून कांहीं नुकसान होत नाहीं; पण उलट ती लस त्यांचे शरीराचें संरक्षण करण्यास कारणीभूत होते. एका उंदरास पांच दिवस हें औषध दिल्यानंतर त्याच्या शरीरांत हें विषारी पोसलेले जंतू घातले तर, इतर १० उंदरांस मरण्यास ह्या जंतूंचें जितकें वीष लागेल, तितकें तो सहज सहन करूं शकेल. ह्मणजे त्याच्या शरीरावर त्या विषाचा परिणाम होणार नाहीं. याप्रमाणें खातरी झाल्यानंतर याचा परिणाम मनुष्यांवर कसा होतो, याचा अनुभव पाहण्याकरितां तारीख १० रोजी मी स्वतःवर याचा प्रयोग करून पाहिला. १० क्युबिक सेंटिमिटिर लस ७० डिग्री सेंटिग्रेडपर्यंत उष्णता एक तासपर्यंत देऊन नंतर ती लस मी आपल्या कुशींत घातली. त्यापासून असा परिणाम झाला कीं, त्या ठिकाणीं दुखूं लागलें व ताप चढूं लागला. तो ८॥ तासांत १०२ डिग्रीपर्यंत चढला व डोकें दुखण्यास सुरुवात होऊन चक्कर येऊं लागली. त्यानंतर तापाचा जोर कमी होत गेला. ज्या ठिकाणीं लस दाखल केली होती त्या ठिकाणीं होत असलेली इजा दुसरे दिवशीं साधारण राहून पुढें ती नाहींशीं झाली व ज्या ठिकाणीं एक लहानशी गांठ आली होती तीही शरीरांत मुरली. प्रयोग शाळेंत केलेल्या प्रयोगावरून माझा अभिप्राय असा झाला आहे कीं, अशा प्रकारे ही लस मनुष्याचे शरीरांत घातल्यास ह्या विषारी तापाचा अंमल होऊं शकणार नाहीं. परंतु अशा प्रकारें लस घातल्यापासून किती दिवसपर्यंत तिचा अंमल मनुष्यावर राहूं शकेल याचा अनुभव घेतला पाहिजे. तसेंच (१) मनुष्याच्या शक्ती प्रमाणें त्याच्या शरीरांत किती घातली पाहिजे. (२) लस घातल्यानंतर किती दिवसांनीं तिचा अंमल मनुष्यावर होईल व (३) लसीचा अमल झाल्यापासून तिचा जोर किती दिवस राहूं शकेल. इतका गोष्टीचा निर्णयहोणें आहे. व याचा अनुभव पहाण्याकरितां ही लस कित्येक दाक्तरांस देण्यांत आली आहे.

ह्मैसूरच्या पहिल्या राजकन्येचा विवाह मि. कांतराय यांच्याशीं ता. १९ फेब्रुवारी रोजीं होण्याचें ठरले असून त्याबद्दलची निमंत्रणपत्रेंही हिंदुस्थानच्या सर्व राजेरजवाड्यांस पाठविण्यांत आली आहेत.

मुन्सफ, हायकोर्ट व डिस्ट्रिक्ट कोर्टाचे वकीलीची परीक्षा मुंबईतील सांथीमुळें ता- २१ जूनपर्यंत तहकूब ठेवण्यांत आली आहे.

सरदार महमद उमराखान याची नेमणूक जलालाबादच्या जागीं झाली.

मंडाला येथें पाऊस नसल्यानें पीकें बुडत चाललीं आहेत.

दक्षिण ब्रह्मदेशांत भाताची कापणी व मळणी सुरूं झाली आहे.

बंगाल्यांत फॅमिनरिलीवर्कस वर चरितार्थ करणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे.

मुंबईतील भयंकर सांथीमुळें मुंबई ब्यांकेची एक शाखा सुरतेस लवकरच उघडण्यांत येणार आहे.

मुंबईतील सालिसिटर लोकांनीं सभा करून हायकोर्ट बंद करण्याविषयीं चीफ जस्टीसास अर्ज करण्याचें ठरविलें आहे.

रत्नागिरी, अहंमदनगर, खानदेश, कानडा, नाशिक, आणि ठाणें ह्या ठिकाणीं रिंडरपेस्ट नामक रोगाची सांथ चालू आहे.

स. वि.

सन १८३० सालीं जोसेफ गिलट (प्रसिद्ध स्टीलपेनाची युक्ति काढणारा) हा जवाहिऱ्याचे काम करणारा होता तो जडावाचें काम करीत असतां त्याला एका पावतीवर सही करण्याचें काम पडलें व पेन जवळ नसल्यामुळें त्यानें त्या पिंजलेल्या हत्यारानेंच सही केली त्यावरून त्यानें स्टीलची पेनें (टांक) करण्याची युक्ति काढिली.

कोळ्याचें जाळें चार मेल लांब तंतूचें असलें तर त्याचें वजन एक ग्रेन भरतें.

आपला समज असा आहे कीं, चिनी लोक झुरळें खातात. परंतु परवां एके ठिकाणीं वाचण्यांत आलें कीं, चिनी लोक जाणून बुजून झुरळांस मारीत नाहींत. ते प्राणी मोठे पवित्र असा त्यांचा समज आहे. त्यांजवर पाय पडणें ह्मणजे मोठी अनिष्ट गोष्ट असें ते ह्मणतात.

ज्वालामुखी पर्वताच्या उद्रेकांच्या योगानें या शतकांत सुमारें १२ बेटें नवीन उत्पन्न झालीं व १९ नष्ट झालीं. क०

हिंदुस्थानच्या दुष्काळाकरितां विलायतेस १ लाख पौंड ह्मणजे सुमोरें १॥ कोट रुपये तावडतोब जमवून पाठविण्याचा व इतर वसाहतीच्या गव्हर्नरांसही वर्गणीबद्दल विनंती करण्याचा लार्ड मेयरनीं निश्चय केला आहे.

मुंबईतील लार्डरे मिल, प्रेसिडेन्सी मिल व लक्ष्मीदास खिमजी मिल्स या गिरण्यांतील कामगार लोक निघून गेल्यामुळें त्या बंद पडल्या-

रंगून व मूलमीन येथून भरपूर तांदूळ आणण्याची खटपट कलकत्ता येथील २ कंपन्यांनीं चालविली आहे. क० त०

मुंबईची दूषित घरें विकत घेऊन पाडून टाकण्याबद्दलचा म्यु. पा. कडून सूचना होऊं लागल्या घरांचे भिंतींचे आंतीलच हवा बिघडली असेल तर ठीक आहे.

बंगरूळ येथील एका नेटिव्ह बॅरिस्टरानें पोटास मिळत नाहीं ह्मणून आत्महत्या करून घेतली.

हिंदुस्थानच्या जंगल खात्यांतल्या खालच्या प्रतीच्या नोकरांच्या पगाराचें रिविजन करण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली. यांत अजमासें २, ८०,००० रुपये खर्च वाढणार आहे.

रेलवेंत आग—पंजाबांत फिलौर स्टेशना जवळ एका मालगाडींत आग लागली होती तींत बऱ्याच मालाचें नुकसान होऊन कांहीं बैल व माणसेंही मेलीं.

चोरी—गेल्या मंगळवारीं रात्रीं कलकत्यास जाणाऱ्या मेलगाडींत रोकडे रुपये भरलेल्या थैलीची तिजोरी चोरीस गेल्याची बातमी मिळाली आहे.

रशिया उढाऊ गलबतें व सामान करण्याचीं जारीनें तयारी करीत आहे.

मद्रास इलाख्यांत दुष्काळाचे कामावर आजमासें २५,००० लोक आहेत. मुंबई इलाख्यात ३४,००० बंगाला ३५,००० वायव्यकडील प्रांतांत २२,७०,००० मध्यप्रांत ४५,०००, ब्रह्मदेश ३८,०००, मध्य हिंदुस्थानांत ६०,००० व राजपुतान्यांत ३७,०००, इतकीं मनुष्यें दुष्काळाचे कामावर आहेत.

सांथीच्या भितीनें नाशिकाकडे जे लोक गेले आहेत त्यांपैकीं थोडथोडे आतां परत येऊं लागले आहेत. त्यांस इकडे येण्याचें कारण विचारतां ते ह्मणतात कीं, बाहर उपासमारानें मरण्यापेक्षां मुंबईत सांथीनेच मरण आलेलें बरें.

जि. कुलाबा ता. कर्जत पैकीं कोढावणें हा गांव जळून खाक झाल्यामुळें तेथील लोक अगदीं निराश्रित झाले आहेत. अशांना मदत करणें हें धनिकांचें कर्तव्य आहे.

बचुनालाड येथें पुन्हा कांहीं गडबड सुरूं झाली आहे. आ० व.

गोव्याचा दंगा चालूच आहे, सरकारी शिपायी व दंगेखोर यांचे सामनें होत असून सरकारी शिपाईच मरतात. लोकांस अन्यायानें कैद करून इन्साफावाचून काळ्या पाण्यावर पाठविणें लोकांची घरें जाळणें वगैरे प्रकार सरकारच्या हातून होत असल्यामुळें लोकांत नाखुषी वाढत आहे. शांतता कधीं होणार समजत नाहीं.

निझामच्या राज्यांत आतां जरी दुष्काळाची भीती फारशी राहिली नाहीं तरी निझामाचा जमीनधारा ३० लाख रुपये वसूल होण्याची आशाच नाहीं असें सांगतात. इंग्रजींतही त्याच मानानें सूट देण्याचीं तजवीज चालू आहे काय?

अजमीरच्या एका हमालाचा ६।७ वर्षांचा मुलगा बापाच्या त्रासाने आगगाडींत बसून झाशीस जातांना पकडला. टिकीटास पैसे नसल्यामुळें चोरून जात होता व आपणास कोणी पकडूं नये ह्मणून अशा एका बिकट जागीं लपून बसला होता कीं त्या जाग्यांत त्यास लपून बसलेला पाहून सर्वांस आश्चर्य व भयही वाटलें. वाटेंत २।३ ठिकाणीं गाडी बदलल्ये व त्या त्या ठिकाणीं सर्वांची नजर चुकवून युक्तीनें उतरून नव्या गाडीतही तशाच अडचणीच्या जागीच बसला व तें पाहून सर्वांत फारच आश्चर्य वाटलें हल्लीं तो पालसाच्या ताब्यांत आहे.

युरोपांतील राजकीय खटपटी.

विलायत सरकारानें आपल्या दोन लढाऊ गलबतांस तावडतोब आफ्रीकेच्या पश्चिम किनाऱ्यावर जाण्याचा हुकूम केला. कारण ?

हिंदुस्थानचा दुष्काळ हें सरकारच्या कडक कारभाराचें फळ आहे व दुष्काळफंड जो सरकारानें जमा केला आहे तें सरकारच्या अन्यायी वर्तनाचें प्रदर्शन आहे असें विलायतच्या कांहीं लोकांचे ह्मणणें आहे.

मुंबईच्या सांथीमुळें इटालीनें हिंदुस्थानचा कापूस आपल्या हद्दींत येण्याची बंदी केली फ्रान्स व बेलजम यांनीं हिंदुस्थानांतल्या चिंध्या आपल्या राज्यांत येण्याची बंदी केली.

मुंबईस जी तापाची सांथ सुरू झाली आहे ती आपल्याकडे न यावी ह्मणून काय तजवीज करावी याबद्दल युरोपातले बडे राजे विचार करीत आहेत काल्ऱ्याचे वेळी हिंदुस्थानांतले कांहीं पदार्थ आपल्या देशांत येण्याची बंदी करण्यांत येते त्या प्रमाणें या वेळेही करावें असें फ्रान्स, इटली व बेलजम या सरकारांनीं आपल्या कामदारास हुकूमही केले. ठा० अ०

सुरतेस पुनरुद्धार—मुंबईहून गेलेल्या जवाहिरवाल्या व्यापाऱ्यांनीं सुरतेस मोठा तेगार मांडला आहे. शेट प्रेमचंद रायचंद हे धनाढ्यशेटही सुरतेस गेले असून सुरत शहर मुंबई सारखें वसव वयाचें असा विचार व्यापाऱ्यांनीं चालीवला आहे; असें झाल्यास सुरत बंदरांत युरोपांतून येणाऱ्या मालाच्या आगबोटी लावण्याची व्यवस्था करावी लागेल कमर्शियल व नॅशनल ब्यांकांनीं व इतर पेढीवाल्यांनीं सुरतेस आपल्या शाखा स्थापन करण्याच्या तयाऱ्या चालविल्या आहेत असेही समजतें,

आगबोटी दगावल्या-सिटी ऑफ सेटरबरी नांवाची आगबोट कलकत्यास हुगळी नदींत साफ बुडाली, त्यामुळें खाडी अडून दुसऱ्या आगबोटी आंत जाण्यायेण्यास हरकत झाली असून व्यापारी लोक फिकरीत पडले आहेत, वारनहेस्टींग नांवची सरकारी आगबोट ह्या आठवड्यांत फुटली, वरील युरेपियन सैन्य मात्र निभावले, दुर्मुखसवत्सरानें अनर्थाची परमावधि केली खरी!! स० शो०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ २ „ ०८
साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8
Six monthly......... 3 ...... ... ..„ 8
Single copy ............... ....... .. 4

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 a
Repetition Per line ...3 a

VOL XXXI | AKOLA MONDAY 8 FEBRUARY 1897 | NO 6

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १८९७ इ० | अंक ६

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

## जाहिरात

या लेखानें सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं रा. रा. रामविलास जीवनराम यास कुलमुखत्यारी वरून काढलें आहे तेव्हां त्यांच्याशीं कोणी कोणत्याहि प्रकारचा व्यवहार माझ्या दुकानासंबंधानें कोणी करूं नये. जो करील तो स्वतां जबाबदार राहील. तारीख २६।१।९७.

( सही )

बद्रीनारायण बलदवा राहणार आसतरा ता. व जिल्हे नांदेड.

## नोटिस

रा. रा. रामविलास जीवनराम मारवाडी ब्राह्मण राहणार आकोला यास कळविं कीं तुमची कुलमुखत्यारी रद्द केल्याविषयीं तुह्मास पूर्वीच कळविलें आहे. दुकानचा व्यवहार कोणत्याही प्रकारचा तुह्मी करूं नये. जर कांहीं देवघेव किंवा व्यवहार कराल तर त्याची दिवाणींतली व फौजदारींतली जबाबदारी तुमच्या शिरावर राहील कळावें. तारीख २६।१।९७.

[ सही ]

बद्रीनारायण बलदवा राहणार आसतरा ता. व जिल्हे नांदेड.

श्रीमती मथुराबाई मराठे या मुंबईहून येथें आल्या आहेत. त्यांच्या पत्रावरून त्या अल्पवयी आहेत तथापि त्यांस इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी थोडथोडें येतें. कविता करण्याचा या बाईस नाद आहे. यांनीं रचलेल्या नवीन कविता मासल्यासाठीं आह्मी खालीं देत आहों. प्रयत्न नवीन असून बरा साधला आहे.

## सत्य

( आर्या )

सत्याचा कर सौदा झटुनी संसाररूप बाजारीं।
सौदागिरा नरा तरि घेतिल जन हे तुला स्वशेजारीं ॥१
धांवे जशी स्रवंती भंगकरें सिंधु-कांत-संगातें।
सत्याप्रती तसा जा माता शिशु-चुंबनार्थ वा गा ते ॥२
रत्नोत्तमा परीहि रत्न असें हें अमोल्य इहलोकीं।
स्वल्प श्रमें न मोलें गवसें दृढ निश्चयेचि अवलोकीं ॥३
कल्पद्रु दे सुरां वा भक्त-सु-वृंदा दयाळ गोविंद।
सत्य तसें संकल्पित, यास्तव नृत-रत्न-माल गा विंद ॥४
सत्य-सुरत्न- सुमाला तत्कंठा जेवि सुंदरागालीं।
तो मेघवर्ण तीलक शोभत वा चंद्र शंकराभालीं ॥५
दावील मुक्ति-पंथ चि अंधा यष्टी जसा तमीं दीप।
भव-शृंखला हरोनी सिंह जसा मत्त कुंजराधीप॥६
सत्यश्रीसंचय करि संतत मधुमक्षिके परी वांया।
काल न दवडीं मनुजा, झट मधु सत्यामृतासि सेवाया ॥७
सत्यासि मान देतिल सुज्ञ जसा पद्मनाथ गोपाला।
सुरकिन्नरादि किंवा रंक करा जोडुनी सुभूपाला ॥८
येतां सभेंत जैशी स्वपति गळां माळ घालिते नवरी॥
सुरपुरिं वा इहलोंकीं अवलोकीं विजय सत्य तोंचि वरी ॥९॥
इतरालंकारातें तस्कर नेईल काल जैं प्राण॥
परि सत्य भूषणोंतें शक्य न न्याया कुणी न भय जाण ॥१०॥
मुक्तिपदाद्री वरती धर्म महा पंडुराय सुत चढला॥
रवि वंशज भूप हरिश्चंद्र तसा निश्चयें नृतें तरला ॥११॥
वर्णोनि सत्य मौल्यचि मार्गे विश्रांति दास हा मास॥
विज्ञप्ति मान्यहो ही पुनरपि भेटेल प्रीतिनें खास ॥१२॥

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ६ शके १८१८

वऱ्हाडच्या राज्यकारभाराचा वार्षिक रिपोर्ट सन १८९५-९६ सालचा आह्माकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. एकंदर उत्पन्न रुपये १,१३,१४,४२६-८ आणे-८ पै असून खर्च रुपये १०१,८९,८०९-४ आणे ५ पै झाला आहे ह्मणजे सर्व प्रांताच्या राज्यकारभाराची शिल्लक रुपये ११,२४,६१७-४ आणे ३ पै निघाली. सरकारी राज्यव्यवस्थाच मोठी चमत्कारिक आहे. उत्पन्न वाढतें तसतसें खर्चाचें प्रस्थ माजत जातें; आणि अलिकडे उत्पन्याच्या व खर्चाच्या रकमांला कांहीं धरबंध राहिला नाहीं. १८९५-९६ सालीं निजाम सरकारास रुपये २९१७२६ दिले ते वजा जातां वऱ्हाड सरकारापाशीं सध्यां शिल्लकेंत रुपये ४२०२,२६२ आहेत. ही रक्कम वास्तविकपणें निजाम सरकारच्या मालकीची आहे पण ब्रिटिश राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठीं ह्मणा किंवा अन्य राजकीय कारणामुळें ह्मणा ती आमचे इंग्रज सरकार निजाम साहेबांस सध्यां परत देत नाहींत असा रंग दिसतो. पुष्कळ वर्षांपासून ही शिल्लक ओढली जात आहे आणि वऱ्हाड प्रांताची श्रीमंती खरी आहे असा एवढ्या शिलकेवरून मात्र गैरसमज होण्या सारखा आहे.

गेल्या तीस वर्षांपूर्वी ह्मणजे १८६५-६६ सालीं वऱ्हाडचें उत्पन्न सरासरीं ५१ लक्ष रुपये होतें; आणि खर्च एकंदर ४९ लक्ष रुपये होता. या खर्चापैकीं पब्लिक वर्कस खात्याकडे ५ लक्ष व राज्यव्यवस्थेसाठीं १५ लक्ष मिळून २० लक्ष रुपये खर्च झाला आणि लष्करीखात्याचा खर्च २९ लक्ष रुपये होता. १८९५-९६ सालीं उत्पन्न शेंकडा १०० प्रमाणानें वाढलें आहे; पण पब्लिक वर्कस खात्याचा खर्च त्याच प्रमाणानें वाढला असून लष्करी खर्च २९ लक्षांचा ३८ झाला आहे. मात्र सिव्हील खर्चाच्या वाढीचें प्रमाण शेंकडा ३०० आहे ह्मणजे राज्यव्यवस्थेच्या निमित्तानें खर्च अतिशय वाढविला आहे. खरोखर ही स्थिती अर्थशास्त्रदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या चांगली नाहीं. खर्च अतोनात वाढला आणि उत्पन्नही अतोनात वाढलें यावरून प्रजेवर करांचा बोजा फार बसविला आहे आणि सरकारच्या देण्याखालीं प्रजेच्या वित्ताचा चुराडा होत आहे हें उघड होईल. वऱ्हाडची श्रीमंती हल्लीं दिखाऊ आहे पण सामान्यतः जनसमूह भिकारदशेला अती पोचला आहे. ब्रिटिश राज्यव्यवस्था आणि निजाम सरकारची मालकी या जोडगोळीनें सर्व प्रांत अगदी जेरीस आला आहे.

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

( रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला. )

शिक्षकास वाटतें, भलतेच प्रश्न विचारले जातात, आणि परीक्षकास वाटतें, विषय बरोबर शिकविला गेला नाहीं. यांतलें वर्म शिक्षकांचें अज्ञान हें वास्तविक असून एकास वाटतें कीं यानें शिकविलें नाहीं व दुसऱ्यास वाटतें कीं यानें हें विचारूं नये. यांतलें मूळ उभयतांच्या लक्ष्यांत येईल तर तंटा मिटलाच. परीक्षकास वाटतें शिक्षकास येत असून त्यानें शिकविलें नाहीं व शिक्षक तर जाणतो कीं आपली कमाल करून आपण शिकविलें आहे. कदाचित् परीक्षकास वाटत असेल कीं याला येत नसेल तथापि यानें खटपट करून तयार करावें आणि शिकवावें. पण कांहीं अंशीं सोय नसल्यामुळें आणि कांहीं अंशीं शरमेमुळें शिक्षकाच्या हातून तसें घडत नाहीं. क्वचित् प्रसंगीं शिक्षकाच्या आळसामुळें विषय चांगला शिकविला जात नसेल. तो विचार वेगळा. पण आमची पूर्ण खात्री आहे कीं जो विषय ज्याला चांगला येतो तो त्याच्यानें शिकविल्यावांचून राहववणार नाहीं, आणि कांहीं शिक्षकांच्या कामांत कांहीं विषय चांगले शिकविलेले आढळतात, व कांहीं साधारण शिकविलेले आढळतात, याचेंही वर्म हेंच होय. या विषयांतरांत आमचा इतकेंच दाखविण्याचा हेतु आहे कीं बहुतेक उदाहरणांत जेथें विषय मुलांस चांगला येत नाहीं तेथें शिक्षकांचें स्वतःचें अज्ञान हें मुख्य कारण आहे.

२ आतां तिसरी गोष्ट ह्मटली ह्मणजे नियमन ही हाय. ही ठेवतां येण्याला शिक्षकाच्या अंगीं पहिला गुण ह्मटला ह्मणजे चांगली विद्या असणें हा होय. चांगली विद्या ह्मणजे, जें शिकवायाचें आहे तें उत्तम शिकवितां येणें इतकाच अर्थ घेऊं. या गुणाची थोरवी एवढी असते कीं सद्वृत्त तसेंच दुर्वृत्त विद्यार्थ्यांवर शिक्षकाचें आपोआप विलक्षण प्रकारेंच वजन राहतें. याची उणीव वाग्दंडानें किंवा शरीर दंडानें तशी चांगली भरून येत नाहीं. दुसरा गुण शिक्षकाच्या अंगीं सौजन्य किंवा संभाविती हा होय. शिक्षकाचें वर्तन अध्यापन संबंध शिवाय करून मित भाषणाचें व तेंही गांभीर्ययुक्त अशा प्रकारचें असलें ह्मणजे, शिष्य अनायासें सद्वृत्त होतात.

तिसरी गोष्ट शिक्षकाचें सदाचरण होय. सदाचरणी मनुष्यांस जसें समाजांत सर्वच लोक मान देतात व थोडे बहुत वचकतात तीच गोष्ट मुलांसही लागू आहे. चवथी गोष्ट शिक्षकाचा कृपाळूपणा होय, विद्यार्थ्याच्या दुःखाबद्दल, दीनपणाबद्दल शिक्षकास कळवळा वाटला असतां आणि त्यांस तो होईल तितकें साहाय्य करण्यास तत्पर दिसला

असतां त्याच्या बद्दल विद्यार्थ्यांस लोभ वाटतो.

पांचवा गुण शिक्षकाच्या आंगचा इनसाफी पणा ह्मणजे शांतिपूर्वक शिष्यांच्या दोषांचीं कारणें ऐकून घेऊन, त्यांस योग्य रीतीनें दोषी किंवा निर्दोषी ठरविणें हा होय. याच्या योगानें विद्यार्थी सत्यशील आणि प्रामाणिक निपजतात व शिक्षकांशीं सरळ भावानें वागतात. इतके गुण शिक्षकाच्या अंगीं असले ह्मणजे, त्याच्या वर्गांत पूर्ण नियमन राहतें आणि त्याचें व्याख्यान ते सावध चित्तकरून ऐकतात व निरंतर आज्ञाधारक राहतात. नियमनाचा एकंदर हेतू हाच होय व तो सिद्धीला जाऊन देहदंडणाची किंवा कोणत्याही अप्रियपणाची आवश्यकता रहात नाहीं.

ज्या ठिकाणीं नियमन नसतें व तेणेंकरून देहदंडाची वगैरे अपेक्षा लागते त्या ठिकाणीं वर सांगितलेल्या गुणांचा न्यूनाधिक्यें करून अभाव असतो असें अवश्यमेव समजावें.

यावरील आवश्यक गोष्टींचा विचार करून आह्मी उत्तम शिक्षक कोण या विचाराकडे वळतो. आतां प्रथम गणित विषय शिकविण्या संबधानें विचार करूं.

संख्येचें आणि साध्या बेरजेचें तत्व काय? गुणाकारांत उजवीकडूनच अंक घेऊन कां गुणावें? भागाकारांत एकएक अंक घेऊन भागाकारातील अंक उतरते कसे जातात? गुणाकार हा बेरजेचा संक्षेप कसा? आणि भागाकार हा वजाबाकीचा संक्षेप कसा? प्रमाण गणितांत प्रमाणें अमुक तऱ्हेनें मांडायाची, अमक्यानें गुणायाचें, अमक्यानें भागायचें, चक्रवाढ व्याजांत एक मुद्दल धरून त्याची रास करून नंतर वर्ग, घन, किंवा अन्य कोणता घात करायाचा. Discount आणि Stocks ही व्यापारातलीं काय खटलीं आहेत, वर्गमूळ आणि घनमूळ यांच्या रीती कशा बसविल्या आहेत या सर्व गोष्टी गणित शिकवितांना उत्तम शिक्षक मुलांस शिकवील. याप्रमाणेंच बीजगणित आणि सिद्धांत याविषयीं समजावें. Prose शिकवितेवेळीं व्याकरण आणि पृथक्करण (Analysis) यांच्या योगानें वाक्यरचना मुलांस समजावून देऊन शब्दांचे रूढ आणि यौगिक अर्थ सांगून, प्रतिपाद्य विषयाचा उपक्रम कसा केला आहे, त्याचें उत्तरोत्तर वर्णन कशा अनुक्रमानें केलें आहे, आणि त्याचा उपसंहार कसा केला आहे, हें दाखवून निबंधरचना कशी करावी हें समजवून देईल, तसेंच जे जे पदार्थ धड्यांत येतील त्यांचें ज्ञान मुलांस प्रत्यक्ष करवून देईल आणि शद्बांचीं वजनें आणि अर्थव्याप्तिही सांगेल. कविता शिकवितांनां वृत्तांचें ज्ञान सांगेल, श्लोकांतील अलंकार सांगेल, आणि काव्यांतील नीतितत्वें सांगून ज्या प्रसंगा संबंधानें काव्य लिहिलें असेल ते प्रसंग मुलांस सांगून काव्याचें सौंदर्य कोणत्या गोष्टींत असतें याही गोष्टी मुलांस समजवून देईल.

इतिहास शिकवितांना ज्या काळाचा इतिहास शिकवावयाचा आहे त्या काळांत आरंभापासून शेवटपर्यंत त्या देशाची सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि राजकीय स्थिति कशी वाढत गेली, किंवा ऱ्हास पावली हें मुलांस कार्यकारणभावें दाखवून, व्याख्यान किंवा गोष्ट या प्रमाणें सांगेल. तसेंच ज्या देशाचा इतिहास शिकवील. त्या देशाचा भूगोल मुलांपुढें ठेऊन, ज्या स्थलीं ज्या गोष्टी घडल्या तीं स्थळें त्यांस दाखवून भूगोल आणि इतिहास यांचा निकट संबंध ठेवील. मुलांच्या हातीं कोणतें पुस्तक आहे याचा तो विचार करणार नाहीं.

भूगोल शिकवितांना तो प्रथम नकाशा पासून आरंभ करील आणि पृथ्वीच्या गोलाचे भाग नकाशावर सपाट कसे काढले आहेत हें दाखवील. Latitude, Longitude कर्क मकरादि वृत्तें यांच्या कल्पना समजावून देईल आणि हवेचें शीतोष्णत्व सांगेल. कोणत्या प्रकारच्या हवेंत आणि जमिनींत कोणत्या प्रकारचीं पिकें होतात, कोणत्या देशांतून बाहेर माल जातो आणि काय माल जातो वगैरे माहिती सांगेल. तसेंच जीं जीं स्थळें तो नकाशांत मुलांस दाखवील त्या त्या प्रत्येक स्थळाबद्दल त्यास तो माहिती सांगेल.

शास्त्रीय विषय शिकवितांना तर तो आपल्यावर फारच जबाबदारी घेईल. कारण त्यांचें ज्ञान त्याच्या साहाय्यावांचून विद्यार्थ्यांस बिलकूल व्हावयाचें नाहीं. या करितां ते विषय तो मुलांस सप्रयोग शिकवून दाखवील, व हें ज्ञान प्रत्यक्षवत् मुलांस करून दिल्यावांचून तो राहणार नाहीं. पदार्थ विज्ञानशास्त्राचे धडे शिकविते वेळीं तो पदार्थ पुढें ठेवून शिकवील. वनस्पतींचें किंवा भिन्नभिन्न प्राण्यांचें वर्णन सांगतेवेळीं त्या त्या वनस्पती व ते ते प्राणी तो समोर ठेवून त्यांचें ज्ञान करून देईल. हें उत्तम शिक्षकाचें लक्षण झालें. आतां त्यानें जरी इतक्या उत्तम प्रकारें शिकविलें तरी त्याचा परिणाम कितपत होईल हें सांगतां येत नाहीं. आपणा सर्वांस असें वाटतें कीं या प्रमाणें मुलांस शिक्षण दिलें पाहिजे; परंतु त्यांच्या अधिकाराविषयीं विचार करून त्या मानानें तें द्यावें, किंवा उत्तम शिक्षकाची जितकी शक्ति असेल तितकी त्यानें आपल्या विद्यार्थ्यापुढें ओतावी, हें विचारणीय आहे या करितां याविषयीं थोडासा विचार करूं. सर्व गोष्टींस काल ह्मणजे योग्यवेळ ही लागलीच आहे. किती जरी उत्तम कारागीर असला तरी ज्या गोष्टीवर तो क्रिया करणार, ती गोष्ट त्याच्या क्रियेचा व्यापार ग्रहण करण्यास योग्य असल्यावांचून तिजवर ती ती क्रिया चांगली वठणार नाहीं असें वाटतें. ज्या जमिनींत पुष्कळ खत घालून ती पुनः पुन्हा नांगरून कांहीं वर्षां नंतर तिच्या अंगीं उत्तम सुपीकता येणार आहे तींत प्रथमच उत्तम बीज घातलें आणि त्यांतलें त्यांत कारागिरानें किती जरी कमाल केली, तरी बीज व्हावें तितकें फलप्रद होणार नाहीं व श्रम बऱ्याच अंशीं व्यर्थ जातील.

येन्नवे भाजने लग्नः संस्कारो नान्यथा भवेत् ।

या वचना प्रमाणें जरी संस्कार अगदीं फुकट गेला नाहीं तरी श्रम पुष्कळच फुकट जातील यांत कांहीं संशय नाहीं. दुसरें एक उदाहरण घेऊं. वेदांत तत्वें कळण्याचा अधिकार सामान्यतः मनुष्यास निम्मे वयाच्या पुढें येतो. तींच तत्वें जर मुलांस पंधरा वर्षांच्या आंत शिकविण्याचा कोणी यत्न केला तर तो यत्न श्रमाच्या मानानें कितपत सिद्धीस जाईल? आपण कीर्तन लहानपणीं ही ऐकतों व मोठेपणीं ही ऐकतों, जीं नीति तत्वें हरिदास सांगतात तीं नेहमीं सारखींच असतात. पण लहानपणीं त्यांचा आपणास कांहीं बोध होत नसून मोठे पणीं तीं अंतःकरणास इतकीं पटतात व आल्हादकारक वाटतात कीं तीं ऐकल्याबरोबर आनंदाश्रु वाहू लागतात. आमचा स्वतःचा अनुभव असा आहे कीं शाळेंत शिकलेलेच विषय जेव्हा आह्मी शिकवूं लागलों तेव्हां ते आह्माला साधारण कळतात असें वाटूं लागलें व उत्तरोत्तर जसे जसें ते अधिकाअधिक शिकवीत गेलों तसे तसें ते बरेच कळतात असें वाटूं लागलें व कांहीं कांहीं आमच्या अल्प अधिकाराच्या मानानें उत्तम कळतात असें आह्मास वाटतें. पण अझूनही ते उत्तम कळत नसतील. मागें डा० सिंक्लेअर साहेबांनीं त्रिकोण आणि वर्तुळ यांच्या आकृति फळ्यावर सहज काढलेल्या पाहून एके प्रसंगीं ते हायस्कुलांत आले असतां त्या वेळच्या लहान मोठ्या सर्व शिक्षकांस त्रिकोण आणि वर्तुळ हातानें दाखविण्यास त्यांनीं सांगितलें. प्रत्येकानें त्रिकोण दाखवितेवेळीं रेषावरून हात फिरविले व वर्तुळ दाखवितें वेळीं परिघ रेषेवरून बोट फिरविलें. त्यांना कोणाचचें दाखविणें पसंत पडलें नाहीं. मग त्यांनीं स्वतः फळ्यापुढें येऊन आपल्या हाताचा पंजा आंतल्या अवकाशावरून फिरविला आणि त्रिकोण ह्मणजे रेषाच्या आंतली जागा आणि वर्तुळ ह्मणजे परीघाच्या आंतील जागा हें सांगितलें. अशा गमती त्यांनीं अनेक वेळा कराव्या व तुह्मी अझून पोर आहा असें शिक्षकांस दाखवून खऱ्या ज्ञानाच्या गोष्टी त्यांस सांगून त्यांच्यावर उपकार करावे त्या गोष्टी शिक्षकांस मात्र कळाव्या, जवळ असलेल्या विद्यार्थ्यांस समजल्या सारख्या भासाव्या पण त्यांचें वर्म त्यांस कळून येऊन आनंदही वाटूं नये. आह्माला मोठेपणीं जेव्हां कांहीं गोष्टि कळूं लागल्या तेव्हां असें वाटूं लागलें कीं लहानपणीं त्या गोष्टी आह्मास काय कळल्या असतील कोण जाणे? आह्मांला पुष्कळ शिक्षक चांगले होते व त्या त्या वेळीं त्यांनीं आपली कमाल केली असेल. अशा संबंधानें एके प्रसंगीं आह्मी एका विद्वान् मित्राशीं बोलत असतां असें ह्मटलें कीं जसें हल्लीं आह्मी मनापासून मुलांना शिकवितों व एकेक गोष्ट त्यांच्या मनांत भरवून देतों असें आमच्या शिक्षकांनीं केलें नसेल. कारण कांहीं गोष्टी ज्या आह्मांस आतां कळूं लागल्या आहेत त्या पूर्वीं कधींच कळल्या नाहींत असें वाटतें.

यावर त्यांनीं असें उत्तर दिलें कीं तुमच्या शिक्षकांनीं ही असेंच शिकविलें असेल. त्या कालच्या मानानें तुह्माला त्या कालीं तितकेंच समजायचें. हल्लीं ही ज्या गोष्टी आह्मास उत्तम कळतात त्या आमची कमाल करून आह्मी मुलांस सांगतों परंतु जरी त्या त्या वेळीं मुलांस समजल्या सारख्या वाटतात तरी त्या फार दिवस टिकत नाहींत.

[ पुढें चालूं ]

---

लार्ड राबर्टस माजी हिंदुस्थानचे कमांडर इन चीफ यांनीं आपल्या चरित्रांत इंडियाविषयीं पुष्कळ अभिप्राय ठोंकले आहेत. त्यांपैकीं इंडियन पलटणी संबंधाचा त्यांचा विचार स्वकीय बढाई मारण्याचा फार आहे. ते लिहितात कीं इंडियन पलटणी मध्यें ब्रिटिश आफिसर हल्लीं पक्षां अधिक असावेत आणि प्राच्य लोक शूर व लढवय्ये आहेत तथापि दैववशात् त्यांच्यामध्यें आधिपत्य स्वीकारण्या सारखे गुणी लोक नाहींत असें आपला अनुभव व इतिहास सांगतो. हा शेरा टाइम्स कर्त्यांनीं मोठ्या आनंदानें प्रकाशित केला आहे आणि त्यास आपल्या समर्थनें मंडितही केला आहे. हिंदुस्थान देशांत लढाया पुष्कळ झाल्या आहेत आणि त्या त्या वेळीं आमच्या देशांतल्या लोकांनीं मोठमोठे पराक्रम केले आहेत इतकेंच नाहीं तर राज्यें स्थापिलीं, शहरें वसविलीं, आणि जगांतील सर्व कलांचें व विद्यांचें माहेरघर या देशांत बनविलें. लष्करीच काय पण सर्व प्रकारचीं अधिकारसूत्रें आमच्या लोकांनीं मोठ्या निर्विवादपणानें चालविलीं आहेत. शिवाजी महाराज, बाजीराव, रणजितसिंग, महादाजी शिंदे, तुकोजी होळकर इत्यादि नामांकित नररत्नांनीं हा देश शोभायमान झाला होता तेव्हांचे पराक्रमाविषयीं स्मरणशक्तीने लार्ड राबर्टस यांस दगा दिला असें आह्मांस वाटतें. हत्याराच्या कायद्यानें सर्व प्रजा निःशस्त्र केली आहे आणि लष्करी शाळा नेटिवासाठीं नाहींत असें असूनही नेटिव पलटणींनीं ब्रिटिश राज्याचा विजयदुंदुभी सर्वत्र गाजविला आहे तें विसरण्याची कृतघ्नता पाहून फार वाईट वाटतें. अगोदरच लष्करी खर्च फार अवाढव्य वाढला आहे. आणि त्यांत नवीन ब्रिटिश आफिसर अधीक नेमण्या विषयीं सूचना केली जात आहे!

---

ब्रिटिश राज्यकारभाराच्या खर्चा संबंधानें जें रायल कमिशन बसलें आहे त्या पुढें लार्ड नार्थब्रुक यांची साक्ष झाली. लार्ड साहेबांनीं आपल्या जबानींत स्पष्ट कळविलें कीं हिंदुस्थानावर जो खर्च मोहिमांचा वेळोवेळ इंग्लंडानें बसविला आहे तो अन्यायाचा व स्वार्थपरायणतेचा आहे. राज्यकारभाराचा खर्च खरोखर अस्ताव्यस्त व बेताल रितीनें चालला आहे अशा विषयीं इंडियाचे माजी फडणीस सर डेव्हिड बारबर व सर आकलंड कालव्हिन यांनीं खुलासेवार अभिप्राय पूर्वींच दिले आहेत. रायल कमिशन अखेरीस काय निकाल करील तें खरें !

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY
8 1897

We gladly make room for the following summary of the speech of Mr. Kashinath Govind Natu delivered at a meeting held at Poona, to accord a public welcome to Dr Barrows the President of the Parliament of Religions held at Chicago in 1894.

"We meet here this evening to greet you. I am addressing you on behalf of my fellow townsmen who have to-

night allotted to me the pleasant duty of welcoming you. In point of ability, I must say that my countrymen have made but a poor choice in me. When I look around I am dazzled with the literary splendour of those who have been ever shining in the firmament of learning and with whose fame the country resounds from one end to the other. But so far as sincerity of heart is concerned I am proud to say that I am second to none: I have only a dinner of herbs but I am sure when it is offered with love to our guest, he will relish it better than the stalled oxen. My tongue may not express fully and properly the depth of my feeling. Dr. Barrow you will read my heart in the imperfect language I use. In that heart you will read the hearts of those who have filled this hall. In this heart you will read the hearts of those who could not attend from pressure of work. Though it is a single voice you hear you may rest assured that it is the citizens who speak through my person, poorly gifted as I am. Dr. Barrow, you have come to us in the fulness of time. In this age of hard materialism all the varied activities have been directed towards material advancement. Japan has become one of the wonders of the world. She has beaten China hollow. India is often asked when she is going to be in the scale of nations for she has not yet equalled France or Germany in her industrial products. The question of religion was shelved and when it was started it was often treated as a child's play. But thanks be to those men of this city who have started a reactionary movement and who oppose tooth and nail this extreme inattention to religion. There are also two powerful agents at work which have greatly contributed to make men's minds sensible of their graver responsibility. These are the famine and the plague. After the Sanitary Engineers and doctors had exhausted their remedies, when science has utterly failed even in mitigating the evil when nearly the half of Bombay has been depopulated, men have begun to see the hand of God in this dire calamity. The Christians are tolling their Church bells to call their co-religionists to prayer The Jews spend whole days in singing psalms. The Hindoos are trying to appease the exasperated Divinity by chanting hymns and offering sacrifices, Famine is again staring us in the face. In Upper India thousands are dying of starvation. When men are unable to avert calamities by ordinary means, then they have recourse to prayers and supplications. At this nick of time when men have a natural leaning towards God, religious instruction takes a firmer hold upon the heart and makes a deeper impression. Religion necessarily plays an important part in the civilization of nations. Christianity has had much to do with the existing prosperity of the west. Without religion, we cannot be. The existing form of it will not answer the requirements of the time. To be or not to be that is the question. There are deep-rooted principles in the Hindu's head which you never expect to eradicate. There is a platform of higher western thought which no sensible native can disregard. The Indian mind is as it were sea-sawing at present. Thus circumstanced who would not anxiously look for a ray of light however dim it may be, who would not wonder at the novel idea of the Parliament of religions at the World's Fair, who would not receive the President of that Parliament with ecstacy and fulness of heart? Your mission is twice blessed. It blesseth you and it blesseth us. The subject of worldly pleni-potentiaries is territorial possession or dispossession. Religion has an interest in the eternal future. God is the head of it and he who comes with credentials to communicate to his fellowmen something regarding this all-important scheme comes as one whose holy mission is divine embassy. Whom should we then hold closer to our hearts than yourself who have taken up thus arduous task and whose object is to throw light on the path of those who are sailing eternity's wide expanse without any one to guide their course. You are welcome therefore as our dearest friend. You are welcome to us the messenger of peace and unity. Thrice welcome you are to this city of antic renown. We belong to a different nationality. If there be any awkwardness in the manner of reception—if I have said any thing which I ought not to have said, if I have omitted any thing which I ought to have said pardon me this failure. It has not arisen from want of sincerity. It may be the mere outcome of ignorance. Pray accept thus reception. It is a heartfelt token of love and regard for you and is only an earnest of what our heart contains."

After this welcome Dr. Barrows rose and said—A generous lady from America has founded a lecturership on comparative theology. The lectures are to be delivered at Calcutta and other principal centres of India. I am appointed the first lecturer in connexion with the foundation. The Parliament of religions of which I had the honor to be the President was not like a congress of Budhistic priests held under the direction of the Emperor Asoka 3000 years ago nor was it like the Mogal Emperor Akbar's meeting of the several disputing Pandits and Kazis. But it was the result of a spirit of toleration and sympathy. The representations of the principal ten religions of the world had their say about their religious conviction. After this Dr. Bhandarkar thanked the guest and the proceedings terminated with the singing of one or two Padas.

We hope to give in our next issue a summary of Dr Barrow's lectures which are sure to be a permanent monument of the finest literatura.

---

With the increase of famine the duties of respecting the safety of purse and person become rather most arduous and taxing. The offences against human body and property have become more numerous and extensive. We expect to see them run to large figures and should know well the golden rule 'forewarned is fore-armed.' This means an additional measure of precaution that the Police department should take in order to check the growth of offences. The hands of the police force should be strengthened with new recruits and their discipline should be of the highest watermark. We wish to signalize the danger that might spring up as the result of the inadequate control of the police department. In our town itself the burglars are at full play and we do not know when they will behold the last day of their jubillations of the present hour. Messrs Prideaux and Galloway work hard to maintain the peace and we think our interests will be safe in their hands. On Tuesday last, Mr. C. Shamrao 1st class Magistrate, Akola had to face two ruffians at his Bunglow. The latter aimed a deadly blow at his head but it slipped slantingly over his face. The gentleman had a narrow escape and we congratulate him on this new lease of life

It is however a matter of suprise that when Mr. Shamarao was calling loudly for help no soul could move from the Police-Reserve Lines at a very short distance. It is to be regretted that this event confirms the public belief that the discipline of the police establishment is growing lax and lethargic. We hope that a searching inquiry will be made into the matter; and matters will soon be set right under the vigilant control of our District Superintendent. It is understood that a gang of some 8 or 10 dacoits is doing a horrid work and it rests with the police to see that it is no small thing that a magistrate should be attacked in this manner.

---

## वऱ्हाड

हवामान— थंडीचें मान उतरत चाललें आहे. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं. रब्बीचीं शेतें शिवाय करून बाकीच्या जमिनींत नांगरठी वगैरे पुढील पीकासाठीं चालू आहेत. यंदा पाण्याचें दुर्भिक्ष्य पुष्कळ ठिकाणीं दिसतें.

म्युनिसिपालिटीच्या सभासदांची निवडा निवड गेल्या महिन्यांत झाली त्याचा निकाल असाः—

| रा. रा. | वार्ड नंबर |
|---|---|
| लक्ष्मण गोविंद ओक | १ |
| मिरझा आबासबेग | ॥ |
| केशव गोविंद दामले | ॥ |
| सिलिमखान दाऊदखान | २ |
| मौलवी हकीमुद्दीन | ॥ |
| चुनिलाल गुलाबचंद | ॥ |
| उमरखान लालखान | ॥ |
| एच. व्हांडरपुट | ३ |

मि० आर. आबर्ड जुडिशिअल कमिशनर यांनीं सध्यां रजेवर जाण्याचा बेत रहित केला आहे.

पुढील सोमवारा पासून एक आठवडाभर आकोल्यास सेशन कोर्टाचें काम चालणार आहे. तीन मोकद्दम्यांची चौकशी होणार अहे.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी० ए० हे अंतुरकराच्या कित्या संबंधाच्या दिवाणी खटल्या निमित्त येथें साक्षीस आले होते. ते परत दवऱ्यावर यवतमाळास गेले आहेत.

खान बहादूर शमसुद्दीन अल्लीखान डिपुटी कमिशनर हे आकोल्यास आले असून परवां मेडिकल बोर्डा समोर हजर झाले आणि त्यांची रजा आणखी ६ महिने आजारीपणा निमित्त वाढविण्यांत आली आहे. खान बहादूर काल रोजीं परत हैदराबादेस गेले.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं, रा० रा० गोपाळ नारायण देशपांडे वकील तेल्हारा यांस क्षया सारख्या तापानें देवाज्ञा अगदीं तरुणपणांत झालीं.

लेफटेनंट डी० ओ० मारिस यांस वऱ्हाडच्या हद्दींत 'जस्टिस आफ दी पीस' नेमण्यांत आलें.

रा. रा. सी. शामराव अस्याची, माजिस्त्रेट वर्ग १ यांच्या बंगल्यावर गेल्या मंगळवारीं रात्रौ डाकेखोर गेले होते. राजश्री शामराव शामराव साहेब यांच्या डोक्यावर वार झाला त्याबरोबर प्राणच जाण्याची वाईट वेळ आली होती. पण ईश्वरी कृपेनें तो घाव भिंतीवर पडून त्यांच्या नाकातोंडा जवळील भागावर निसटता लागला. बहुत आक्रोश केला असतां जवळच्या पोलिस रिझर्व्ह लायनींतून मदत न आल्यामुळें चोरांचा नापत्ता झाला. पोलीसची सुस्ती व ढिलाई आहे असें लोक बोलतात पण आनंदाची गोष्ट कीं डिस्ट्रिक्ट सुपरिंनेटेंडेंट या चौकशींत मनापासून झटत आहेत.

येथील पुलाच्या मागें पुढें जो लांकडी कठडा आहे तो मोडकळलेल्या स्थितींत असल्यामुळें गुरें कित्येक प्राणास मुकतात. अधिकाऱ्यांनीं इकडे लक्ष्य पुरविल्यास बरें होईल.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,,( बनशी ) | १२९ रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| सोनें | २१॥ तोळा |
| चांदी | ८७॥ |

---

### मथुराबाई मराठे

गुणाचा जिथें वास तें गौरवावें,
न रूपा न लिंगा मनीं वागवावें;
अशा नीति-संपन्न-वाक्यानुसारें,
तुला गौरवीता मेंर हर्षवारें १
पिका-कंठ-देशांतल्या गोड ताना,
विधु क्षेपितो भूवरी वा करांना;
स्रवे पुष्प निस्यंद-वर्षाव जेवीं,
निघालें तुझ्यापासुनी पद्य तेवीं ! २
स्वजातीय पाहून झाली प्रसन्न,
तुला काव्य देवी विशेषें करून;
असें वाटलें गोड आर्या बघून,
कसा दाखवूं हर्ष हो तो लिहून ? ३
विलासप्रिया, कोमलांगी, उदात्ता,
सुरम्या, विशुद्धांतरा, भावयुक्ता;
अशी वाङ्नदी पाहतां ही तुझी मी,
कशाला गुतावें वृथा स्वर्ग-कामीं ? ४
महाराष्ट्र देशांत, सारस्वतांत
फिराया कमी योषिता लागल्यात;
अशा अल्प संख्येंत तूं मोडतेस,
स्तवा पात्र तूं यामुळें जाहलीस. ५
सदां आपला काळ सत्काव्यसंगें,
तुवां घालवावा असा गे शुभांगे;
प्रसिद्धीस यावेस तूं सद्गुणांनीं,
असें इच्छितों सेर्ष मी एक कोणी. ६

BEE.

---

१ नीति संपन्न पुरुषाच्या वचनास अनुसरून. २ वाहणें. ३ रसाचा वर्षाव. ४ निरानिराळ्या रसाविषयीं आवड जीची. ५ कठोरपणा ह्मणजे क्लिष्टत्व जींत नाहीं ती. ६ प्रसाद गुण युक्त. ७ मधुर आहे वर्ण रचना जिची. ८ विशुद्धा—दोषरहित. ९ भाव युक्ता—अष्ट भाव जींत आहेत अशी. १० ग्रंथ समूहांत.

---

## वर्तमानसार.

केटा रेलवेस मागच्या शनवारी अपघात होऊन दोन माणसें मेलीं व दोन जखमी झालीं.

मुंबईच्या सांथीमुळें एडन येथें नाकेबंदी करा असें टर्की सरकारचें इंग्रज सरकाराजवळ ह्मणणें आहे.

सांथीच्या प्रांतातला कांहीं माल कोणी फ्रान्सांत आणील तर सक्त दंड होईल असें फ्रान्सानें ठरवून टाकलें.

मुंबईची सांथ सगळ्या हिंदुस्थानभर झाली आहे असें समजून रशियानें आपली व्यवस्था चालविली आहे.

मुंबईच्या सेक्रेटरीयट आफीसांतील कित्येक कामदार गेल्या सोमवारपासून बायकामुलांसह ठाण्या शेजारी तयार होत असलेल्या वेड्यांच्या हस्पितळाकरतां तयार झालेल्या इमारतींत येऊन राहिले. त्यांस स्वयंपाकाकरतां वेगळालीं झोपडींही बांधून दिलीं. त्यांच्यापासून कांहीं नियमित भाडें घेतलें जाणार असें सांगतात. वेड्याकरतां तयार होणाऱ्या इमारतींत प्रथम वेड्या नव्हत अशा शहाण्या व सुशिक्षित लोकांनीं रहाण्यास येऊन त्या इमारतींची घरभरणी केली हें सुचिन्हच ह्मणावयाचें.

हल्लीं जी दुष्काळकामावर माणसें आहेत त्यांबद्दल सरकारास दररोज सुमारे २ लाख रुपये खर्च येत आहे. कोणत्या भागांत किती माणसें रिलीफ कामावर आहेत व फुकट खाणारी किती आहेत याचा तपशील पुढील प्रमाणें आहे:—

| प्रांताचे नांव. | कामावर | फुकट |
|---|---|---|
| नार्थवेस्ट प्रांत | ७,२६,००० | ९६,००० |
| बंगाल प्रांत | २,३३,००० | ४४,००० |
| मुंबई इलाखा | २,५०,००० | ८,००० |
| मध्य प्रांत | २,३१,९९० | १४,००० |
| पंजाबप्रांत | ६४,००० | १५,००० |
| मध्यहिंदुस्थान | ३८,००० | ४,००० |
| वर्धाप्रांत | २३,००० | ६,००० |
| मद्रासप्रांत | २१,००० | ८,००० |
| रजपुताना | २६,००० | २,००० |
| | १६,१२,००० | १,९७,००० |

आफ्रीकेंत जो फ्रेंचांचा प्रांत आहे त्यांतील लोकांस मुंबईच्या सांथीमुळें मक्कस जाण्याची फ्रेंच सरकारानें सक्त मनाई केली. ठा० अ०

विलक्षण फिर्याद—अनंतापूर जिल्ह्याच्या लोकांनीं सरकाराविरुद्ध अशी तक्रार केली आहे कीं, पावसाचा हंगाम गेल्यावर ही पाऊस पडेल. अशी जाहिरात सरकारानें 'ग्याझेटमध्यें' दिली ह्मणून आह्मी पेरण्या केल्या, पण पाऊस पडला नाहीं. आणि आमचें नुकसान झालें.

मिरजेच्या कांहीं फाजील ब्राह्मण मंडळीनें विजापुराकडील एका ब्राह्मणास, शूद्राची मुलगी ब्राह्मणाची ह्मणून सांगून नवरी करून दिली. पुढें ती आपल्या नवऱ्या बरोबर येथील देवीच्या दर्शनास आली असतां तिनें आपल्या खऱ्या [शुद्र] बापास ओळखून मिठी मारली. तेव्हा हें सर्व बेंड बाहेर आलें, पण हे प्रकरण मुकाट्यानें आपसांत भागल्याचेही कळतें.

पन्हाळ पेठ्यांतील मौजे सरूड येथील तिघेजण मुंबईस कांहीं कामा करितां गेले होते ते कोकणांतून परत आले. परत येते वेळीं संगमेश्वर येथें त्या तिघांपैकीं एकजण सांथीच्या तापानें मेला. दुसरा घाटावर आल्यावर मेला व तिसरा घरीं येऊन मेला. त्याची पथ्य पाण्याची व्यवस्था ज्यानें केली तोही इसम वारला हल्लीं त्या घरांतील आणखी एकजण त्याच विकारानें लागला आहे.

वळाचा ताप ज्याला येईल त्याला ताप आल्यापासून पाहिले चोवीस तास मुळींच निजूं देऊं नये.

या तापांत झोप जितकी कमी घ्यावी तितका दुखण्याला आराम पडेल. दी० बं०

मुंबईतील पोष्टाच्या शिपायांना एकत्र जमून मुंबईबाहेर आपणास राहण्यास परवानगी द्यावी; रेलवे तिकिटें फुकट द्यावी. डिलिव्हरींची संख्या कमी करावी, आणि सांथी मुळें शिपाई मेला तर त्याच्या बायकामुलांस पेनशन किंवा कांहींतरी देणगी द्यावी असा अर्ज पोष्टमास्तर जनरलाकडे केला आहे.

मुंबई सरकारचे अंडर सेक्रेटरी मि. कर्टिस हे मद्रासचे अक्० पोष्टमास्तर जनरल झाले आहेत.

कमिट झाला—सिकंदराबाद येथील युरोपियन पोरपाडीचा खटला मुंबईच्या सेशनांत कमिट झाला, ता० २ फेब्रवारीला चालणार, आरोपी मि० टेंपल्टन याजवर खोटी साक्ष दिल्या बद्दलही आरोप ठेविलेला आहे.

मनमाडच्या बाजाराला गेलेले येवल्याचे व्यापारी बाजार करून परत येत असतां रात्रीं सांत आठ इसम त्याला आडवे आले आणि गाड्या आडवून त्यांनीं लूट केली. चोरटे हत्यारबंद होते.

गोव्यांचें नाणें खजिनदारांनीं आतां घेऊं नये; त्यांचे मार्फत टंकसाळींत तें नाणें गेल्यास त्याचे रुपये त्यांच्या आंगावर पडतील असें अकौं० जनरलांनीं फर्माविलें आहे.

आग्रा म्युनिसिपालिटीचे यूरोपियन इंजिनियर मि. बर्कले यांनीं मद्रास ब्यांकेंत एक बनाऊ चेक वटाविल्याबद्दल त्यांस कैद केलें आहे. स० शो०

सूर्यबिंबावर डाग—हल्लीं सूर्य बिंबावर एक मोठा डाग दिसूं लागल्याचें मद्रास येथील वेधशाळेंतील ज्येतिर्विद मि० स्मिथ यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हा डाग दुर्बिणीशिवाय सुद्धां काजळ लाविलेल्या भिंगांतून दिसतो असें त्यांनीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें आह्मी पाहिलें, परंतु स्पष्ट दिसण्यासारखा तसा डाग बिंबावर दिसत नाहीं.

तारायंत्रानें पाऊस धरला—बुशायर येथें यंदां पाऊस नाहीं; ह्मणून तेथील ग्राम्य मंडळी त्याच्या कारणाचा शोध करतां त्यांत विचार निघतां निघतां तेथील तार आफिसांत कांहीं तरी खोडगत असावी आणि त्यामुळें पाऊस पडेनासा झाला, असा या मंडळींनें कियास काढला. इतका शोध काढल्यावर मग काय ? दुसऱ्या दिवशीं एक टोळी करून लोक तेथील तारहपिसावर चालून गेले, आणि आंतील यंत्रे बॅटरीसह वगैरे फोडून तोडून यांनीं चुराडा उडवून दिला. हा प्रयोग झाल्या नंतर काकतालीय न्यायानें तेथें बराच पाऊस पडला. यामुळें तर लोकांच्या समजुतीचें फारच दृढीकरण झाले हें सर्व खरें परंतु आतां त्या लोकांस सरकारानें पकडून त्यांच्यावर खटले चालविले आहेत असें टा० इं० वरून समजतें. न्या० सु०

चांगलें केलें— मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटची सभा ता० १९ रोजी भरली होती. त्यांत सरकारी आर्टस, मेडिकल आणि लॉ कालेजांतील विद्यार्थी चालू टर्ममध्यें सांथीच्या भीतीनें कालेजांत हजर राहिले नाहींत तरी चालेल; त्यांवर सक्ती नाहीं, असा फार सोईचा ठराव करण्यांत आला. त्याप्रमाणें कानव्होकेशनची बैठक फेब्रुवारींत तिसरे मंगळवारीं भरावयाची तीही तहकूब ठेवण्याचा ठराव केला.

ता. करमाळें जिल्हा सोलापूर येथें दर शुक्रवारी गुराचा मोठा बाजार भरत असून तेथें दोन आण्यापासून जनावरें विकली जातात. काय ही शोचनीय स्थिति ! धर्मात्मे लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें.

सोलापूर जिल्ह्यांतून गुरांची सुमारें एक लक्ष कातडी मुंबईकडे रवाना करण्यांत आलीं. न्या० सिं०

मुंबईत चालू असलेल्या तापाचे रोगी बरे न झाल्यास मला फांशीं द्या असा एक अर्ज कोणी वैद्यानें म्यु. पा. कडेस पाठविला आहे.

पोलिसची नोकरी न विचारतां सोडून गेल्याबद्दल एका मुसलमानास १ महिन्याची शिक्षा झाली.

जंबूसर— या तालुक्यांत कपासीची कापणी सुरू आहे. ज्वारी कपासी आणि तुरी यांचे उत्पन्न बरें आहे. ज्वारी २९ शेर, तांदूळ बाजरी १७ शेर, गहू, डाळ, चणें, १६ शेर, तीळ ११ शेर कोद्रा ३२ शेर याप्रमाण धान्याचे भाव आहेत.

डा० हाफकिन यांचे औषध कराचिस पाठविण्यांत येणार आहे.

काशी येथील मि० ज्वला प्रसाद मुनशी यांनीं मनुष्यांचे शरीरामध्यें कमी असणारे रंग घालून सर्व प्रकारचे रोग बरे करण्याचें एक नवीन शास्त्र प्रचारांत आणण्याचा क्रम चालविला आहे.

मुंबईचे माजिस्ट्रेट मिस्तर दस्तूर यांनीं आपल्या अधिकारा बाहेर एका व्यापाऱ्याच्या चोपड्या जप्त करून कलकत्त्यास पाठविल्या. त्या बाबतींत आपील होऊन चोपड्या जप्त करण्याचा अधिकार माजिस्ट्रेट यांस नाहीं. ज्याच्या त्यास चोपड्या परत आणवून द्याव्या असा हा० कोर्टाचा हुकूम झाला.

भारतमित्र पत्राचा एक बातमीदार लिहितो कीं, मुंबई येथील एका श्रीमंत सावकारानें श्रीक्षेत्र काशी येथें संस्कृत कॉलेज नवीन चालू करावें या करितां १ लाख रुपये देण्याचा संकल्प केला आहे याचें नांव धर्मनिष्टा. आ. व.

हिंदुस्थानाशीं व्यापार होणाऱ्या इंग्रजी बंदरांवर मुंबईच्या सांथीचे लोक त्या त्या बदरांत न येण्याकरितां खबरदारी घेण्यासाठीं इंग्लंड सरकारानें डाक्टरांच्या नेमणूका केल्या आहेत.

अबिसीनीयाच्या राजानें इटालीच्या राजाचे कांहीं लोक कैद केले आहेत व आरिथी हें ठिकाण पूर्णपणें सोडून दिल्यावाचून तुमच्या कैद्यास आह्मी बंदमुक्त करणार नाहीं असें आबेसिनियाच्या राजानें इटालीसरकारास कळविलें आहे यावरून इटालीस आफ्रिकेंतून साफ निघून जाण्याची पाळी येणार असें दिसतें.

हिंदुस्थानांतले जे डाक्टर विलायतेस रजेवर आहेत त्या सर्वांस ताबडतोब हिंदुस्थानांत जाण्याचा हुकूम झाला. मुंबईची सांथ हें त्याचें कारण आहे. विलायतचे कांहीं डाक्टरही हिंदुस्थानांत यावयाचे आहेत.

तापामुळें पक्षकार निघून गेल्यानें मुंबईच्या हैकोर्टांत काम नाहींसें झालें आहे व यामुळें त्या कोर्टाचे दोघे जज्ज मेसर्स पार्सन व क्यांडी हे अनुक्रम गुजराथेंत व महाराष्ट्रांत कोर्टें तपासण्याकरितां फिरावयास निघणार आहेत.

मुंबईच्या विद्वान शास्त्रीलोकांची मागच्या आठवड्यांत बाबुलनाथाच्या देवळांत एक सभा झाली व मुंबईचा रोग शांत होण्याकरितां शास्त्राप्रमाणें काय तजवीज करावी याबद्दल भवतीनभवती झाली. नेपाळचे प्रसिद्ध शास्त्री नीलांबर ओझाजी हेही हजर होते. सोनापूरची स्मशानभूमी व मुंबईची तशीच दुसरीं स्मशानें यांत सतत तीन दिवस पर्यंत कालिका देवीच्या नांवानें उग्र अनुष्ठानें करण्याचें ठरलें आणि त्याच्या योगानें रोगाचें शमन झाल्यावर देवीस महानैवेद्य देण्यांत येणार आहे.

आस्त्रेलिया, न्युझीलांड, कानडा, हांगकांग, सिंगापूर, केपटाउन, जोहानसबर्ग व शांघाई येथें ही हिंदुस्थानच्या दुष्काळाकरतां वर्गणी जमविण्याची चळवळ सुरूं झाली आहे.

हिंदुस्थानच्या खर्चाचा विचार करणाऱ्या कमिशनचें काम सुरूं झालें, एप्रिलांत खलास होईल.

काश्मीरच्या हद्दींत झपाट्यानें बर्फ पडण्याचीं सुरवात झाली.

१२ रुपयांच्या आंतल्या पगाराच्या नोकरांस दरमहा १ रुपया जास्त देण्याचा बंगाल सरकारानें हुकूम केला!

बंगाल्यांतल्या रिलीफ कामावर २,३३,००० व फुकट खजारीं ४४,००० माणसें झालीं.

बंगलोरास सन्निपात ज्वराची सांथ सुरूं झाली आहे.

कलकत्याच्या फामीन फंडाची रकम ३,७४,००० रुपये झाली.

दुष्काळकामावर लागलेल्या ज्या लोकांस दुष्काळाचें सक्त काम करवण्यासारखें नाहीं अशा लोकांस त्यांच्या घरींच खाण्यास द्यावें असें ले. गव्हरनर सर माक्डोनल्ड यांनीं ठरविलें आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, १ ८८
किरकोळ अंकास ........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ८१ ८६
दुसरे खेपेस ........... ८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as
Six monthly........ 3 ...... ... ...,, 8 as
Single copy .............. ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

VOL XXXI | AKOLA MONDAY 8 FEBRUARY 1897 | NO 6

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १८९७ इ० | अंक ६

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

## जाहिरात

या लेखानें सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं रा. रा. रामबिलास जीवनराम यास कुलमुखत्यारी वरून काढलें आहे तेव्हां त्यांच्याशीं कोणी कोणत्याहि प्रकारचा व्यवहार माझ्या दुकानासंबंधानें कोणी करूं नये. जो करील तो स्वतां जबाबदार राहील. तारीख २६।१।९७.

( सही )

बद्रीनारायण बलदवा राहणार आसतरा ता. व जिल्हे नांदेड.

## नोटिस

रा. रा. रामबिलास जीवनराम मारवाडी ब्राह्मण राहणार आकोला यास कळावें कीं तुमची कुलमुखत्यारी रद्द केल्याविषयीं तुह्मास पूर्वीच कळविलें आहे. दुकानचा व्यवहार कोणत्याही प्रकारचा तुह्मी करूं नये. जर कांहीं देवघेव किंवा व्यवहार कराल तर त्याची दिवाणींतली व फौजदारींतली जबाबदारी तुमच्या शिरावर राहील कळावें. तारीख २६।१।९७.

[ सही ]

बद्रीनारायण बलदवा राहणार आसतरा ता. व जिल्हे नांदेड.

श्रीमती मथुराबाई मराठे या मुंबईहून येथें आल्या आहेत. त्यांच्या पत्रावरून त्या अल्पवयी आहेत तथापि त्यांस इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी थोडथोडें येतें. कविता करण्याचा या बाईस नाद आहे. ह्यांनीं रचलेल्या नवीन कविता मासल्यासाठीं आह्मी खालीं देत आहों. प्रयत्न नवीन असून बरा साधला आहे.

## सत्य

( आर्या )

सत्याचा कर सौदा झटुनी संसाररूप बाजारीं।
सौदागिरा नरा तरि घेतिल जन हे तुला स्वशेजारीं ॥१
धांवे जशी स्रवंती भंगकरें सिंधु-कांत-संगातें।
सत्याप्रती तसा जा माता शिशु-चुंबनार्थ वा गा ते ॥२
रत्नोत्तमा परीहि रत्न असें हें अमोल्य इहलोकीं।
स्वल्प श्रमें न मोलें गवसें दृढ निश्चयेचि अवलोकीं ॥३
कल्पद्रु दे सुरां वा भक्त-सु-वृंदा दयाळ गोविंद।
सत्य तसें संकल्पित, यास्तव नृत-रत्न-माल गा विंद ॥४
सत्य-सुरत्न- सुमाला तत्कंठा जेवि सुंदरागाळीं।
तो मेघवर्ण तीलक शोभत वा चंद्र शंकरा भालीं ॥५
दावील मुक्ति-पंथ चि अंधा यष्टी जसा तमीं दीप।
भव-शृंखला हरोनी सिंह जसा मत्त कुंजरा वीप॥६
सत्यश्रीसंचय करि संतत मधुमक्षिके परी वांया।
काल न दवडी मनुजा, झट मधु सत्यामृतासि सेवाया ॥७
सत्यासि मान देतिल सुज्ञ जसा पद्मनाथ गोपाला।
सुरकिन्नरादि किंवा रंक करा जोडुनी सुभूपाला ॥८
येतां सभेंत जैशी स्वपति गळां माळ घालिते नवरी ॥
सुरपुरिं वा इहलोकीं अवलोकीं विजय सत्य तोंचि वरी ॥९॥
इतरालंकारातें तस्कर नेईल काल जैं प्राण ॥
परि सत्य भूषणोंत शक्य न न्याया कुणी न भय जाण ॥१०॥
मुक्तिपदाद्री वरती धर्म महा पंडुराय सुत चढला ॥
रवि वंशज भूप हरिश्चंद्र तसा निश्चयें नृतें तरला ॥११॥
वर्णोनि सत्य मौल्यचि मागें विश्रांति दास हा मास ॥
विज्ञप्ति मान्यहो ही पुनरपि भेटेल प्रीतिनें खास ॥१२॥

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ६ शके १८१८

वऱ्हाडच्या राज्यकारभाराचा वार्षिक रिपोर्ट सन १८९५-९६ सालचा आह्माकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. एकंदर उत्पन्न रुपये १,१३,१४,४२६-८ आणे-८ पै असून खर्च रुपये १०१,८९,८०९-४ आणे ५ पै झाला आहे ह्मणजे सर्व प्रांताच्या राज्यकारभाराची शिल्लक रुपये ११,२४,६१७-४ आणे ३ पै निघाली. सरकारी राज्यव्यवस्थाच मोठी चमत्कारिक आहे. उत्पन्न वाढतें तसतसें खर्चाचें प्रस्थ माजत जातें; आणि अलिकडे उत्पन्याच्या व खर्चाच्या रकमांला कांहीं धरबंध राहिला नाहीं. १८९५-९६ सालीं निजाम सरकारास रुपयं २९१७२६ दिले ते वजा जातां वऱ्हाड सरकारापाशीं सध्यां शिल्लेंकेत रुपये ४२०२,२६२ आहेत. ही रक्कम वास्तविकपणें निजाम सरकारच्या मालकीची आहे पण ब्रिटिश राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठीं ह्मणा किंवा अन्य राजकीय कारणामुळें ह्मणा ती आमचे इंग्रज सरकार निजाम साहेबांस सध्यां परत देत नाहींत असा रंग दिसतो. पुष्कळ वर्षांपासून ही शिल्लक ओढली जात आहे आणि वऱ्हाड प्रांताची श्रीमंती खरी आहे असा एवढ्या शिलकेवरून मात्र गैरसमज होण्या सारखा आहे.

गेल्या तीस वर्षांपूर्वी ह्मणजे १८६५-६६ सालीं वऱ्हाडचें उत्पन्न सरासरीं ५१ लक्ष रुपये होते; आणि खर्च एकंदर ४९ लक्ष रुपये होता. या खर्चापैकीं पब्लिक वर्कस खात्याकडे ५ लक्ष व राज्यव्यवस्थेसाठीं १५ लक्ष मिळून २० लक्ष रुपये खर्च झाला आणि लष्करीखात्याचा खर्च २९ लक्ष रुपये होता. १८९५-९६ सालीं उत्पन्न शेंकडा १०० प्रमाणानें वाढलें आहे; पण पब्लिक वर्कस खात्याचा खर्च त्याच प्रमाणानें वाढला असून लष्करी खर्च २९ लक्षांचा ३८ झाला आहे. मात्र सिव्हील खर्चाच्या वाढीचें प्रमाण शेंकडा ३०० आहे ह्मणजे राज्यव्यवस्थेच्या निमित्तानें खर्च अतिशय वाढविला आहे. खरोखर ही स्थिती अर्थशास्त्रदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या चांगली नाहीं. खर्च अतोनात वाढला आणि उत्पन्नही अतोनात वाढलें यावरून प्रजेवर करांचा बोजा फार बसविला आहे आणि सरकारच्या देण्याखालीं प्रजेच्या वित्ताचा चुराडा होत आहे हें उघड होईल. वऱ्हाडची श्रीमंती हल्लीं दिखाऊ आहे पण सामान्यतः जनसमूह भिकारदशेला अती पोचला आहे. ब्रिटिश राज्यव्यवस्था आणि निजाम सरकारची मालकी या जोडगोळीनें सर्व प्रांत अगदी जेरीस आला आहे.

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

( रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला. )

शिक्षकास वाटतें, भलतेच प्रश्न विचारले जातात, आणि परीक्षकास वाटतें, विषय बरोबर शिकविला गेला नाहीं. यांतलें वर्म शिक्षकाचें अज्ञान हें वास्तविक असून एकास वाटतें कीं यानें शिकविलें नाहीं व दुसऱ्यास वाटतें कीं यानें हें विचारूं नये. यांतलें मूळ उभयतांच्या लक्ष्यांत येईल तर तंटा मिटलाच. परीक्षकास वाटतें शिक्षकास येत असून त्यानें शिकविलें नाहीं व शिक्षक तर जाणतो कीं आपली कमाल करून आपण शिकविलें आहे. कदाचित् परीक्षकास वाटत असेल कीं याला येत नसेल तथापि यानें खटपट करून तयार करावें आणि शिकवावें. पण कांहीं अंशीं सोय नसल्यामुळें आणि कांहीं अंशीं शरमेमुळें शिक्षकाच्या हातून तसें घडत नाहीं. क्वचित् प्रसंगीं शिक्षकाच्या आळसामुळें विषय चांगला शिकविला जात नसेल. तो विचार वेगळा. पण आमची पूर्ण खात्री आहे कीं जो विषय ज्याला चांगला येतो तो त्याच्यानें शिकविल्यावांचून राहववणार नाहीं, आणि कांहीं शिक्षकांच्या कामांत कांहीं विषय चांगले शिकविलेले आढळतात, व कांहीं साधारण शिकविलेले आढळतात, याचेंही वर्म हेंच होय. या विषयांतरांत आमचा इतकेंच दाखविण्याचा हेतु आहे कीं बहुतेक उदाहरणांत जेथें विषय मुलांस चांगला येत नाहीं तेथें शिक्षकाचें स्वतःचें अज्ञान हें मुख्य कारण आहे.

२ आतां तिसरी गोष्ट ह्मटली ह्मणजे नियमन ही होय. ही ठेवतां येण्याला शिक्षकाच्या अंगीं पहिला गुण ह्मटला ह्मणजे चांगली विद्या असणें हा होय. चांगली विद्या ह्मणजे, जें शिकवायाचें आहे तें उत्तम शिकवितां येणें इतकाच अर्थ घेऊं. या गुणाची थोरवी एवढी असते कीं सद्वृत्त तसेंच दुर्वृत्त विद्यार्थ्यांवर शिक्षकाचें आपोआप विलक्षण प्रकारेंच वजन राहतें. याची उणीव वाग्दंडानें किंवा शरीर दंडानें तशी चांगली भरून येत नाहीं. दुसरा गुण शिक्षकाच्या अंगीं सौजन्य किंवा संभाविती हा होय. शिक्षकाचें वर्तन अध्यापन संबंध शिवाय करून मित भाषणाचें व तेंही गांभीर्ययुक्त अशा प्रकारेंचे असलें ह्मणजे, शिष्य अनायासें सद्वृत्त होतात.

तिसरी गोष्ट शिक्षकाचें सदाचरण होय. सदाचरणी मनुष्यांस जसें समाजांत सर्वच लोक मान देतात व थोडे बहुत वचकतात तीच गोष्ट मुलांसही लागू आहे. चवथी गोष्ट शिक्षकाचा कृपाळूपणा होय, विद्यार्थ्यांच्या दुःखाबद्दल, दीनपणाबद्दल शिक्षकास कळवळा वाटला असतां आणि त्यांस तो होईल तितकें साहाय्य करण्यास तत्पर दिसला

असतां त्याच्या बद्दल विद्यार्थ्यांस लोभ वाटतो.

पांचवा गुण शिक्षकाच्या आंगचा इनसाफी पणा ह्मणजे शांतिपूर्वक शिष्यांच्या दोषांचीं कारणें ऐकून घेऊन, त्यांस योग्य रीतीनें दोषी किंवा निर्दोषी ठरविणें हा होय. याच्या योगानें विद्यार्थी सत्यशील आणि प्रामाणिक निपजतात व शिक्षकांशीं सरळ भावानें वागतात. इतके गुण शिक्षकाच्या अंगीं असले ह्मणजे, त्याच्या वर्गांत पूर्ण नियमन राहतें आणि त्याचें व्याख्यान ते सावध चित्तकरून ऐकतात व निरंतर आज्ञाधारक राहतात. नियमनाचा एकंदर हेतू हाच होय व तो सिद्धीला जाऊन देहदंडणाची किंवा कोणत्याही अप्रियपणाची आवश्यकता रहात नाहीं.

ज्या ठिकाणीं नियमन नसतें व तेणेंकरून देहदंडाची वगैरे अपेक्षा लागते त्या ठिकाणीं वर सांगितलेल्या गुणांचा न्यूनाधिक्यें करून अभाव असतो असें अवश्यमेव समजावें.

यावरील आवश्यक गोष्टींचा विचार करून आह्मी उत्तम शिक्षक कोण या विचाराकडे वळतो. आतां प्रथम गणित विषय शिकविण्या संबधानें विचार करूं.

संख्येचें आणि साध्या बेरजेचें तत्व काय? गुणाकारांत उजवीकडूनच अंक घेऊन कां गुणावें? भागाकारांत एकएक अंक घेऊन भागाकारातील अंक उतरते कसे जातात? गुणाकार हा बेरजेचा संक्षेप कसा? आणि भागाकार हा वजाबाकीचा संक्षेप कसा? प्रमाण गणितांत प्रमाणें अमुक तऱ्हेनें मांडायाची, अमक्यानें गुणायाचें, अमक्यानें भागायचें, चक्रवाढ व्याजांत एक मुद्दल धरून त्याची रास करून नंतर वर्ग, घन, किंवा अन्य कोणता घात करायाचा, Discount आणि Stocks ही व्यापारातलीं काय खटलीं आहेत, वर्गमूळ आणि घनमूळ यांच्या रीती कशा बसविल्या आहेत या सर्व गोष्टी गणित शिकवितांना उत्तम शिक्षक मुलांस शिकवील. याप्रमाणेंच बीजगणित आणि सिद्धांत याविषयीं समजावें. Prose शिकवितेवेळीं व्याकरण आणि पृथक्करण (Analysis) यांच्या योगानें वाक्यरचना मुलांस समजावून देऊन शब्दांचे रूढ आणि यौगिक अर्थ सांगून, प्रतिपाद्य विषयाचा उपक्रम कसा केला आहे, त्याचें उत्तरोत्तर वर्णन कशा अनुक्रमानें केलें आहे, आणि त्याचा उपसंहार कसा केला आहे, हें दाखवून निबंधरचना कशी करावी हें समजवून देईल, तसेंच जे जे पदार्थ वह्यांत येतील त्यांचें ज्ञान मुलांस प्रत्यक्ष करवून देईल आणि शब्दांचीं वजनें आणि अर्थव्याप्तिही सांगेल. कविता शिकवितांनां वृत्तांचें ज्ञान सांगेल, श्लोकांतील अलंकार सांगेल, आणि काव्यांतील नीतितत्वें सांगून ज्या प्रसंगा संबधानें काव्य लिहिलें असेल ते प्रसंग मुलांस सांगून काव्याचें सौंदर्य कोणत्या गोष्टींत असतें याही गोष्टी मुलांस समजवून देईल.

इतिहास शिकवितांना ज्या काळाचा इतिहास शिकवावयाचा आहे त्या काळांत आरंभापासून शेवटपर्यंत त्या देशाची सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि राजकीय स्थिति कशी वाढत गेली, किंवा ऱ्हास पावली हें मुलांस कार्यकारणभाव दाखवून, व्याख्यान किंवा गोष्ट या प्रमाणें सांगेल. तसेंच ज्या देशाचा इतिहास शिकवील. त्या देशाचा भूगोल मुलांपुढें ठेऊन, ज्या स्थलीं ज्या गोष्टी घडल्या तीं स्थळें त्यांस दाखवून भूगोल आणि इतिहास यांचा निकट संबंध ठेवील. मुलांच्या हातीं कोणतें पुस्तक आहे याचा तो विचार करणार नाहीं.

भूगोल शिकवितांना तो प्रथम नकाशा पासून आरंभ करील आणि पृथ्वीच्या गोलाचे भाग नकाशावर सपाट कसे काढले आहेत हें दाखवील. Latitude, Longitude कर्क मकरादि वृत्तें यांच्या कल्पना समजावून देईल आणि हवेचें शीतोष्णत्व सांगेल. कोणत्या प्रकारच्या हवेंत आणि जमिनींत कोणत्या प्रकारचीं पिकें होतात, कोणत्या देशांतून बाहेर माल जातो आणि काय माल जातो वगैरे माहिती सांगेल. तसेंच जीं जीं स्थळें तो नकाशांत मुलांस दाखवील त्या त्या प्रत्येक स्थळाबद्दल त्यास तो माहिती सांगेल.

शास्त्रीय विषय शिकवितांना तर तो आपल्यावर फारच जबाबदारी घेईल. कारण त्यांचें ज्ञान त्याच्या साहाय्यावांचून विद्यार्थ्यांस बिलकूल व्हावयाचें नाहीं. याकरितां ते विषय तो मुलास सप्रयोग शिकवून दाखवील, व हें ज्ञान प्रत्यक्षवत् मुलांस करून दिल्यावांचून तो राहणार नाहीं. पदार्थ विज्ञानशास्त्राचे धडे शिकवितेवेळीं तो पदार्थ पुढें ठेवून शिकवील. वनस्पतींचें किंवा भिन्नभिन्न प्राण्यांचें वर्णन सांगतेवेळीं त्या त्या वनस्पती व ते ते प्राणी तो समोर ठेवून त्यांचें ज्ञान करून देईल. हें उत्तम शिक्षकांचें लक्षण झालें. आतां त्यानें जरी इतक्या उत्तम प्रकारें शिकविलें तरी त्याचा परिणाम कितपत होईल हें सांगतां येत नाहीं. आपणा सर्वांस असें वाटतें कीं या प्रमाणें मुलांस शिक्षण दिलें पाहिजे; परंतु त्यांच्या अधिकाराविषयीं विचार करून त्या मानानें तें द्यावें, किंवा उत्तम शिक्षकाची जितकी शक्ति असेल तितकी त्यानें आपल्या विद्यार्थ्यांपुढें ओतावी, हें विचारणीय आहे याकरितां याविषयीं थोडासा विचार करूं. सर्व गोष्टींस काल ह्मणजे योग्यवेळ ही लागलीच आहे. किती जरी उत्तम कारागीर असला तरी ज्या गोष्टीवर तो क्रिया करणार, ती गोष्ट त्याच्या क्रियेचा व्यापार ग्रहण करण्यास योग्य असल्यावाचून तिजवर ती ती क्रिया चांगली वठणार नाहीं असें वाटतें. ज्या जमिनींत पुष्कळ खत घालून ती पुनः पुन्हा नांगरून कांहीं वर्षां नंतर तिच्या अंगीं उत्तम सुपीकता येणार आहे तींत प्रथमच उत्तम बीज घातलें आणि त्यांतलें त्यांत कारागिरानें किती जरी कमाल केली, तरि बीज व्हावें तितकें फलप्रद होणार नाहीं व श्रम बऱ्याच अंशीं व्यर्थ जातील.

येन्नवे भाजने लग्नः संस्कारो नान्यथा भवेत् ।

या वचना प्रमाणें जरी संस्कार अगदीं फुकट गेला नाहीं तरी श्रम पुष्कळच फुकट जातील यांत कांहीं संशय नाहीं. दुसरें एक उदाहरण घेऊं. वेदांत तत्वें कळण्याचा अधिकार सामान्यतः मनुष्यास निम्मे वयाच्या पुढें येतो. तींच तत्वें जर मुलांस पंधरा वर्षांच्या आंत शिकविण्याचा कोणी यत्न केला तर तो यत्न श्रमाच्या मानानें कितपत सिद्धीस जाईल? आपण कीर्तन लहानपणीं ही ऐकतों व मोठेपणीं ही ऐकतों, जीं नीति तत्वें हरिदास सांगतात तीं नेहमीं सारखींच असतात. पण लहानपणीं त्यांचा आपणास कांहीं बोध होत नसून मोठे पणीं तीं अंतःकरणास इतकीं पटतात व आल्हादकारक वाटतात कीं तीं ऐकल्याबरोबर आनंदाश्रु वाहू लागतात. आमचा स्वतःचा अनुभव असा आहे कीं शाळेंत शिकलेलेच विषय जेव्हा आह्मी शिकवूं लागलों तेव्हां ते आह्मांला साधारण कळतात असें वाटूं लागलें व उत्तरोत्तर जसे जसे ते अधिकाधिक शिकवीत गेलों तसे तसे ते बरेच कळतात असें वाटूं लागलें व कांहीं कांहीं आमच्या अल्प अधिकाराच्या मानानें उत्तम कळतात असें आह्मास वाटतें. पण अझूनही ते उत्तम कळत नसतील. मागें डा० सिंक्लेअर साहेबांनीं त्रिकोण आणि वर्तुळ यांच्या आकृति फळ्यावर सहज काढलेल्या पाहून एके प्रसंगीं ते हायस्कुलांत आले असतां त्या वेळच्या लहान मोठ्या सर्व शिक्षकांस त्रिकोण आणि वर्तुळ हातानें दाखविण्यास त्यांनीं सांगितलें. प्रत्येकानें त्रिकोण दाखवितेवेळीं रेषावरून हात फिरविले व वर्तुळ दाखवितेवेळीं परिघ रेषेवरून बोट फिरविलें. त्यांना कोणाचेंचे दाखविणें पसंत पडलें नाहीं. मग त्यांनीं स्वतः फळ्यापुढें येऊन आपल्या हाताचा पंजा आंतल्या अवकाशावरून फिरविला आणि त्रिकोण ह्मणजे रेषांच्या आंतली जागा आणि वर्तुळ ह्मणजे परीघाच्या आंतील जागा हें सांगितलें. अशा गमती त्यांनीं अनेक वेळा कराव्या व तुह्मी अझून पोर आहां असें शिक्षकांस दाखवून खऱ्या ज्ञानाच्या गोष्टी त्यांस सांगून त्यांच्यावर उपकार करावे त्या गोष्टी शिक्षकांस मात्र कळाव्या, जवळ असलेल्या विद्यार्थ्यांस समजल्या सारख्या भासाव्या पण त्यांचें वर्म त्यांस कळून येऊन आनंदही वाटूं नये. आह्माला मोठेपणीं जेव्हां कांहीं गोष्टी कळूं लागल्या तेव्हां असें वाटूं लागलें कीं लहानपणीं त्या गोष्टी आह्मास काय कळल्या असतील कोण जाणे? आह्मांला पुष्कळ शिक्षक चांगले होते व त्या त्या वेळीं त्यांनीं आपली कमाल केली असेल. अशा संबधानें एके प्रसंगीं आह्मी एका विद्वान् मित्राशीं बोलत असतां असें ह्मटलें कीं जसें हल्लीं आह्मी मनापासून मुलांना शिकवितों व एकेक गोष्ट त्यांच्या मनांत भरवून देतों असें आमच्या शिक्षकांनीं केलें नसेल. कारण कांहीं गोष्टी ज्या आह्मांस आतां कळूं लागल्या आहेत त्या पूर्वीं कधींच कळल्या नाहींत असें वाटतें.

यावर त्यांनीं असें उत्तर दिलें कीं तुमच्या शिक्षकांनीं ही असेंच शिकविलें असेल. त्या कालच्या मानानें तुह्माला त्या काळीं तितकेंच समजायचें. हल्लीं ही ज्या गोष्टी आह्मास उत्तम कळतात त्या आमची कमाल करून आह्मी मुलांस सांगतों परंतु जरी ह्या त्या वेळीं मुलांस समजल्या सारख्या वाटतात तरी त्या फार दिवस टिकत नाहींत.

[ पुढें चालूं ]

---

लार्ड राबर्टस माजी हिंदुस्थानचे कमांडर इन चीफ यांनीं आपल्या चरित्रांत इंडियाविषयीं पुष्कळ अभिप्राय ठोंकले आहेत. त्यापैकीं इंडियन पलटणी संबधाचा त्यांचा विचार स्वकीय बढाई मारण्याचा फार आहे. ते लिहितात कीं इंडियन पलटणी मध्यें ब्रिटिश आफिसर हल्लीं पक्षां अधिक असावेत आणि प्राच्य लोक शूर व लढवय्ये आहेत तथापि दैववशात् त्यांच्यामध्यें आधिपत्य स्वीकारण्या सारखे गुणी लोक नाहींत असें आपला अनुभव व इतिहास सांगतो. हा शेरा टाइम्स कर्त्यांनीं मोठ्या आनंदानें प्रकाशित केला आहे आणि त्यास आपल्या समर्थनें मंडितही केला आहे. हिंदुस्थान देशांत लढाया पुष्कळ झाल्या आहेत आणि त्या त्या वेळीं आमच्या देशांतल्या लोकांनीं मोठमोठे पराक्रम केले आहेत इतकेंच नाहीं तर राज्यें स्थापिलीं, शहरें वसविलीं, आणि जगांतील सर्व कलांचें व विद्यांचें माहेरघर या देशांत बनविलें. लष्करीच काय पण सर्व प्रकारचीं अधिकारसूत्रें आमच्या लोकांनीं मोठ्या निर्विवादपणानें चालविलीं आहेत. शिवाजी महाराज, बाजीराव, रणजितसिंग, महादाजी शिंदे, तुकोजी. होळकर इत्यादि नामांकित नररत्नांनीं हा देश शोभायमान झाला होता तेव्हांचे पराक्रमाविषयीं स्मरणशक्तीने लार्ड राबर्टस यांस दगा दिला असें आह्मांस वाटतें. हत्याराच्या कायद्यानें सर्व प्रजा निःशस्त्र केली आहे आणि लष्करी शाळा नेटिवासाठीं नाहींत असें असूनही नेटिव पलटणींनीं ब्रिटिश राज्याचा विजयदुंदुभी सर्वत्र गाजविला आहे तें विसरण्याचो कृतघ्नता पाहून फार वाईट वाटतें. अगोदरच लष्करी खर्च फार अवाढव्य वाढला आहे. आणि त्यांत नवीन ब्रिटिश आफिसर अधीक नेमण्या विषयीं सूचना केली जात आहे!

---

ब्रिटिश राज्यकारभाराच्या खर्चा संबधानें जें रायल कमिशन बसलें आहे त्या पुढें लार्ड नार्थब्रुक यांची साक्ष झाली. लार्ड साहेबांनीं आपल्या जबानींत स्पष्ट कळविलें कीं हिंदुस्थानावर जो खर्च मोहिमांचा वेळोवेळ इंग्लंडानें बसविला आहे तो अन्यायाचा व स्वार्थपरायणतेचा आहे. राज्यकारभाराचा खर्च खरोखर अस्ताव्यस्त व बेताल रितीनें चालला आहे अशा विषयीं इंडियाचे माजी फडणीस सर डेव्हिड बारबर व सर आकलंड कालव्हिन यांनीं खुलासेवार अभिप्राय पूर्वींच दिले आहेत. रायल कमिशन अखेरीस काय निकाल करील तें खरें!

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 8 1897

We gladly make room for the following summary of the speech of Mr. Kashinath Govind Natu delivered at a meeting held at Poona, to accord a public welcome to Dr Barrows the President of the Parliament of Religions held at Chicago in 1894.

"We meet here this evening to greet you. I am addressing you on behalf of my fellow townsmen who have to-

night allotted to me the pleasant duty of welcoming you. In point of ability, I must say that my countrymen have made but a poor choice in me. When I look around I am dazzled with the literary splendour of those who have been ever shining in the firmament of learning and with whose fame the country resounds from one end to the other. But so far as sincerity of heart is concerned I am proud to say that I am second to none: I have only a dinner of herbs but I am sure when it is offered with love to our guest, he will relish it better than the stalled oxen. My tongue may not express fully and properly the depth of my feeling. Dr. Barrow you will read my heart in the imperfect language I use. In that heart you will read the hearts of those who have filled this hall. In this heart you will read the hearts of those who could not attend from pressure of work. Though it is a single voice you hear you may rest assured that it is the citizens who speak through my person, poorly gifted as I am. Dr. Barrow, you have come to us in the fulness of time. In this age of hard materialism all the varied activities have been directed towards material advancement. Japan has become one of the wonders of the world. She has beaten China hollow. India is often asked when she is going to be in the scale of nations for she has not yet equalled France or Germany in her industrial products. The question of religion was shelved and when it was started it was often treated as a child's play. But thanks be to those men of this city who have started a reactionary movement and who oppose tooth and nail this extreme inattention to religion. There are also two powerful agents at work which have greatly contributed to make men's minds sensible of their graver responsibility. These are the famine and the plague. After the Sanitary Engineers and doctors had exhausted their remedies, when science has utterly failed even in mitigating the evil when nearly the half of Bombay has been depopulated, men have begun to see the hand of God in this dire calamity. The Christians are tolling their Church bells to call their co—religionists to prayer The Jews spend whole days in singing psalms. The Hindoos are trying to appease the exasperated Divinity by chanting hymns and offering sacrifices, Famine is again staring us in the face. In Upper India thousands are dying of starvation. When men are unable to avert calamities by ordinary means, then they have recourse to prayers and supplications. At this nick of time when men have a natural leaning towards God, religious instruction takes a firmer hold upon the heart and makes a deeper impression. Religion necessarily plays an important part in the civilization of nations. Christianity has had much to do with the existing prosperity of the west. Without religion, we cannot be. The existing form of it will not answer the requirements of the time. To be or not to be that is the question. There are deep—rooted principles in the Hindu's head which you never expect to eradicate. There is a platform of higher western thought which no sensible native can disregard. The Indian mind is as it were sea-sawing at present. Thus circumstanced who would not anxiously look for a ray of light however dim it may be, who would not wonder at the novel idea of the Parliament of religions at the World's Fair, who would not receive the President of that Parliament with ecstacy and fulness of heart? Your mission is twice blessed. It blesseth you and it blesseth us. The subject of worldly pleni—potentiaries is territorial possession or dispossession. Religion has an interest in the eternal future. God is the head of it and he who comes with credentials to communicate to his fellowmen something regarding this all—important scheme comes as one whose holy mission is divine embassy. Whom should we then hold closer to our hearts than yourself who have taken up thus arduous task and whose object is to throw light on the path of those who are sailing eternity's wide expanse without any one to guide their course. You are welcome therefore as our dearest friend. You are welcome to us the messenger of peace and unity. Thrice welcome you are to this city of antic renown. We belong to a different nationality. If there be any awkwardness in the manner of reception—if I have said any thing which I ought not to have said, if I have omitted any thing which I ought to have said pardon me this failure. It has not arisen from want of sincerity. It may be the mere outcome of ignorance. Pray accept thus reception. It is a heartfelt token of love and regard for you and is only an earnest of what our heart contains."

After this welcome Dr. Barrows rose and said—A generous lady from America has founded a lectureship on comparative theology. The lectures are to be delivered at Calcutta and other principal centres of India. I am appointed the first lecturer in connexion with the foundation. The Parliament of religions of which I had the honor to be the President was not like a congress of Budhastic priests held under the direction of the Emperor Asoka 3000 years ago nor was it like the Mogal Emperor Akbar's meeting of the several disputing Pandits and Kazis. But it was the result of a spirit of toleration and sympathy. The representations of the principal ten religions of the world had their say about their religious conviction. After this Dr. Bhandarkar thanked the guest and the proceedings terminated with the singing of one or two Padas.

We hope to give in our next issue a summary of Dr Barrow's lectures which are sure to be a permanent monument of the finest literatura.

---

With the increase of famine the duties of respecting the safety of purse and person become rather most arduous and taxing. The offences against human body and property have become more numerous and extensive. We expect to see them run to large figures and should know well the golden rule 'forewarned is fore—armed.' This means an additional measure of precaution that the Police department should take in order to check the growth of offences. The hands of the police force should be strengthened with new recruits and their discipline should be of the highest watermark. We wish to signalize the danger that might spring up as the result of the inadequate control of the police department. In our town itself the burglars are at full play and we do not know when they will behold the last day of their jubillations of the present hour. Messrs Prideaux and Galloway work hard to maintain the peace and we think our interests will be safe in their hands. On Tuesday last, Mr. C. Shamrao 1st class Magistrate, Akola had to face two ruffians at his Bunglow. The latter aimed a deadly blow at his head but it slipped slantingly over his face. The gentleman had a narrow escape and we congratulate him on this new lease of life

It is however a matter of suprise that when Mr. Shamarao was calling loudly for help no soul could move from the Police-Reserve Lines at a very short distance. It is to be regretted that this event confirms the public belief that the discipline of the police establishment is growing lax and lethargic. We hope that a searching inquiry will be made into the matter; and matters will soon be set right under the vigilant control of our District Superintendent. It is understood that a gang of some 8 or 10 dacoits is doing a horrid work and it rests with the police to see that it is no small thing that a magistrate should be attacked in this manner.

## वऱ्हाड

हवामान— थंडीचें मान उतरत चाललें आहे. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं. रब्बीचीं शेतें शिवाय करून बाकीच्या जमिनींत नांगरठी वगैरे पुढील पीकासाठीं चालू आहेत. यंदा पाण्याचें दुर्भिक्ष्य पुष्कळ ठिकाणीं दिसतें.

म्युनिसिपालिटीच्या सभासदांची निवडा निवड गेल्या महिन्यांत झाली त्याचा निकाल असाः—

| रा. रा. | वार्ड नंबर |
|---|---|
| लक्ष्मण गोविंद ओक | १ |
| मिरझा आबासबेग | ॥ |
| केशव गोविंद दामले | ॥ |
| सिलिमखान दाऊदखान | २ |
| मौलवी हकीमुद्दीन | ॥ |
| चुनिलाल गुलाबचंद | ॥ |
| उमरखान लालखान | ॥ |
| एच. व्हांडरपुट | ३ |

मि० आर. आवर्ड जुडिशिअल कमिशनर यांनीं सध्यां रजेवर जाण्याचा बेत रहित केला आहे.

पुढील सोमवारा पासून एक आठवडा भर आकोल्यास सेशन कोर्टाचें काम चालणार आहे. तीन मोकद्दम्यांची चौकशी होणार अहे.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी० ए० हे अंतुरकराच्या कित्या संबंधाच्या दिवाणी खटल्या निमित्त येथें साक्षीस आले होते. ते परत दवऱ्यावर यवतमाळास गेले आहेत.

खान बहादूर शमसुद्दीन अल्लीखान डिपुटी कमिशनर हे आकोल्यास आले असून परवां मेडिकल बोर्डा समोर हजर झाले आणि त्यांची रजा आणखी ६ महिने आजारीपणा निमित्त वाढविण्यांत आली आहे. खान बहादूर काल रोजीं परत हैदराबादेस गेले.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं, रा० रा० गोपाळ नारायण देशपांडे वकील तेल्हारा यांस क्षया सारख्या तापानें देवाज्ञा अगदीं तरुणपणांचि झाली.

लेफटेनंट डी० ओ० मारिस यांस वऱ्हाडच्या हद्दींत 'जस्टिस आफ दी पीस' नेमण्यांत आलें.

रा. रा. सी. शामराव अब्याची, माजिस्त्रेट वर्ग १ यांच्या बंगल्यावर गेल्या मंगळवारीं रात्रौ डाकेखोर गेले होते. राजश्री शामराव शामराव साहेब यांच्या डोक्यावर वार झाला त्याबरोबर प्राणच जाण्याची वाईट वेळ आली होती. पण ईश्वरी कृपेनें तो घाव भिंतीवर पडून त्यांच्या नाकातोंडा जवळील भागावर निसटता लागला. बहुत आक्रोश केला असतां जवळच्या पोलिस रिझर्व्ह लायनींतून मदत न आल्यामुळें चोरांचा नापत्ता झाला. पोलीसची सुस्ती व ढिलाई आहे असें लोक बोलतात पण आनंदाची गोष्ट कीं डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट या चौकशींत मनापासून झटत आहेत.

येथील पुलाच्या मागें पुढें जो लांकडी कठडा आहे तो मोडकळलेल्या स्थितींत असल्यामुळें गुरें कित्येक प्राणास मुकतात. अधिकाऱ्यांनीं इकडे लक्ष्य पुरविल्यास बरें होईल.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,,( बनशी ) | १२५ रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७॥। मण |
| सोनें | २९॥। तोळा |
| चांदी | ८७॥ |

### मथुराबाई मराठे

गुणाचा जिथें वास तें गौरवावें,
न रूपा न लिंगा मनीं वागवावें;
अशा नीति-संपन्न-वाक्यानुसारें,
तुला गौरवीता भरें हर्षवारें १
पिका-कंठ-देशांतल्या गोड ताना,
विधु क्षेपितो भूवरी वा करांना;
खेरें पुष्प निस्यंदें-वर्षाव जेवीं,
निघालें तुझ्यापासुनी पद्य तेवीं ! २
स्वजातीय पाहून झाली प्रसन्न,
तुला काव्य देवी विशेषें करून;
असें वाटलें गोड आर्या बघून,
कसा दाखवूं हर्ष हा तो लिहून ? ३
विलासप्रिया, कोमलांगी, उदारा,
सुरम्या, विशुद्धांतरा, भावयुक्ता;
अशी वाङ्नटी पाहतां ही तुझी मी,
कशाला गुतावें वृथा स्वर्ग-कामीं ? ४
महाराष्ट्र देशांत, सारस्वतांत
फिराया कमी योषिता लागल्यात;
अशा अल्प संख्येंत तूं मोडतेस,
स्तवा पात्र तूं यामुळें जाहलीस. ५
सदां आपला काळ सत्काव्यसंगें,
तुवां घालवावा असा गे शुभांगे;
प्रसिद्धीस यावेस तूं सद्गुणांनीं,
असें इच्छितों सेर्प मी एक कोणी. ६

BEE.

---

१ नीति संपन्न पुरुषाच्या वचनास अनुसरून. २ वाहणें. ३ रसाचा वर्षाव. ४ निरनिराळ्या रसाविषयीं आवड जीची. ५ कठोरपणा ह्मणजे क्लिष्टत्व जींत नाहीं ती. ६ प्रसाद गुण युक्त. ७ मधुर आहे वर्ण रचना जिची. ८ विशुद्धां—दोषरहित. ९ भावयुक्ता—अष्ट भाव जींत आहेत अशी. १० ग्रंथ समूहांत.

---

## वर्तमानसार.

केटा रेलवेस मागच्या शनवारी अपघात होऊन दोन माणसें मेलीं व दोन जखमी झालीं.

मुंबईच्या सांथीमुळें एडन येथें नाकेबंदी करा असें टर्की सरकारचें इंग्रज सरकाराजवळ ह्मणणें आहे.

सांथीच्या प्रांतातला कांहीं माल कोणी फ्रान्सांत आणील तर सक्त दंड होईल असें फ्रान्सानें ठरवून टाकलें.

मुंबईची सांथ सगळ्या हिंदुस्थानभर झाली आहे असें समजून रशियानें आपली व्यवस्था चालविली आहे.

मुंबईच्या सेक्रेटरीयट आफीसांतील कित्येक कामदार गेल्या सोमवारपासून बायकामुलांसह ठाण्या शेजारी तयार होत असलेल्या वेड्यांच्या हस्पितळाकरतां तयार झालेल्या इमारतींत येऊन राहिले. त्यांस स्वयंपाकाकरतां वेगळालीं झोपडींही बांधून दिलीं. त्यांच्यापासून कांहीं नियमित भाडें घेतलें जाणार असें सांगतात. वेड्याकरतां तयार होणाऱ्या इमारतींत प्रथम वेड्या नव्हत अशा शहाण्या व सुशिक्षित लोकांनीं रहाण्यास येऊन त्या इमारतींची वरभरणी केली हें सुचिन्हच ह्मणावयाचें.

हल्लीं जी दुष्काळकामावर माणसें आहेत त्यांबद्दल सरकारास दररोज सुमारें २ लाख रुपये खर्च येत आहे. कोणत्या भागांत किती माणसें रिलीफ कामावर आहेत व फुकट खाणारी किती आहेत याचा तपशील पुढील प्रमाणें आहे:—

| प्रांताचे नांव. | कामावर | फुकट |
|---|---|---|
| नार्थवेस्ट प्रांत | ७,२६,००० | ९६,००० |
| बंगाल प्रांत | २,३३,००० | ४४,००० |
| मुंबई इलाखा | २,५०,००० | ८,००० |
| मध्य प्रांत | २,३१,९९० | १४,००० |
| पंजाबप्रांत | ६४,००० | १५,००० |
| मध्यहिंदुस्थान | ३८,००० | ४,००० |
| वर्धाप्रांत | २३,००० | ६,००० |
| मद्रासप्रांत | २१,००० | ८,००० |
| रजपुताना | २६,००० | २,००० |
| | १६,१२,००० | १,९७,००० |

आफ्रीकेंत जो फ्रेंचांचा प्रांत आहे त्यांतील लोकांस मुंबईच्या सांथीमुळें मक्केस जाण्याची फ्रेंच सरकारानें सक्त मनाई केली. ठा० अ०

विलक्षण फिर्याद—अनंतापूर जिल्ह्याच्या लोकांनीं सरकाराविरुद्ध अशी तक्रार केली आहे कीं, पावसाचा हंगाम गेल्यावर ही पाऊस पडेल. अशी जाहिरात सरकारानें 'ग्याझेटमध्यें' दिली ह्मणून आह्मी पेरण्या केल्या, पण पाऊस पडला नाहीं. आणि आमचें नुकसान झालें.

मिरजेच्या कांहीं फाजील ब्राह्मण मंडळीनें विजापुराकडील एका ब्राह्मणास, शूद्राची मुलगी ब्राह्मणाची ह्मणून सांगून नवरी करून दिली. पुढें ती आपल्या नवऱ्या बरोबर येथील देवीच्या दर्शनास आली असतां तिनें आपल्या खऱ्या [ शुद्र ]बापास ओळखून मिठी मारली. तेव्हा हें सर्व बेंड बाहेर आलें, पण हे प्रकरण मुकाट्यानें आपसांत भागल्याचेही कळतें.

पन्हाळ पेट्यांतील मौजे सरूड येथील तिघेजण मुंबईस कांहीं कामा करितां गेले होते ते कोकणांतून परत आले. परत येते वेळीं संगमेश्वर येथें त्या तिघांपैकीं एकजण सांथीच्या तापानें मेला. दुसरा घाटावर आल्यावर मेला व तिसरा घरीं येऊन मेला. त्याची पथ्य पाण्याची व्यवस्था ज्यानें केली तोही इसम वारला हल्लीं त्या घरांतील आणखी एकजण त्याच विकारानें लागला आहे.

बळाचा ताप ज्याला येईल त्याला ताप आल्यापासून पाहिले चोवीस तास मुळींच निजूं देऊं नये.

या तापांत झोप जितकी कमी घ्यावी तितका दुखण्याला आराम पडेल. दी० बं०

मुंबईतील पोष्टाच्या शिपायांना एकत्र जमून मुंबईबाहेर आपणास राहण्यास परवानगी द्यावी; रेलवे तिकिटें फुकट द्यावी. डिलिव्हरींची संख्या कमी करावी, आणि सांथी मुळें शिपाई मेला तर त्याच्या बायकामुलांस पेनशन किंवा कांहींतरी देणगी द्यावी असा अर्ज पोष्टमास्तर जनरलाकडे केला आहे.

मुंबई सरकारचे अंडर सेक्रेटरी मि. कर्टिस हे मद्रासचे अक्० पोष्टमास्तर जनरल झाले आहेत.

कमिट झाला—सिकंदराबाद येथील युरोपियन पोरपाडीचा खटला मुंबईच्या सेशनांत कमिट झाला, ता० २ फेब्रवारीला चालणार, आरोपी मि० टेंपल्टन याजवर खोटी साक्ष दिल्या बद्दलही आरोप ठेविलेला आहे.

मनमाडच्या बाजाराला गेलेले येवल्याचे व्यापारी बाजार करून परत येत असतां रात्रीं सात आठ इसम त्याला आडवे आले आणि गाड्या आडवून त्यांनीं लूट केली. चोरटे हत्यारबंद होते.

गोव्यांचें नाणें खजिनदारांनीं आतां घेऊं नये; त्यांचे मार्फत टंकसाळींत तें नाणें गेल्यास त्याचे रुपये त्यांच्या अंगावर पडतील असें अकौं० जनरलांनीं फर्माविलें आहे.

आग्रा म्युनिसिपालिटीचे यूरोपियन इंजिनियर मि. बर्कले यांनीं मद्रास ब्यांकेंत एक बनाऊ चेक वटाविल्याबद्दल त्यांस कैद केलें आहे. स० शो०

सूर्यबिंबावर डाग—हल्लीं सूर्य बिंबावर एक मोठा डाग दिसूं लागल्याचें मद्रास येथील वेधशाळेंतील ज्येतिर्विद मि० स्मिथ यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हा डाग दुर्बिणीशिवाय सुद्धां काजळ लाविलेल्या भिंगांतून दिसतो असें त्यांनीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें आह्मी पाहिलें, परंतु स्पष्ट दिसण्यासारखा तसा डाग बिंबावर दिसत नाहीं.

तारायंत्रानें पाऊस धरला—बुशायर येथें यंदां पाऊस नाहीं; ह्मणून तेथील ग्राम्य मंडळी त्याच्या कारणाचा शोध करतां त्यांत विचार निघतां निघतां तेथील तार आफिसांत कांहीं तरी खोडगत असावी आणि त्यामुळें पाऊस पडेनासा झाला, असा या मंडळीनें कियास काढला. इतका शोध काढल्यावर मग काय? दुसऱ्या दिवशीं एक टोळी करून लोक तेथील तारहपिसावर चालून गेले, आणि आंतील यंत्रे बॅटरीसह वगैरे फोडून तोडून यांनीं चुराडा उडवून दिला. हा प्रयोग झाल्या नंतर काकतालीय न्यायानें तेथें बराच पाऊस पडला. यामुळें तर लोकांच्या समजुतीचें फारच दृढीकरण झाले हें सर्व खरें परंतु आतां त्या लोकांस सरकारानें पकडून त्यांच्यावर खटले चालविले आहेत असें टा० इं० वरून समजतें. न्या० सु०

चांगलें केलें— मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटची सभा ता० १९ रोजी भरली होती. त्यांत सरकारी आर्टस, मेडिकल आणि लॉ कालेजांतील विद्यार्थी चालू टर्ममध्यें सांथीच्या भीतीनें कालेजात हजर राहिले नाहींत तरी चालेल; त्यांवर सक्ती नाहीं, असा फार सोईचा ठराव करण्यांत आला. त्याप्रमाणें कानव्होकेशनची बैठक फेब्रुवारींत तिसरे मंगळवारीं भरावयाची तीही तहकूब ठेवण्याचा ठराव केला.

ता. करमाळें जिल्हा सोलापूर येथें दर शुक्रवारी गुराचा मोठा बाजार भरत असून तेथें दोन आण्यापासून जनावरें विकली जातात. काय ही शोचनीय स्थिति, ! धर्मात्मे लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें.

सोलापूर जिल्ह्यांतून गुरांची सुमारें एक लक्ष कातडी मुंबईकडे रवाना करण्यांत आलीं. न्या० सिं०

मुंबईत चालू असलेल्या तापाचे रोगी बरे न झाल्यास मला फांशीं द्या असा एक अर्ज कोणी वैद्यानें म्यु. पा. कडेस पाठविला आहे.

पोलिसची नोकरी न विचारतां सोडून गेल्याबद्दल एका मुसलमानास १ महिन्याची शिक्षा झाली.

जंबूसर— या तालुक्यांत कपासीची कापणी सुरू आहे. ज्वारी कपासी आणि तुरी यांचे उत्पन्न बरें आहे. ज्वारी २९ शेर, तांदूळ बाजरी १७ शेर, गहू, डाळ, चणें, १६ शेर, तीळ ११ शेर कोद्रा ३२ शेर याप्रमाण धान्याचे भाव आहेत.

डा० हाफकिन यांचे औषध कराचिस पाठविण्यांत येणार आहे.

काशी येथील मि० ज्वला प्रसाद मुनशी यांनीं मनुष्यांचे शरीरामध्यें कमी असणारे रंग घालून सर्व प्रकारचे रोग बरे करण्याचें एक नवीन शास्त्र प्रचारांत आणण्याचा क्रम चालविला आहे.

मुंबईचे माजिस्ट्रेट मिस्तर दस्तूर यांनीं आपल्या अधिकारा बाहेर एका व्यापाऱ्याच्या चोपड्या जप्त करून कलकत्यास पाठविल्या. त्या बाबतींत आपील होऊन चोपड्या जप्त करण्याचा अधिकार माजिस्ट्रेट यांस नाहीं. ज्याच्या त्यास चोपड्या परत आणवून द्याव्या असा हा० कोर्टाचा हुकूम झाला.

भारतमित्र पत्राचा एक बातमीदार लिहितो कीं, मुंबई येथील एका श्रीमंत सावकारानें श्रीक्षेत्र काशी येथें संस्कृत कॉलेज नवीन चालू करावें या करितां १ लाख रुपये देण्याचा संकल्प केला आहे यांचें नांव धर्मनिष्टा. आ. व.

हिंदुस्थानाशीं व्यापार होणाऱ्या इंग्रजी बंदरांवर मुंबईच्या सांथीचे लोक त्या त्या बदरांत न येण्याकरितां खबरदारी घेण्यासाठीं इंग्लंड सरकारानें डाक्टरांच्या नेमणूका केल्या आहेत.

अबिसीनीयाच्या राजानें इटालीच्या राजाचे कांहीं लोक कैद केले आहेत व आरिथी हें ठिकाण पूर्णपणें सोडून दिल्याबाचून तुमच्या कैद्यास आह्मी बंदमुक्त करणार नाहीं असें आबेसिनियाच्या राजानें इटालीसरकारास कळविलें आहे यावरून इटालीस आफ्रिकेंतून साफ निघून जाण्याची पाळी येणार असें दिसतें.

हिंदुस्थानातले जे डाक्टर बिलायतेस रजेवर आहेत त्या सर्वांस तावडतोब हिंदुस्थानांत जाण्याचा हुकूम झाला. मुंबईची सांथ हें त्याचें कारण आहे. बिलायतचे कांहीं डाक्टरही हिंदुस्थानांत यावयाचे आहेत.

तापामुळें पक्षकार निघून गेल्यानें मुंबईच्या हैकोर्टांत काम नाहींसें झालें आहे व यामुळें त्या कोर्टाचे दोघे जज्ज मेसर्स पार्सन व क्यांडी हे अनुक्रमे गुजराथेंत व महाराष्ट्रांत कोर्टें तपासण्याकरितां फिरावयास निघणार आहेत.

मुंबईच्या विद्वान शास्त्रीलोकांची मागच्या आठवड्यांत बाबुलनाथाच्या देवळांत एक सभा झाली व मुंबईचा रोग शांत होण्याकरितां शास्त्राप्रमाणें काय तजवीज करावी यावद्दल भवतीनभवती झाली. नेपाळचे प्रसिद्ध शास्त्री नीलावर ओझाजी हेही हजर होते. सोनापूरची स्मशानभूमी व मुंबईची तशीच दुसरीं स्मशानें यांत सतत तीन दिवस पर्यंत कालिका देवीच्या नांवानें उग्र अनुष्टानें करण्याचें ठरलें आणि त्याच्या योगानें रोगाचें शमन झाल्यावर देवीस महानैवेद्य देण्यांत येणार आहे.

आस्ट्रेलिया, न्युझीलांड, कानडा, हांगकांग, सिंगापूर, केपटाउन, जोहानसबर्ग व शांघाई येथें ही हिंदुस्थानच्या दुष्काळाकरतां वर्गणी जमविण्याची चळवळ सुरूं झाली आहे.

हिंदुस्थानच्या खर्चाचा विचार करणाऱ्या कमिशनचें काम सुरूं झालें, एप्रिलांत खलास होईल.

काश्मीरच्या हद्दींत झपाट्यानें बर्फ पडण्याचीं सुरवात झाली.

१२ रुपयांच्या आंतल्या पगाराच्या नोकरांस दरमहा १ रुपया जास्त देण्याचा बंगाल सरकारानें हुकूम केला!

बंगाल्यांतल्या रिलीफ कामावर २,३३,००० व फुकट खजारीं ४४,००० माणसें झालीं.

बंगलोरास सन्निपात ज्वराची सांथ सुरूं झाली आहे.

कलकत्याच्या फामीन फंडाची रकम ३,७४,००० रुपये झाली.

दुष्काळकामावर लागलेल्या ज्या लोकांस दुष्काळाचें सक्त काम करवण्यासारखें नाहीं अशा लोकांस त्यांच्या घरींच खाण्यास द्यावें असें ले. गव्हरनर सर माकडोनल्ड यांनीं ठरविलें आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास .......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ........... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly......... 3 ...... ... ...,, 8 as
Single copy ................. ......... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

THE BERAR SAMACHAR
VOL XXXI — AKOLA MONDAY 15 FEBRUARY 1897 — NO 7
वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख १५ माहे फेब्रुवारि सन १८९७ इ० — अंक ७

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक } R. Aitken
आकोला १।७।९६. } Agent

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध १३ शके १८१८

हैदराबादेस वुइटेकर बाईच्या गर्भपातासंबंधानें व आकस्मिक मरणा संबंधानें टेंपलटन नांवाच्या गृहस्थावर मुंबईच्या हायकोर्टाच्या सेशनांत खटला चालणार होता पण पुढील मार्चाच्या ८ वे तारखे पर्यंत तो तहकूब ठेवण्यांत आला. या टेंपलटन प्रकरणांत हैदराबादच्या दरबारांतही मोठा बखेडा माजला आहे. पुष्कळ मोंगलाई अलिशान रेसिडेंट यांनीं चालविली होती असा लोकांचा खरा खोटा समज आहे. एका व्यभिचाराच्या पोटीं किती लंचाडें उद्भवतात याचा नेम नसतो. दुष्कर्माचे छटे कोठें कोठें उडतात व ते केव्हां चटकन उजेडांत येतात हें चाणाक्ष मनुष्यास देखील ताडतां येत नाहीं. टेंपलटन प्रकरणांत अनेक लोक कायद्याच्या तडाक्यांत सांपडतील अशी अफवा आहे.

---

टेंपलटन प्रकरणांत ह्मणा किंवा अन्य राजकीय प्रकरणांत ह्मणा नबाब सरवर जंग यांनीं हैदराबाद सोडून मुंबईचा रस्ता धरला. हे नबाब निजाम सरकारचे पूर्वी शिक्षक होते आणि अलिकडे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. यांच्याच हातीं सर्व राजसत्ता होती आणि त्यांचें गमन एकाएकी झाल्यामुळें सर्व लोक आचंब्यांत पडले आहेत.

---

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

( रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला. ) नंबर ३

असें जेव्हां आह्मी पाहतों तेव्हां विद्यार्थ्यांचें समजणें हा केवळ आभास होय असें आह्मांस वाटतें. वर ज्या मित्राचा आह्मी उल्लेख केला आहे त्यांनीं आह्मांस एके प्रसंगीं विचारलें कीं चंद्राच्या कला कशा होतात आणि ऋतु कसे होतात, हें आपणांस समजलें आहे काय? आह्मी ह्मटलें हो. मग त्यांनीं वेड्याचें सोंग घेऊन ते आपणांस समजून देण्या विषयीं आह्मांस सांगितलें. आह्मी समजविण्यास लागलों. तेव्हां त्यांनीं जे एकावर एक प्रश्न चालविले त्यांत त्यांनीं आह्मांस इतकें गोंधळून टाकलें कीं आह्मीं कसा ही यत्न करून पाहिला तरी जुळेना. मग खरोखर विचाराल तर " आह्माला ही हा विषय जसा समजायला पाहिजे तसा समजला नाहीं " असें सांगून त्यांनीं असें विधान केलें कीं ज्या तत्व वेत्त्यांनीं हे शोध आरंभीं लावले त्यांचेंच या विषया संबंधानें ज्ञान खरें, बाकीच्यांचें ज्ञान तितक्या अधिकारास पोहचलेले विद्वान खेरीज करून न्यूनाधिक्यें करून भासवत् समजायचें. ह्या सर्व प्रतिपादनांत आमचें तात्पर्य असें कीं अधिकार ही गोष्ट शिक्षणांत अत्यंत महत्वाची आहे. ज्या विद्यार्थ्यांचा जितका अधिकार असेल तितक्या पुरतेंच त्यांना शिकवावें. जास्त शिकविल्यास ती मेहनत व्यर्थ जाणार आहे. तात्पर्य अधिकारावाचून ज्ञानदान करणें केवळ श्रमासच कारण आहे. क्वचित् फलप्राप्ति झाली तरी ती फारच अल्प होते. हल्लीं खरें ज्ञान करवून द्यावें असा आपला उत्साह इतका वृद्धिंगत झाला आहे कीं त्या मध्यें अधिकार अनधिकार याचा पूर्ण विचार आपण करतों आहों किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. उत्तम शिक्षकांस अमुक काळांत काम तयार करण्याचें बंधन नसलें पाहिजे. व्यवहार देखील असाच आहे. एखाद्या कारागिरास जर सांगितलें कीं अमुक एक काम अमुक दिवसांत चांगलें करून दे, तर तो एकदम सांगतो कीं चांगलें करून देतों, पण घाई करूं नका. दोन दिवस जास्त लागतील. आपण ह्मणतां तितक्या दिवसांत करतों पण मग नांव ठेवूं नका. न्यायखात्यांत ही कामाचें एक प्रकारचें माप आहे. वर्षांत अमुक मुकदमे फाईल झाले व अमुकांचा निकाल झाला. जो न्यायाधीश जास्त मुकदमे फाईल करून पुष्कळांचा निकाल करील तो ' उत्तम ' न्यायाधीश, अशी साधारणतः वहिवाट आहे. त्या खात्यांतले एका न्यायाधिशास असें ह्मणतांनां आह्मी ऐकलें कीं ही कोठली मापाची रीत. ते न्यायाधीश पापभीरू असून होईल तेथपर्यंत योग्य न्याय द्यावा अशी त्यांची इच्छा असे व एकेक मुकदम्याचा निकाल करण्यास त्यांस बराच वेळ लागे, व कांहीं मुकदम्यास तर महिनेच्या महिने किंवा एखादें दुसरें वर्ष ही लागे, तेणें करून त्यांचे मुकदमे एकंदर कमी होत व ह्या बद्दल त्यास नेहमीं जबाब द्यावा लागे. व या इंग्रजी पद्धतीस ते नेहमीं शिव्या देत. आणि या पद्धतीमुळें इंग्रजी कायदे कानू चांगले असून ही लोकांस न्याय चांगला मिळत नाहीं असें ते ह्मणत. दडपादडपी न्यायाधीश मुकदमे भाजून काढण्याचे वेळेस ( हा शब्द कित्येक जण वापरतात ) असें ह्मणतात कीं आह्माला काय करावयाचें आहे, आमच्या पुढें जें आहे तितकें पाहून आह्मी निकाल लावतों, खोल पाण्यांत शिरण्याची आह्मांला कोणी पंचाईत सांगितली. पक्षकारानें लागेल तर अपील करावें. याच तऱ्हेनें भाषण करणारा आपल्यांपैकीं एक शिक्षक आमच्या पाहण्यांत आला. त्याचें ह्मणणें उगीच पोरांपाशीं उरस्फोड कशाला करावी; वर पुष्कळ इयत्ता आहेत. त्यांत तीं गेलीं ह्मणजे ह्या गोष्टी त्यांना हळूहळू कळतील. कारण उरस्फोड करायला लागलें ह्मणजे इयत्ता पुरी होत नाहीं. तेव्हां त्या संबंधानें जबाब देण्यास आह्मी आपल्यास पात्र कशाला करावें. तात्पर्य उत्तम काम होण्यास कालमर्यादा आणि कामाच्या इयत्तेची मर्यादा ह्या प्रतिकूळ आहेत. क्वचित् कोणी कारागीर इतका कुशल सांपडेल कीं ह्या दोन्ही मर्यादा तो कबूल करील पण आणखी एका गोष्टीची त्यास अपेक्षा राहील. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे ज्या वस्तूवर त्याला नकशी करावयाची आहे त्या वस्तूची उत्तम योग्यता. पण साधारणतः पाहूं गेलें तर या मर्यादा पतकरून उत्तम काम होणें कठीण. त्यांत आणखी शिक्षकाच्या कामाचें पारतंत्र्य स्वरूप पाहिलें तर अशी मर्यादा फारच दुर्घट वाटते.

आतां हल्लींची शिक्षण पद्धति क्रयविक्रयरूप आहे तेव्हां मर्यादा घातल्या वांचून ही इलाज नाहीं. दुसरें एकंदरीनें शिक्षक सामान्यच असणार तेव्हां मर्यादा घातली तर कांहीं तरी होईल, नाहींतर धरपकडीस कांहींच आधार रहाणार नाहीं हेंही उघडच आहे. हल्लींच्या वस्तुस्थितीचें सदोषत्व दाखविण्याचा आमचा इरादा नाहीं तर उत्तम शिक्षणास या मर्यादा नसणें आवश्यक आहे इतकेंच आमचें ह्मणणें आहे. कितीही जरी उत्तम शिक्षक असला तथापि विद्यार्थ्यास जें ज्ञान त्यानें दिलें असेल त्याचें जेव्हां आपण माप घेऊं लागूं तेव्हां शिक्षकाच्या भांडारा इतकीच त्याची गणना होणार नाहीं. शिक्षकानें जर पायली भर ज्ञान शिष्याच्या पदरांत घातलें असल तर त्याच्या पाशीं तें शेरभर तरी सांपडेल किंवा नाहीं कोण जाणें? इतकें सांपडलें ह्मणजे पायली भर त्याच्या पदरांत पडलें होतें असें अनुमान करण्याला हरकत नाहीं. उत्तम शिक्षकानें दिलेल्या ज्ञानाचे वास्तविक मापनाची ही गोष्ट झाली.

परंतु ज्या ठिकाणीं शिक्षक सामान्य असणार त्या ठिकाणीं याहून कमी माप भरणार आहे. मूळांतच सरासरीं शेरभर ज्ञान तेव्हां शिष्यांत ते शेरभर कसें भरणार? आणि आपल्या परीक्षेला तर तें शेरभरच भरलें पाहिजे या मुळें घोकं पट्टी किंवा cramming हा उपाय सहजच उत्पन्न झाला याविषयीं या निबंधाच्या अखेरीस थोडक्यांत विचार करण्याचा आमचा हेतु आहे त्यावेळीं या विषया संबंधानें चार शब्द लिहूं.

आतां परीक्षेंत पुष्कळ मुलें पास करणा
ऱ्या शिक्षका संबंधानें विचार करूं. शिक्ष
जर चांगला शिकविणारा असेल आ
मुलांस समजाविण्याची हातोटी त्यास अस
त्यांच्याकडून काम घेण्याची दगदग त्याल
उरकेल तर परीक्षेंत तो पुष्कळ मुलें पा
करील यांत शंकाच नाहीं. हातोटी ह्मण
ही कीं, जरी त्यानें विषय फार उत्तम प्रक
मुलांस शिकविला तथापि तो सर्वच मुल
ह्मणजे कळला असेल असें कांहीं नाहीं. ज
भोजराजाच्या सभेंत एकपाठी, दुपाठी,
पाठी असे पंडित होते ह्मणून आपण ऐक
तशींच आपल्या वर्गांतून मुलें असत
ह्मणजे एखादी गोष्ट एकदां सांगितल्याब
र कित्येकांस समजते, कित्येकांस दोन
सांगून समजते व कित्येकांस अनेकदां स
वी लागते. या मानानें शिक्षकानें मुलांचे
केले पाहिजेत व त्यांच्या त्यांच्या बुद्धि
प्रमाणें एकदां किंवा अनेकदां सांगून
त्यास समजविली पाहिजे. त्याशिवाय
सर्वांस समजली असें घेऊन चालतां येत
ही हातोटी सर्वच शिक्षकास असली प
पण ते उत्तम असोत किंवा सामान्य अ
आतां दगदग ह्मटली ह्मणजे मुलांस ती
पुनः पुनः विचारून तीं त्यांच्या
कायम ठेवणें. शिक्षकाचे कामाचा
भाग तो हाच कीं, एकदां सांगून स्वस्थ
सून रहातां येत नाहीं. परंतु निरंतर
संगी जो विद्वान शिक्षक, त्यासही
पतकरणार नाहीं व तो आपल्या शिक्ष
च अवलंबून राहील. पण यदा क
त्यानें दगदग केलीच तर तो पुष्क
पास करील यांत शंकाच नाहीं. क
असेच विषयनिष्णात शिक्षक
( असोत किंवा नसोत पण समजूत
आहे कीं ते असतात ) ह्मणून वर
लेल्या हातोटीची ही ते परवा करीत
त किंवा ही दगदग करीत नाहींत.
स्थान देऊन मोकळे होतात मग पुढें
होवो.

बईच्या फौजदारी तुरुंगांतही तापाची सुरू झाली आहे.

बईच्या तापसराईच्या बंदोबस्ताकरितां देशांतले कांहीं डाक्टर मुंबईस आले व तापसराईस हाणून पाडण्याकरितां आहेत.

वाब सुरवारजंग हे आजपर्यंत निझामाचे री होते. हे सेक्रेटरी असतां त्यांचा फार असून निजामाचे दिवाण तेच असें लोकांस भासत होते व त्यामुळें माच्या राज्यांतले पुष्कळ बंड लोक तिरस्कार करीत व त्यांस पाण्यांत होते. नवाब सुरवारजंग यांनीं ही पाहून आतां आपल्या चाकरीचा मा दिला व अझीम गडाकडे निघून यापुढें ते मुंबईस येऊन सुखवस्तु रा- आहेत असें सांगतात.

बईच्या आजारांत सांपडलेले लोक आ- राज्यांत येऊं नये ह्मणून निझाम सर- नें सक्त बंदोबस्त केला आहे.

नजामाच्या राज्यांतले वडे बापके बेटे इंद्र कर्ण बहादूर हे मद्रासेस यंदा फर्स्ट . झाले. त्या राज्यांतला इतका मोठा इतकें शिकल्याचें हें पहिलेंच उदाह- आहे.

त्या ५० वर्षांत नव्हता इतका कराची शीं गारठा आहे.

बईतली मुसलमानांची स्मशानभूमि बंद टाक बंदरावर १,२०,००० रुपयास नागा घेऊन ती स्मशानभूमी करण्यास सिपालिटि तयार आहे सगळ्या मुसल- नें मत घेऊन मग अमलांत आणणार.

बईची तापसराई बंद करण्याकरितां म्युनिसिपालिटीचे जे उद्योग चालू आ- त्याकरितां आजपर्यंत पांच लांख रुपये होऊन गेले असें सांगतात.

गाल नागपूर रेलवेचा असि. ट्राफिक जर मि. क्लार्क हा आपली बंदूक साफ असतां आवाज होऊन ठार

का पठाणानें लाहोर येथें एका इंग्रज ती आपल्या नवऱ्याबरोबर बाजारांत असतां ठार केलें पुढें त्या खुन्यास पक ाजिस्ट्रेटापुढें उभें केलें तेव्हां त्यानें लें कीं त्या स्त्रीचा खून मी केला. मी चा गाजी आहे आणि सगळ्या फिरंगीं स ठार मारून मुक्ती मिळवावी व कै- जाऊन सुखांत राहावें याकरितांच शावराहून आलों आहें. सगळ्याच यास मारण्याचा माझा इरादा असल्या त्या नवरा बायको दोघांसही मी फटके ले. ही सुरी माझीच असून या सुरी- मी त्या नवरा बायकोस भोसकलें. आ हा फाशीं जाऊन मग कैलासास र.

क ब्रह्मी माणूस आपल्या दोन लहा- मुलांसह पेगू येथें आला व पायलीभर ांस तीं त्यानें विकलीं असें सांगतात.

डन शहराभोवती तटबंदी करण्याचे ठ- त्याकरितां साडे पांच कोट कर्ज काढ- त्या सरकारानें ठरविलें आहे. हें स्वप्न कां !

आफ्रिकेंत ज्या इंग्रज चार्टर्ड कंपनीनें प्रकरण केलें ती कंपनी रद्द करून नवी कंपनी करण्याचें ठरलें.

फोर्मोसा बेटांत मुंबई सारखा रोग पुन्हा सुरू झाला.

क्रीट बेटाची स्थिती जास्त भयप्रद होत आहे. बाहेरचे पुष्कळ मुसलमान त्या बेटांत शिरत आहेत व बेटांतील ख्रिस्ती लोक त्या मुसलमानांस हरकत करण्याच्या तयारींत आहेत. एक ख्रिस्ती जज्ज व ४ मुसलमान यांचे खूनही झाले. ख्रिस्ती व मुसलमान यांच्यांत लढाया चालू आहेत.

विलायत सरकार आपली फौज, आरमार व तोफखाना वाढवीत आहे या नव्या व्यवस्थेंत त्या लष्करांत ७,३८९ लोक जास्त होऊन त्याकरतां खर्च ९८,४०० पौंड वाढणार आहे भूमध्यसमुद्रांत कांहीं जास्त पाहारेकरी ठेवण्याचा ही विचार आहे.

व्होट देण्याचा स्त्रियांस अधिकार आहे असें ठरविण्याबद्दलच्या कायद्याचें विलायतच्या लार्ड सभेंत दुसरें वाचन झालें

अ० द०

फेब्रवारीच्या ता० १९ रोजीं हैसूरचे महाराजांच्या वडील कन्येचा विवाह ठरला असून एकंदर राजेरजवाडे, सावसावकार लोकांस पाचारण पत्रिका गेल्या आहेत.

हिंदुस्थानांत दुष्काळ कामावर १५८०००, मजूर कामें करून उदरभरण करीत आहेत.

जयपूर दिवाणानें माळवा टा० पत्रावर लायबलची फिर्याद केली.

बेंगलोरास सन्निपात ज्वर अतिशय वेगानें फैलावला.

मुंबई इलाख्याची जमीनधाऱ्याची जमाबंदी सुमार ४॥ कोट रुपये आहे.

मालेगांव व इगतपुरीकडे ग्रंथिक ताप सुरू झाला.

महाराष्ट्र देशांतील दिवाणी कोर्टें तपासण्यास हायकोर्ट जज्ज आ. क्यांडी इकडे येणार आहेत.

अमेरिकेकडून "रेम्स" नावची आगबोट मका भरून हिंदुस्थानांतील संकट निवारणार्थ येत आहे.

म. मि.

या युगांतील तीन बिनतोड गोष्टी—(१) कोर्टाची नजर, (२) डाक्टरचा अभिप्राय व (३) इंजिनीयरनें केलेलें एस्टिमेट. न्या.

अत्यंत भयंकर कृत्य—हर्द्यास गेल्या मंगळवारीं एका साधूनें मोठ्या भयंकर तऱ्हेनें आत्महत्या करून घेतली. या संबंधी हकीकत तेथील एका गृहस्थाकडून अशी कळते कीं. तेथील प्रसिद्ध गृहस्थ रा. रा. नारायण गोविंद यांच्या मातुश्रीनें या साधूस कांहीं जमीन दान केली होती. या साधुनें त्या जमीनींत एक कुवा खोदून टुमदार व छोटासा बगीचा लाविला होता व तेथेंच पर्णकुटिका बांधून आपल्या शिष्यासह त्याच आश्रमांत रहात असे. सदरची जमीन दान करण्याचा अधिकार मातोश्रीस नव्हता सबब जों पावेतों तुह्मी आहांत तोंपावेतों या जागेचा उपभोग घ्या. पण तुमच्या पश्चात् शिष्य मंडळीस उपभोग घेऊं देणार नाहीं. अशा संबंधाचा एक करारनामा लिहून द्या; असें या साधूस सांगितलें, पण त्याला ती गोष्ट न रुचल्यमुळें त्यानें इनकार केला. ए. अ. कमि. मि. ग्रीन सा० यांचे कोर्टांत फिर्याद केली. कोर्टानें कबजाचा हुकुमनामा देऊन जागा खालीं करून देण्याचा व कुवा बुजविण्याचा हुकूम या साधूस दिला. ती गोष्ट त्या साधूस फार दुस्तर वाटली. दुसरे दिवशीं शिष्यांस गांवांत कांहीं कामाकरितां पाठविलें. व नंतर आपल्या जवळ असलेला राघूचा व पांढऱ्या उंदरांचा पिंजरा, पोथी व इष्ट देवता सन्मुख ठेवून पद्मासन साधलें व झोंपडीस आग लावून दिली. त्यायोगें ते सर्व प्राणी व सर्व सामान जळून गेलें. व साधू महाराजांचे गुडघ्या इतके पाय व हाताचे पंजे जळाले त्या योगें करून त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. ही बातमी गांवांत पसरतांच सर्व लोक तो प्रकार पहाण्याकरितां त्या शेतांत जाऊं लागले. दुसरे दिवशीं त्या साधूला समाधी दिली. तों पावेतों लोकांची दाटी तेथें सारखी लागलेली होती. हें भयंकर कृत्य पाहून हर्द्याच्या लोकांच्या मनांत नानातऱ्हेच्या कल्पना येत आहेत. या कृत्याचा अशा रीतीचा भयंकर परिणाम होईल हें कोणाच्या ध्यानीं मनींही नव्हतें. हें कृत्य पाहून नारायणरावास आतां किती वाईट वाटत असेल याची कल्पनाही करवत नाहीं.

खाजगी शेत असून स्वतः वाहणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ज्यांची पिकें १२ आणे बुडालीं असतील व ४ आणे पीक किंवा त्याहून कमी पीक आलें असेल अशा शेतकऱ्यांस यंदां सारा माफ व्हावा असें ठरल्याचें समजतें तसेंच ज्यांचीं शेतें गाहाण आहेत अशा शेतकऱ्यांनाही सरकारांतून तगाई देण्याचा ठराव झाला.

मुंबई येथें क्लोराइन नांवाचा एक ग्यास तयार करून तो सांथीचे घरांतून सोडून हवा स्वच्छ करण्याचे प्रयोग सुरू झाले आहेत. बायलरांतून जोरानें वाफ सुटतांना जसा आवाज होतो तसा हा ग्यास सोडतांना होत असून ज्या खोलींत त्याचा प्रवेश होतो, तेथें कीड मुंगी ही जिवंत राहत नाहींत असा त्याचा सपाटा आहे.

मुंबईतील पोष्टाच्या शिपायांना एकत्र जमून मुंबईबाहेर आपणांला राहण्यास परवानगी द्यावी; रेलवे टिकिटें फुकट द्यावी; डिलिव्हरींची संख्या कमी असावी; आणि सांथीमुळें शिपाई मेला तर त्याच्या बायकामुलांस पेनशन किंवा कांहीं तरी देणगी द्यावी असा अर्ज पोष्टमास्तर जनरलांकडे केला आहे.

गोव्याचें नाणें खजिनदारानें घेऊं नये; त्यांचे मार्फत टंकसाळींत तें नाणें गेल्यास त्याचे रुपये त्यांच्या आंगावर पडतील, असें अकौंट ऑफ जनरलांनीं फर्माविलें आहे.

काबुलास रुपयाचें पीठ बारा शेर मिळतें.

झांझीबार येथील सुलतान फार आजारी आहेत.

जानेवारी अखेर कुचबिहारचे महाराज विलायतेहून हिंदुस्थानांत येण्यास निघणार होते.

आन. सर हेनरी प्रिनसेप यांस व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसलाचें ज्यादा सभासद नेमिलें.

डेपुटी कलेक्टरांस शिक्षा—सितापूरचे डेपुटी कलेक्टर मुनशी सिद्धेश्वर नारायण यांजवर लांचाचा खटला चालला होता; त्याचा निकाल होऊन त्यांस ३ वर्षे सक्तमजुरी कैद व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली !

गोव्यांतील चमत्कार—सेंटझेविअर नामक सत्पुरुषाचें प्रेत दर १० वर्षांनीं गोव्यांत उघडण्याचा समारंभ होत असून त्यावेळीं तें प्रेत जीवंत असल्या प्रमाणें दिसतें, हा चमत्कार सुप्रसिद्ध आहेच. सदरहु महंताच्या च्यर्च्यमधलि घंटा थोड्या दिवसापूर्वी ह्मणजे ता० १७ दिसेंबर रोजीं रात्रीं वाजूं लागून तेथील मेणबत्या आपाप पेटूं लागल्या आपण आतां येथें राहूं इच्छीत नाहीं, रोम शहरी जाणार असा ध्वनि थडग्यांतून मोठ्यानें झाला. तेव्हां पासून पाद्री तेथेंच जाऊन येऊन असतात. शिवाय च्यर्च्य मधील क्रूस चक्राकार फिरत असून त्यांतून रक्तबिंदु पडत असता. असा चमत्कार झांत असल्याबद्दल गोव्यांतून पुष्कळ पत्रें बाहेर गेलीं आहेत!! गोवेकरांनीं नीळ रांपविली तर नसेलना ?

मुंबई येथील तुकाराम तात्या डाक्टर कावजी पटेल स्ट्रीटमध्यें धर्मार्थ दवाखाना नंबर ९ हे केसरी कर्त्यांस असें कळवितात कीं ग्रंथीक सन्निपातावर औषध:—

१ ज्या ठिकाणीं हा रोग चालू असेल तेथें प्रत्येक मनुष्यानें सकाळीं उठल्यावर व रात्रीं निजतेवेळीं एक औंस ह्म० अर्धे वेनग्लास हें औषध घ्यावें.

एका स्वच्छ व अस्मानी रंगाच्या अगर निळ्या रंगाच्या बाटलींत स्वच्छ व ताजें पाणी भरून व गच्च बूच लावून ती बाटली सकाळीं ८ वाजल्यापासून दोनप्रहरीं बारा वाजेपर्यंत सुर्यकिरणांत ठेवावी ह्मणजे औषध तयार झालें.

२ ज्या कोणास हा ताप आला असेल त्यास हें पाणी वर सांगितलेल्या प्रमाणानें अर्ध्या अर्ध्या तासानें प्यावयास देणें. जसजसा ताप कमी होत जाईल तसतसें मध्यंतरीं जास्त वेळ सोडून औषध देणें. गांठ आली असेल तर चोरकंदिलांत निळ्या रंगाची कांच घालून तो निळा प्रकाश तीन पासून चार तासपर्यंत एकसारखा त्या गांठीवर पाडावा अशा रीतीनें दिवसांतून दोन किंवा तीन वेळां प्रकाश पाडावा. डोकें फार दुखत असेल तर साध्या कंदिलांत निळा कांच घालून तो निळा प्रकाश डोक्यावर डोकें उतरेपर्यंत पाडावा. कंदिलाची सोय नसल्यास डोक्यावर व गांठीवर ह्या तयार केलेल्या पाण्यांत फडके भिजवून ठवावें किंवा नुसत्या निळ्या कांचेचा उजेड दोन तासपर्यंत पाडावा. जर कोणास ह्या तापांत जुलाब होत असेल तर पोटावर याच औषधांत भिजविलेलें फडकें ठेवावें अगर निळ्या कांचेचा उजेड दोन तासपर्यंत पाडावा. पथ्यास तांदुळांची पेज दुधांत शिजविलेली घ्यावी. गांठ पिकून फोडली असल्यास ती जखम धुण्यापुर्वीं तीवर कंदिलांत हिरव्या रंगाची कांच घालून तो हिरवा प्रकाश एक तासभर पाडावा.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........८। ८६
दुसरे खेपेस ............ ८।

Annual in advance 5 Postage as
Annual in arrears 7 „ 1 Rs as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 3
Single copy ............... ......... 3

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 22 FEBRUARY 1897 | NO 8

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९७ इ० | अंक ८

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

---

### नोटीस.

दुरगादास अंबादास मयत तर्फें वहिवाटदार राजमान्य राजश्री राघव रामचंद्र पटवारी राहाणार शिरपूर. यांस

चंद्रभागा मर्दे असरू सुतार राहाणार मौजे नेधानें प्रगणें सिरपूर तालुके व जिल्हे वाशीम इजकडून. नोटीस देण्याचे असें कीं, तुह्मी माझ्या नवऱ्या जवळून तावे गहाणखत दस्ताऐवज रकम रुपये २७५ रास तारीख २० माहे जून सन १८९५ इसवी रोजी करून घेतला असून हल्ली माझा नवरा नामे असरू सुतार हा मयत झाला असून सदरहू मैतानीं मरण समयीं मजजवळ सांगितले होते कीं सिरपूर येथें राहणार पटवारी नामे राघव रामचंद्र यांजजवळ मी आपले नांवची असलेली जमीन मजला दुसरे सावकारांचे देणें आहे सबब द्यावें गहाणखत लिहून दिले असून मजला त्यांचें देणें खानगी नात्यानें ५० एक रुपये निघतील. परंतु दस्ताऐवजा संबंधानें कांहीं देणें नाहीं. दुसरे आतां आड लपलो आहे हल्ली तो मयत असलेमुळें मी मैताची वारस असून तुह्मास कळविते कीं तुह्मी जो दस्ताऐवज करून घेतला असे आणि त्या दस्ताऐवजाचा भरणा कसकसा लेखी दिला आहे व माझे नवऱ्याच्या हातच्या पावत्या तुमचे जवळ काय काय आहेत व तुमचे घरी असलेला जमाखर्च कसकसा आहे हे नोटीस पावल्या पासून एक महिन्यांत नोटीसीनें जबाब द्यावा. जर तुह्मी असे करणार नाहीं तर, या पुढें तुमची कोणतीच तकरार ऐकली न जातां तुह्मी लिहून घेतलेला दस्ताऐवज रद्द केला जाईल व तुह्मास सदरहू नोटीसीनें कळविले आहे. याजकडेस लक्ष न पुरवितां पुढें मागें तुह्मी फिर्याद वगैरे कांहीं कराल तर त्याजबद्दलचे जबाबदार कोणच्याही प्रकारें आह्मी नाहीं. हें तुह्मास कळविले असे. कळावे ही नोटीस दिली. तारीख १५ माहे फेबरवारी सन १८९७ इसवी.

सही
चंद्रभागा मर्दे असरू सुतार
राहाणार मौजे नेधानें
प्रगणें सीरपूर नि०
हातची बांगडी
असें०

---

### नमुना [ जी ]

नादारी मुकदमा नंबर ६ सन १८९७
विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येतें कीं, मलु वा खंडु भेई आकोला ताजनापेट हा नादारी आहे असा आज तारीख १३ माहे २ सन १८९७ इसवी रोजी ठराव झाला आहे आणि तारीख ६ माहे ३ सन १८९७ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकरितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केला पाहिजे.

कोर्टात सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख १५।२।१८९७ इसवी.

| धनकोंचे नांव. | रकम रुपये. |
|---|---|
| १ बिंसनलाल गोंदुलाल राहणार आकोला | २०० |
| २ बालचंद व मोतीलाल वा बनसीलाल राहणार आकोला | २०० |
| ३ सखाराम भगवंत राहणार सिलांड | ११२ |
| ४ लक्ष्मण वा मोतीराम कुंभार मैत वारस बायको तानाइ तर्फे मु. रुखबसा राहणार आकोला. | २०० |
| ५ नानाभाई जिवनजी पारशी राहणार ताजनापेठ आकोला | २५ |
| ६ रावबहादूर मुकुंद बाळकृष्ण बुटी मु० यज्ञेश्वर सदाशिव राहणार आकोला | २५ |
| ७ रामधन मारवाडी राहणार ताजनापेट आकोला. | २०० |
| | ८६२ |

V. N. Dandekar
Judge
Bankruptcy Court
Akoal District

---

### नमुना ( जी )

नादारी मुकदमा नंबर ४ सन १८९७
विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं, दत्तु वा जानजी कुणबी रहाणार शेगांव ता० खामगांव हा नादारी आहे असा आज तारीख १३ माहे २ सन १८९७ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे मार्च सन १८९७ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकारितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केला पाहिजे.

कोर्टात सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खर असल्याबद्दचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख १५।२।९७.

| धनकोचे नांव | रुपये |
|---|---|
| १ खंडू वल्लद कडताजी पाटोल मयत वारसपुत्र भिकू वल्लद खंडू वाती शेगांव तालुके खामगांव. | ४५० |
| २ राधाकिसन रामदयाल मारवाडी मु. मोदीराम मारवाडी राहणार शेगाव तालुके खामगांव. | ११५ |
| ३ इच्छाराम हुलासराय अगरवाला दुकान शेगांव तालुके खामगांव, | ५० |
| | ६१५ |

V. N. Dandekar.
Judge
Bankruptcy Court
Akola.

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ६ शके १८१८

### उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

( रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला. ) नंबर ४

आतां जे शिक्षक सामान्य असतात त्यांस ही दगदग केल्यावांचून गत्यंतर नाहीं. आतां अशा शिक्षकां विषयीं विचार करूं. त्यांचें ज्ञान अपूर्व तऱ्हेचें असल्या कारणानें, ते जे विषय विद्यार्थ्यांस शिकवितात ते विद्यार्थ्यांच्या मनांत जरी ते बेताबातानें बरेच चांगले भरून देतात तरी त्यांच्या शिक्षणाचा ठसा सामान्यच उमटतो; शिवाय तोही सर्व मुलांच्या मनावर सारखाच उमटत नाहीं व कांहीं मुलांस त्यांतलें कांहींच समजत नाहीं; अशा शिक्षकास एकदां शिकविलेली गोष्ट पुनः पुनः शिकवावी लागते किंवा विचारावी लागते, ह्मणजे हा त्यांचा उद्योग कांहीं एक प्रकारच्या ठरीव भाषेंत उत्तर देण्यास मुलांस समर्थ करणें होय.

कारण पुनः पुनः विचारण्यानें मुलांस अधिक समजतें असें नाहीं तर विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर शिक्षकाच्या किंवा अन्य ठरीव शब्दांनीं त्यांस देतां येते. तें त्यांनीं दिलें ह्मणजे त्यांस तो विषय समजला असें शिक्षक समजतात. हा शिकविण्याची गोष्ट झाली. बहुतेक विषय, जे हे शिक्षक शिकवितात त्या बद्दलची त्यांची माहिती जी शिकविण्याचीं पुस्तकें असतात त्यांतील माहितीहून फारशी अधिक नसते. व पुष्कळ वेळां असें घडतें कीं, पुस्तकांतली माहितीही चांगली समजत नाहीं यामुळें अधिक ज्ञानापेक्षां शाब्दिक ज्ञानाचाच

कांम

करावा लागतो. आणि मुलांचें ज्ञानही त्यामुळें शाब्दिकच असतें. जेथें विषय सुलभ असतो ह्मणजे शिक्षकास चांगला समजण्या सारखा असतो तेथें विद्यार्थ्यांसही तो आर्थिक दृष्टीनें बराच समजतो परंतु जो विषय शिक्षकांस चांगला समजला नाहीं तेथें विद्यार्थ्यांचें ज्ञान केवळ शाब्दिक असतें.

विद्यार्थ्यांस जें ज्ञान झालेलें आहे तें परीक्षण कालीं दाखविण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे शब्दद्वारा होय. ज्या विद्यार्थ्यांस खरें ज्ञान झालें आहे तोही तें शब्दद्वारा दाखविणार आणि ज्यास तें झालें नाहीं तोही ते शब्दद्वारा दाखविणार. तोंडी परीक्षेंत यथार्थ ज्ञान झालेला आणि शाब्दिक ज्ञान असलेला विद्यार्थी तावडतोब ओळखतां येतें. पण लेखी परीक्षेंत दोघेही एकरूपच भासतात. कारण दोघांचे शब्द सारखेच पडतात. याला एक उदाहरण घेऊं. "दृढ भाजकाच्या किंवा वर्गमूळाच्या रीतीची उपपत्ति सांगा" ह्मणून विद्यार्थ्यांस लेखी प्रश्न दिला असतां समजलेल्या आणि न समजलेल्या विद्यार्थ्यांचीं उत्तरें सारखींच येणार आहेत. तेव्हां परीक्षकांनीं त्यांस ओळखून काढण्यास काय मार्ग आहे! परीक्षक विद्यार्थ्यांस खरें ज्ञान कितपत झालें आहे हें पाहण्यासाठीं एखादा दुसरा प्रश्न खुबीदार घालील. परंतु तितक्यावर सर्व परीक्षा अवलंबून नसल्यामुळें एक खुबीदार प्रश्नाचें उत्तर देऊन व दुसरा न देतां दोघेही पास होतील. कांहीं परीक्षक शाब्दिक ज्ञानाचा जय होऊं नये ह्मणून तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न काढतात तेणें करून परीक्षेला काठिण्य आणि सदोषत्व येतें. यामुळें नाइलाजास्तव शाब्दिक ज्ञानाचा न्युनाधिक्यें करून जय होणें अपरिहार्य होतें व यामुळेंच सामान्य शिक्षकही मेहनतीनें पुष्कळ मुलें परीक्षेंत पास करूं शकतो. अतएव आपणास असा सिद्धांत काढतां येणार नाहीं कीं ज्याचे पुष्कळ विद्यार्थी परीक्षेंत पास होतात ते उत्तम शिक्षक असलाच पाहिजे; तसेंच उत्तम शिक्षक असला ह्मणजे पुष्कळ विद्यार्थी पास होतील असा ही सिद्धांत काढतां येणार नाहीं. शिक्षणाचें उत्तमत्व किंवा सामान्यत्व पाहण्यास एखादी वेगळीच कसोटी लावली पाहिजे. जसें, खरें ज्ञान पाहण्यासाठीं जे एक दोन खुबीदार प्रश्न विचारावे ह्मणून वर लिहिलें आहे, त्या प्रश्नांचीं उत्तरें जे विद्यार्थी देतील त्यांचा शिक्षक चांगला शिकविणारा असें ह्मणतां येईल. अन्यपक्षींचा सिद्धांत उघडच आहे. परंतु याही पेक्षां तोंडी परीक्षेंत विद्यार्थ्यांची ज्ञानशक्ति कशी आणि किती विकासित झाली आहे हें जसें त्यांच्याशीं भाषण करून ह्मणतां येईल तसें लेखी परीक्षेंत चांगलें समजणार नाहीं. पण पुष्कळ विद्यार्थी पास होणें हीं कांहीं बऱ्या वाईट शिक्षणाची कसोटी नव्हे. पुष्कळ विद्यार्थी पास होणें हा मेहनतीचा परिणामहोय. मग विद्यार्थी स्वतःच्या आस्थेनें व कळकळीनें पुष्कळ मेहनत करीत किंवा शिक्षक त्यांजकडून जबरदस्तीनें मेहनत करून घेओ.

म्याट्रिक्युलेशनच्या पलीकडे जे विद्यार्थी पास होतात ते स्वतःच्या कळकळीनेंच होतात कारण त्यांचे शिक्षक व्याख्यान देण्या पलीकडे त्याची काळजी घेत नाहींत. म्याट्रिक्युलेशनच्या अलीकडे जे विद्यार्थी पास होतात ते पुष्कळ अंशीं शिक्षकांच्या कळकळीनें आणि मेहनतीनें; व जितके जितके खालीं जावें तितकी तितकी मेहनत जास्त लागते.

ती मेहनत ह्मणजे ही कीं जे विद्यार्थ्यांस शिकविलें तें त्यांना कागदा वर ओततां यावें किंवा हजर जबाबानें तोंडीं सांगतां यावें असें तें त्यांच्या कडून तयार करविणें. याकरितां विशेष विद्वत्तेपेक्षां परीक्षेंत मुलांस पास करण्यास शिक्षकांस विशेष मेहनत करावी लागते. ती दोन प्रकारची. एक विद्यार्थ्यांस तीच ती गोष्ट पुनः पुनः विचारून त्यांचें ज्ञान दृढ करणें आणि दुसरें विद्यार्थ्यांस आपल्यासमक्ष अभ्यास करण्यास लावून तें दृढ करून घेणें. शिक्षक उत्तम शिकविणारा असो किंवा सामान्य असो जर तो मेहनती नसेल तर त्याच्यानें पुष्कळ मुलें कधींही पास करवणार नाहींत.

( पुढें चालू )

---

वऱ्हाड प्रांतांत दुष्काळा निमित्त कामें सुरूं करण्या विषयीं प्रयत्न चालला आहे. आमच्या जिल्ह्यांत सहा ठिकाणीं कामें सुरूं झालीं व होत आहेत. ह्या दुष्काळाचे कामावर पुष्कळसे लोक जमत चालले तर हीं कामें पुढें चालू ठेवण्यांत येतील. दुष्काळाचा जोर खरोखर जबरदस्त असेल तर पुष्कळ लोक या कामावर येतील आणि त्या पेक्षां निराळी स्थिती दिसून आली तर हीं कामें बंद ही करण्यांत येतील. चांगल्या दांडग्या पुरुषाला रोजीं २ आणे मिळेल आणि बायकोला १॥ आणा मिळेल. काम खडी फोडणें हें होय. तें दररोज अमूक मापानें मोजलें जाईल. पूर्ण माप भरलें तर पूर्ण रोजी मिळेल. नाहींतर, कामाच्या कमीपणाच्या मानानें रोजी देखील कमी देण्यांत येतील. फोडलेली खडी दररोजच्या भरपूर मजूरी इतकी भरण्यासाठीं एका भक्कम माणसाला सपाटून काम केलें पाहिजे. रविवारची सुटी देण्यांत येऊन त्या दिवशीचा रोजमुरा फुकट दिला जात असतो. सरकारी कामें दुष्काळग्रस्ताला मरणहारक असतात. अगोदर रोजी हलकी; खडी फोडण्याचें काम जन्मांतरीं देखील केलें नसेल तर तें नव्यानें करावें लागतें. अगांत शक्ती नसते आणि काम तर भरपूर होत नाहीं. दुसरा हुन्नर माहित असूनही तो कवडीमोल होतो. मुंबई कडील दुष्काळाच्या कामाच्या हकीकती वरून आमची तर खात्री होऊन चुकली आहे कीं दुष्काळाचीं कामें ह्मणजे मृत्यूचीं दरवाजें दिसतात. आमच्या प्रांतस्थ लोकांस हा दुष्काळाचा अनुभव पाहिलाच असल्यामुळें यंदाचें साल परमेश्वर कसें पार पाडील तें खरें!

---

उमरावतीसच १३ वी राष्ट्रीय सभा भरावी असा बहुमतानें संकल्प ठरल्या दिवसा पासून आपापल्या हिशाची वर्गणी जमविण्या संबंधानें जिल्हा जिल्ह्यांतून विचार चालले आहेत. वऱ्हाडच्या मंडळीवर वर्गणीचा मारा दुहेरी आहे. प्रांतांत सध्यां दुष्काळ फैलावला आहे आणि या बिकट सकंटांतूनच राष्ट्रीय सभेच्या वर्गणीचा दरवाजा आज खुला करावयाचा आहे. राष्ट्रभक्त जनसमूहाच्या मनांत राष्ट्रीय सभे विषयीं कळकळ व आस्था उत्पन्न करीत आहेत आणि दुष्काळांतही राष्ट्रीयसेवा न विसरता ती यथाशक्ती बजावण्याचें महत्तर काम तें दृढ निश्चयांनीं व निग्रहानें सिद्धीस नेत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय. लवकरच जिल्ह्यानिहाय कमिट्या स्थापन होऊन मोठ्या जोरानें वर्गणी जमविण्याच्या कार्यास आरंभ होईल असें वाटतें.

---

तेराव्या राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटी कडून नंबर २ चा सरक्युलर हुकूम अकोला जिल्ह्यांतील लोकांस आला आहे. त्यांत रा० रा० रंगनाथ नृसिंह मुधोळकर आणि ब० ह० करंदीकर यांनीं कळविलें आहे कीं राष्ट्रीय सभेच्या खर्चाला फंड उभारण्या साठीं निरनिराळ्या जिल्ह्याची मंडळी नेमण्यांत यावी आणि दर आठवड्यांस सभा भरवून राष्ट्रीय सभेच्या कामाची चळवळ सारखी चालू ठवावी. एप्रिल महिन्या पर्यंत सर्व वर्गणी गोळा झाली पाहिजे आणि ती लवकर वसूल केली तर बरें; नाहीं तर, दुष्काळामुळें लोक अधीक हलाखींत व पेंचात येऊन वर्गणी देण्यास तत्पर राहणार नाहींत. गांवोगांव राष्ट्रीय सभेच्या माहितीची छोटीं छोटीं पुस्तकें वांटण्यांत यावीं ह्मणजे राष्ट्रीय सभा अधीक लोकप्रिय होईल.

चालू सालच्या राष्ट्रीय सभेचा खर्च आणि ब्रिटिश कमिटीला गेल्या पांच वर्षांची व पुढील पांच वर्षांची द्यावयाची वर्गणी या दोन्ही बाबी निमित्त जिल्हा निहाय वर्गणीची फाळणी केली आहे तथापि ती रक्कम वसूल होऊन अधिक रक्कम वसूल होईल तितकी थोडीच आहे. जिल्ह्यांतील मुख्य मुख्य गांवीं सभा भरवाव्या, आपल्या इष्टमित्रांच्या व इतर कळकळवाल्यांच्या यादी कराव्या आणि पद्धतशीर वर्गणी जमवावी इत्यादि गोष्टी खुलासेवार कळविण्याची मोठी तसदी या सरक्युलरांत घेतली आहे. उपदेशाच्या दृष्टीनें विचार चांगले सूचविले आहे.

पुढील मार्च महिन्यांत जी स्वागत मंडळी नेमली जाणार आहे तिचे सभासद होण्यास दोन गुण लागतात. पहिला गुण ह्मणजे ५० रुपये वर्गणी होय. दुसरा गुण ह्मणजे एवढ्या वर्गणीच्या अभावीं राष्ट्र सेवेची महदुत्कंठा होय. निव्वळ दुसऱ्या गुणानें मंडित अशा थोर मूर्ती जिल्हानिहाय खालील प्रमाणांत घेण्याचा विचार ठरला आहे:—

| जिल्हा | संख्या |
|---|---|
| आकोला | १२ |
| उमरावती | १६ |
| यवतमाळ | ४ किंवा ६ |
| बाशीम | ,, ,, |
| बुलडाणा | ,, ,, |

---

मुंबईच्या विषारी तापानें अनर्थ उसळून दिला आहे! लोकांच्या ऐकण्यांत व पाहण्यांत नाहीं असा हा अपूर्व विषारी ताप आहे. याला बळाचा ताप त्याच्या चिन्हा वरून ह्मणतात. या तापाची चिकित्सा नीटशी कोणत्याच वैद्यशास्त्रांत नाहीं.

इतर राष्ट्रांत याचा उपद्रव झाला होता आणि तेव्हां तेव्हां मनुष्यें पुष्कळ मेलीं असें कळतें. परंतु सध्याचे तापाचें उग्र घातुक स्वरूप आमच्या वाचण्यांत हि कधीं आलें नव्हतें. मुंबईस आजपर्यंत सरासरी या तापामुळें १४ हजारावर मनुष्यें मेली असा कागदी आंकडा आहे. रोजच्या रोज हजारो लोक मुंबई सोडून चालले आहेत. मुंबई सारखें गजबजलें शहर ओसाड पडत चाललें आहे! या विषारी तापाचा फैलाव मुंबईच्या आसपासच्या शहरीं व गांवोगांवी आहे. पुण्यासही या तापाचें ठाणें जबरदस्त बसलें आहे. आणि इतरत्र या तापानें आपलें साम्राज्य जाहीर करण्याचा झेंडा खडा लाविला आहे.

हें संवत्सर दुर्मुखनाम यथार्थ आहे दुष्काळाच्या आगीला तापानें मोठीच मदत केली आहे. इतर राष्ट्रांशीं व्यापार बंद होत चालले. इंडियाचीं माणसें व माल समागमें हा रोग आणितील या दहशतीनें या देशाहून निघणाऱ्या आगबोटी इतर राष्ट्रें आपापल्या बंदरांत घेण्यास मोठ्या अडचणी सांगतात. रोगबीज अगदीं नाहीं अशी शहानिशा होईपर्यंत आगबोटींस परराष्ट्रांचीं बंदरें खुलीं नाहींत. परराष्ट्राची कथा काय पण आमच्या देशांतल्या देशांतच या तापानें पादाक्रांत भूमीचें माणूस, माल, किंवा वारें अन्यत्र फिरकूं नये ह्मणजे त्यांच्या द्वारानें तापाचा संसर्ग होऊं नये ह्मणून रेलवेच्या जेंक्शन स्टेशनावर उतारूंची परीक्षा घेऊन नंतर त्यांस अन्यत्र जाऊं देतात. या तापानें आजारी किंवा या तापाचा संसर्ग लागलेल्या उतारूंस निराळ्या इस्पितळांत बरें होई पर्यंत रोखून ठेवण्या विषयीं हुकूम फर्माविले आहेत. कायदे कौंसिलांत या तापासंबधानें निराळा संसर्गजन्य रोगा विषयीं कायदा केला आहे आणि त्याच्या आधारें या विषारी तापाचा संसर्ग अन्यत्र न लागेल अशी सर्व राष्ट्रभर व्यवस्था चालू आहे.

---

दुष्काळाचीं कामें आकोला जिल्ह्यांत सुरूं झालीं आहेत. पण तीं अगदीं लहान वाटतात कांकी लोकांचे थवेच्या थवे येतात आणि मजुरी मिळत नाहीं ह्मणून परत निराशेनें जातात. खडी फोडण्याचें कठीण काम पुरवलें पण तें तरी सर्व लोकांस कसें मिळेल याची भ्रांती पडली आहे. लोक अन्नान्न दशेला पोंचले आहेत. जिकडून पोटाला मिळेल आणि जीव बाचेल तो धंदा ते करण्यास तयार आहेत. सहा ठिकाणीं जिल्हा बोर्डाचीं कामें चालू आहेत पण प्रत्येक ठिकाणीं ५००।६०० मजूरांस काम आहे मजूरदारांची संख्या मोठी आहे. पब्लिक वर्कस खात्याकडून दोन कामें नवीन आजपासून सुरू होणार आहेत. तेल्हारा--अरसूड रस्ता करण्याचें पहिलें काम होय. यावर सरासरी १५०० लोक मजुरीला लागतील. दुसरें काम एरंडा तळ्याचें आहे. त्यावर हजार एक लोक पोटच्या धंद्याला लागतील. सर्व कामें मिळून पांच सहा हजार लोकांचा निभाव लागेल. पण एवढ्यांत कांहींच मोठ भागत नाहीं. मोठमोठीं कामें निघालीं पाहिजेत आणि तीं सुरूं झालीं तरच लोक जगतील. प्रसंग मोठा कठीण ओढवत आहे! मजूरदार लोकांच्या तोंडाकडे पहावत नाहीं. हातां पायांच्या काड्या होत चालल्या आहेत आणि इतर अवयवांच्या त्यामुळें स्थूलपणा विशेष भासतो व हाडांचा पिंजरा

झोंकयांतून पाणी पाडलो, जेव्हा तो दिवस सोन्याचा असे पदोपदीं वाटते. भविष्य काळाच मनांत नाना तऱ्हेचे उठविती आणि मनुष्य वेडा बावरा होऊन ईश्वरावर हवाला सोपवूं लागतो.

सरकाराने काना डोळा करूं नये. उद्धार हात लोकां पुढें करावा. राजनिष्ठा व लोकप्रेम हीं पक्कीं चिरस्थाई करण्यास अशा संकटवेळाच उपयोगी पडतात सरकारची हल्लीं परीक्षाच आहे. तसेच श्रीमान लो[illegible] कांहीं अन्नदानाचें श्रेय [illegible] विसरूं नये. श्रीमान ह्मणजे ज्याला दुःखाला भा[illegible]करीचा तुकडा देववेल तो होय उपकृतीचा संचय करण्यास बहुत जणांस संधि आहे हे या वाक्यांवरून कळेल. उपकृतीचें पुण्य व महिमा हीं दोन्ही [illegible] श्रीमंती [illegible] अशा प्रत्येक धर्म सांगतो तर या [illegible] [illegible] उपासना या काळीं व खरी चांगली होईल आणि जो तो आपली माणुसकी ईश्वराला स्मरून दाखवील असें आ[illegible] इच्छितो.

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 22 1897

In the last fortnight relief works are opened in this district and people are flocking in numbers at these. This is a clear index of the fact that masses of people are being reduced to the lowest straits of poverty. If scarcity means insufficiency of food to maintain health we presume that the strain of this normal distress is felt in all its acuteness to many a family to the total amount of more than 90 per cent of families in each city or minor locality. Scarcity is almost universal and most intense in the whole of this province. Farther more, this sad and stern scarcity has developed into a regular famine in certain portions. Famine is a higher stage of scarcity. It means no longer a question of a satisfactory bill of health but it interprets a question of life and death. When the pressure of food-prices becomes high and the in—sufficiency of food becomes wide and general we feel it difficult to sustain life any how. Let people outlive the ravages of famine: this becomes the goal of all actions of the Government. It is patent to our mind that the lower masses in our society are indeed driven to this extreme struggle for bread. They have begun to feel the dire pangs of hunger. To such people relief-works afford the ways to escape the clutches of death.

Our officiating Deputy Commissioner, Mr. F. W. A. Prideaux, is new to the work and a duty of the most heavy responsibility—the duty of sustaining the lives of the people in his district—has fallen to his shoulders. We are however glad to observe that he is well up to the mark. He is bold and prompt and, we hope, very large—hearted and con—scientious. He has apprehended from the first the worst necessities of a famine. If we remember aright he called up some months before, a public meeting of influential and wealthy people of Akola. He presided at the assembly and awakened people to their sense of duty towards their fellow—men. We cannot make out how he remained for a few months a forward unmindful of what he has to face in the distress of the people. But it is a pleasure to note that, though rather a little too late, relief works of a minor nature are at last commenced in this district and we hope that they will soon be supplemented by large and com—prehensive works to afford a wide field for unemployed labour.

A 'Poor—house' is the next want of the day. The need of such a house is felt a long time since. People will welcome the institution of a charity house for food and clothing to the really destitute and helpless amidst the suffering humanity. Suspension and remission of the land—revenue is the third thing to secure land in the hands of the (the present) poor helpless holders. We are sure that pressure is not brought against the kunbi who stands on the brink of starvation and so of utter ruin if he has to part with his field. There is no more sustaining power in him. We hope that a free helping hand be offered to the ryots in the affair of collecting land—revenue.

The efforts of Mr. Prideaux are great and praiseworthy. This district is active in regard to the relief of the famine—striken people, But the present works are found insufficient. They cannot afford to engage the large numbers of men, women and children that throng at the different centers. Funds assigned for them are very small and hundreds of people are told to walk off because there is not so much a demand for their labour. The short allotments are almost [illegible], Mr. Prideaux finds it a hard battle to fight when he has to make the higher authorities realize the miseries of famine that have befallen the masses at large. We learn that the Public Works Department is going to undertake from today two relief—works. One is the Telhara—Arsud road and the other is the excavations in the Erranda—tank. A third one is to divert the current of the floods of the Shahanur river into the bed of the Purna. These works will at the most accommodate some five or six thousand people. But the demand for Relief—works is a greater one and unless the Government come promptly to the front and afford a signal aid in this direction we can not guess what will happen tomorrow. We have however full faith and confidence in the benevolence of our British Government and hope to thrive well in the face of the famine.

The water-supply of Akola is in—adequate to the wants of the people. The Kapsi—water-works are sure to fail in the hot season or at least towards the middle of it. The supply of the Morna—water is as well uncared-for. Even the present ways of distributing water through pipes are as bad as any thing. The supply is short and its distribution most unsatisfactory. We hope that improvements will at least be effected in regard to the distribution of the Kapsi—water and the management of the river—water.

## बऱ्हाड

हवामान— ऊन अती तापतें. हवेंत आर्द्रता नाहीं. रुक्षता दिवसानुदिवस वाढत आहे. पाण्याचा तोटा पुष्कळ ठिकाणीं आहे. सामान्यतः लोकांचें आरोग्य चांगलें आहे. बाजारभावाच्या तेजी मुळें लोक हलाखींत आहेत.

रा. रा. नारायण राघराव मुळे क्लार्क आफ कोर्ट वाशिम यांची बदली बुलढाण्यास होऊन त्यांच्या जागीं वाशिमास मि० सैफुद्दी नखान क्लार्क आफ कोर्ट बुलढाणा यांस बदलल्या विषयीं कळतें.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत मुळे बी. ए. एक्स्ट्रा असि० कमिशनर हे बुलढाण्याहून मोर्शीस जाण्यासाठीं रवाना झाले.

पुढील महिन्यांच्या आठवे तारखेस लोअर व हायर परीक्षा उमरावतीस सुरू होणार आहेत

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. रावजी घनश्याम वकिल यांस वार्धक्यांतील जीर्ण ज्वरामुळें देवाज्ञा झाली. मरण समयीं त्यांचें वय ६०।६५ असावें. त्यांच्या प्रेतयात्रे साठीं आप्त मित्र पुष्कळ जमले होते. हे गृहस्थ फार शांत, धार्मिक, व मनमिळाऊ होते. त्यांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव हणमंतराव [illegible] वडिलांची [illegible] चालवितील अशी आह्मास उमेद आहे.

शेगांव येथील बजाई नांवाच्या राक्षसीनें थोरल्याचें [illegible] प्रतिहत्या केली आणि हें [illegible] तिचा व्यभिचारी [illegible] चांगो यानें दिलें होतें. उभयतांस यमसदनास पाठविण्याविषयीं सेशनांत हुकूम झाला.

जळगांवच्या १० महारांनीं मारहाण करून [illegible] करणे चोरली होतीं त्यांस गेल्या सेशनांत पुष्कळ वर्षांच्या शिक्षा झाल्या.

वावनबीर येथील [illegible] नांवाच्या लेकरवाळ्या बाईनें चार पांच रुपयांच्या दागिन्या करितां सुमाऱ्याच्या पांच वर्षांच्या लेकरास विहिरींत ढकलून खून केला होता ह्मणून तिला फांशीची शिक्षा झाली.

[illegible] सालवारी आकोला जिल्ह्याच्या अपकारीचा लिलाव झाला तो असा:—

| [illegible] | [illegible] | रक्कम |
|---|---|---|
| | रा० रा० | |
| शिंदी | [illegible] पेस्तमजी | ८६५० |
| अफू | [illegible] हुडेट | ५४००० |
| गांजा | [illegible] | ४७०० |

[illegible] भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| [illegible] | ८६ रुपये |
| जवारी | ९६ रु० |
| गहूं ( [illegible] ) | १२४ रु० |
| „ ( [illegible] ) | १३० रु० |
| चणे | १०५ रु० |
| तेल | [illegible] रु० [illegible] |
| तूप | [illegible] मण |
| [illegible] | [illegible] तोळा |
| [illegible] | [illegible] |

### नोटीस

रा० [illegible] कुकाजी [illegible] हांडेळे [illegible] आकोलें

खालीं सही करणार [illegible] नोटीस देण्यांत येते कीं सुमारा तारीख २१।१।९६ [illegible] रोजीं तुमचे नांवे खर्ड्याचा हिस्सा आह्मास खरेदी दिला ते दिवशीं खरेदीखतांत लिहून दिले कीं नांवे खातें करून देतो तर तुह्मी खाते नांवे करून देत नाहीं व तेच दिवशीं तुह्मी तुमचा हिस्सा विकत घेतला त्याजवर आमचा आग्रकयीचा हक्क आहे कीं तुह्मी दिलेले रुपये घेऊन दुसरा हिस्सा मला द्यावा व मी विकत घेतलेला हिस्सा तुह्मास एकवर्षं पर्यांनीं दिले ते रुपये आह्मी मागण्यास आलो तर दिलें नाहीं आणि आह्मी ह्मटलें कीं हालसाल लोक मागतात तर त्या प्रमाणे तुह्मी वहितीस घेता काय तर तुह्मी ह्मटले नाहीं नावले प्रमाणें चाल तर आह्मी आमचे शेंत दुसऱ्यास वहितीस देतो. सदर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं शेताचे खाते माझे नांवे करून या आठ दिवसांचें आंत यावें नाहीं तर खर्च लागेल तो तुह्मास द्यावा लागेल व आग्रक्रियेच्या हक्काची मी फिर्याद करून हिस्सा घेतला जाईल त्यास खर्च लागेल तो तुह्मास द्यावा लागेल व आमचे नफ्याचे रुपये कोर्टखर्चसुद्धां द्यावे लागतील मिती माघ वद्य ९ तारीख १९।२।९७ इसवी.

सही

रामचंद्र भवानी सोनार आकोले

### नमुना ( जी )

नादारी मुकदमा नंबर ५ सन १८९७ [illegible] नादारी कोर्ट [illegible] जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं, सिताराम [illegible] जयराम पाटील वस्ती सिवपूर ता० अकोला हा नादारी आहे असा आज तारीख १३ माहे २ सन १८९७ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे मार्च सन १८९७ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकरितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या तारखेंत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें सपूर्द करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केला पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करिता नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास सावकारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून आणि व ते दावे खरे असल्याबद्दल प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यदी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख १५।२।९७.

| | धनकोचें नांव | रुपये |
|---|---|---|
| 1 | चंद्रभान अर्जुनदास मारवाडी राहाणार कान्हेरी ता० अकोले | ३०० |
| २ | धर्माजी वा॥ कल्याणजी वस्ती सिवपूर तालुके अकोला. | २०० |
| ३ | एको वा॥ दतु पाटील सिवपूर | ७५ |
| | | ५७५ |

V. N. Dandekar
Judge
Bankruptcy Court
Akola

## वर्तमानसार.

[illegible] क्रीट बेटातल्या दंगेखोरानीं एक जाहिरनामा प्रसिध्द करून आ[illegible] ही व ग्रीस एक आहों असें प्रसिध्द के[illegible] आहे.

ग्रीकच्या सगळ्या फौजेस तयार असण्याचा हुकूम झाला आहे.

सगळे ख्रिस्ती कानिया ठिकाण सोडून चालते झाले व मुसलमानांनीं त्या ठिकाणचा कबजा हातांत घेतला आहे.

लॉर्ड सालिसबरी ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रांजलपणें कबूल केलें आहे कीं, इंग्रज सरकारांनीं क्रीमियाच्या लढाईमध्यें केलेला अवाढव्य खर्च केवळ चूकीचा होता. रशियाच्या सैन्यांनीं १८७८ मध्यें बल्गेरिया आणि आर्मीनीयामध्यें तुर्कस्थानचे राज्याची पायमल्ली करण्याच्या बेळेस तुर्कस्थानच्या संरक्षणार्थ बेसिका उपसागरामध्यें नें अरमार पाठविण्यांत आलें होतें त्या वेळेस ही चूक पुन्हा झाली होती. खरोखर, कै. लार्ड बीकन्सफील्ड यानीं हे शद्ब ऐकले असते तर त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें असतें यांत संशय नाहीं. अशीच चूक वारंवार व पुनः होईल किंवा नाहीं ही मोठी शंकाच आहे. तुर्कस्थानचा स्वतंत्रपणा संरक्षण करण्याकरितां आश्रय देण्याचें एकीकडे झुगारून ते गेल्या वर्षा पासून रशिया आणि टर्की मध्यें झालेल्या दुफळीकडे औदासिन्य दार्खवीत आहेत, व रशियांनीं कॉन्स्टान्टिनोपल घेतलें तरी हरकत नाहीं असें ह्मणत आहेत. सर चार्ल्स डिल्के बेधडकपणानें दर्शवितात कीं तुरकस्थानमध्यें चीन व रशियाचा या प्रमाणें जोर वाढू दिल्यास थोड्या वर्षांत तो इतका बलाढ्य होईल आणि त्याचें राज्य ब्रिटिश राज्याच्या इतकें जवळ येईल कीं तो आपल्यास आटोपेल किंवा नाहीं ही मोठी शंका आहे. रशिया आणि फ्रान्स यांच्या एकीकडे पण लक्ष दिलें पाहिजे. फ्रान्साला हात लावला कीं इकडे रशिया तयार आहेच. अशा स्थितींत ईजिप्ताच्या संबंधानें फ्रान्सा बरोबर मतभेद करणें ही राजनीति मोठी चुकीची होईल.

कलकत्यांतील हेल्थ आफिसचे दाक्तर सिंपसन यांनीं तेथील म्युनिसिपल बोर्डाला एक पत्र पाठविलें आहे. त्यांत ते लिहितात कीं, मरकीच्या उत्पत्तीचें मुख्य ठिकाण धान्याचें कोठार होय. व या बाबतींत मुंबईचे दाक्तर वार्टस यांचेंही हेंच मत आहे. धान्याचे कोठार हें उंदरांचें आदिस्थान होय अर्थात मरकीचें बीज उंदरांपासून त्या धान्यांत उत्पन्न होतें व तें धान्य जेथें जेथें जातें तेथें ही मरकी उत्पन्न होते. याच्या प्रत्यंतरांस असें एक उदाहरण घडून आलें आहे कीं कलकत्यांतील बडा बाजारांतील एका धान्याचें दुकानांत पुष्कळ उंदीर मरूं लागले ह्मणून त्याचा तपास करतां त्या उंदरांस मरकीच्या गांठीं असल्योंच दिसून आलें. तेव्हां तेथील सर्व दुकानांतील धान्य काढून साफ केलें व त्या भागांतील सर्व लोकांस दुसरीकडे जाऊन राहण्यास सांगितलें यामुळें ह्या मरकीचा तावडतोब बीमोड झाला. ह्या संबंधांत त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, ज्या भागांत मरकी होईल तेथील धान्याचीं दुकानें तावडतोब दुसरीकडे चांगल्या ठिकाणीं नेणें हा एक प्रकीचा प्रतिबंध होण्यास चांगला उपाय आहे.

सेंट जॉर्ज हास्पिटलमध्यें हल्लीं मरकीनें पिडलेले १९ यूरोपियन आहेत.

कंदहारमध्यें ग्रंथिक ताप असल्याची माहिती मिळाल्य मुळें रशियांनीं आपलें सैन्य बोखाऱ्याकडे ठेविलें आहे असें ताश्कंदच्या [illegible] कळतें.

हाजाज बंदरांत मरकी उत्पन्न झाल्यास तेथील हाजी लोकांस इजिप्तांत येऊं द्यावयाचें नाहीं, व इजिप्तमधील हाजी लोकांस मक्केस जाऊं द्यावयाचें नाहीं असा तेथील सरकारांनीं ठराव केला आहे.

सिटी ऑफ आग्रा नांवाची आगबोट लंडनहून कलकत्यास जात असतां ता० ९ रोजी पेनेशियाचे आखातांत तिचा नाश झाला. १ कप्तान ३२ खलाशी व २ उतारू इतके मात्र जिवंत आले आहेत व बाकीचे ४१ खलाशी आणि सर्व उतारूंचा अद्याप ठिकाण नाहीं. स. वि.

टेस्ला नांवाचा अमेरिकन विद्युच्छास्त्री आहे. त्याचा उपदेश मोठा बहारीचा आहे. तो ह्मणतो, "तुह्मांला पुष्कळ दिवस जगावयाचें असेल, तर सांपडेल तेवढी झोंप घ्या. अगदीं जागें राहिलेंच पाहिजे, जागें राहणें इष्ट व अवश्य आहे, असाच जितका वेळ असेल तितका वर्ज करून बाकी सांपडेल तशी, सांपडेल तेव्हां सापडले तिथें झोंप घ्या. प्रत्येक मनुष्यास आपल्या एकंदर आयुष्यांत कांहीं नियमित तास जागणें भाग आहे. ते तास जितके कमी खर्च पडतील तितके पाडले, तर मनुष्य अर्थातच तितके दिवस अधिक जगणार. दिवसांतला बहुतेक वेळ झोंपेंतच घालविला, तर मनुष्य दीडिशें वर्षेपर्यंत सुद्धां जगेल? सिद्धी लोकांत पुष्कळ वर्षेपर्यंत जगलेले लोक सांपडतात, त्याचें कारण हेच. ते होईल तितकी झोंप घेतात?" टेस्ला साहेबांचा हा उपदेश ह्मणजे आळशी लोकांचें शुभवर्तमानच ह्मणावयाचें! झोंप घेऊनच दीडशें वर्षें जगावयाचें तर 'खायला काळ आणि भुईला भार' असें वें जगणें तरी कशाला? काय दगडाच्या राशी आणि डकिर्डे थोडे आहेत! यापेक्षां एडिसन साहेबांचा उपदेश कीं मनुष्यास झोंपेची मुळींच आवश्यकता नाहीं. ती जितकी थोडी घ्यावी तितकी चांगली—किती तरी हितावह! झोंपा घेऊन दीडशें वर्षें जगण्यापेक्षां जागून कांहीं काम करून पाऊणशें वर्षें जगलेलें किती तरी चांगलें! क० म०

मुंबईची प्रांतिकसभा सातान्यास तारीख १९।४।९७ पासून भरावयाचें व अध्यक्षस्थान ना. धरमसी यांस देण्याचें ठरलें आहे.

गेल्या ५० वर्षांत नव्हता इतका कराचीस हल्लीं गारठा आहे.

नेटीव कितीही चांगला असला तरी आंग्लो-इंडियनांस तो खपत नाहीं आणि कधीं कधीं तो त्यांच्या तोडीच्या अधिकाराला पोंचला तर त्यांस तें वैषम्य वाटतें. हल्लीं मद्रासेस आंग्लो-इंडियनांनीं कल्लोळ उसळला आहे कीं नामदार भाष्यं आयंगर यांस आडव्होकेट जनरलची तूर्त कच्ची जागा दिली आहे ती सर हावलाक गव्हरनर यांच्या हुकूमाला झुगारून स्टेट सेक्रेटरी यांनीं काढून घ्यावी आणि तीच एखाद्या गोऱ्या बारिस्टरांस द्यावी. ही ओरडच आंग्लो-इंडियन राज्यकारस्थानास काळिमा आणिते.

लंडन शहरासभोंवती तटबंदी करण्याचें करून त्याकरतां साडे पांच कोट कर्ज काढण्याचें त्या सरकारानें ठरविलें आहे. हें दुष्ट स्वप्न कां!

महाराज गाईकवाड यांजकडून शिंदे सरकारास ९२ सणंगी व दरोबरच्या मंडळीस ९ सणंगी पोषाख देण्यांत आला.

काबुलास रुपयांचें पीठ बारा शेर मिळतें.

झांझीबार येथील सुलतान फार आजारी आहेत.

कोल्हापुरास पटकीचा आजार बराच पसरला आहे.

श्रीनगर येथें पाऊस पडत आहे. जेलम नदीस बरेंच पाणी आलें आहे.

हैद्राबादेहून नबाब सरवारजंग ह्यांचा उठावा झाल्या कारणानें दुसरे पुष्कळ फेरफार होऊन लवकरच सर अस्मान जहा हे पुन्हां मुख्य प्रधान होतील असें ह्मणतात.

१९०० सालीं पॅरिस येथें भरणाऱ्या सर्व राष्ट्रीय प्रदर्शनास ५०,००० मार्क वर्गणी देण्याचें जर्मन पार्लमेंटच्या बजेट-कमिटीनें तूर्त ठरविलें आहे.

यंदा मलबारप्रांतीं मोपल्यांचें बंड होईल अशी पुन्हां भीति वाटूं लागल्यावरून अधिकाऱ्यांनीं असा कडक बंदोबस्त ठेविला आहे कीं, दंगेखोर मोपले बाहेर पडल्याबरोबर सरकारचे पोलीस किंवा लष्करी लोक चारपांच तासांचे आंत त्यांच्या पाठीस लागतील! क्विनाईन विड्याबरोबर घेतलें असतां त्याचा कडूपणा बिलकूल जिभेला लागत नसून, त्याचा ज्वरावर उत्तम परिणाम होण्यास कोणत्याही प्रकारची हरकत येत नाहीं. दहा ग्रेनपर्यंत क्विनाईन विड्यांत घेतलें तरी त्याचा कडूपणा मुळींच लागत नाहीं. अंमत गुणकारी औषधें असुन तीं त्यांच्या अत्यंत कटुतेनें किंवा उग्रवासानें घेण्यालां आनंद वाटत नाहीं, त्यावर असल्या कांहींतरी योजना होणें अवश्य आहेत. कोणलही क्विनाईन घेणें असल्यास तें विड्याबरोबर घ्यावें ह्मणजे झालें; आणि ही योजना अगदीं सोपी व सुसाध्य आहे.

पुणें—आकाश स्वच्छ असून एकंदर हवामान बरें आहे. परंतु सांथीचा उपद्रव दररोज अधिकाधिक अनुभवास येत आहे.

होडगी येथें ब्युबानिक तापानें ६।६ मनुष्यें मेलीं. त्यापैकीं दोन इसम मुंबईहून आलेले होते. शु० सू०

लंडन येथें लार्ड नार्थब्रुक यांची रायल-कामिशनपुढें समक्ष झाली. तींत ते ह्मणाले कीं मिसर देशाची लढाई अबिसीनियाची लढाई, व सावकिमला पाठविलेली मोहीम या सर्वांचा खर्च हिंदुस्थानावर अन्यायानें लादण्यांत आला आहे व आतां तरी त्याबद्दल त्यांचा कांहीं न्याय मिळणें इष्ट आहे. साहेब योग्य तेच बोलले!

लंडन येथें हाउस ऑफ कामन्समध्यें बायकांना मतें देण्याचा अधिकार असावा या बद्दलच्या बिलाचा विचार होऊन त्या बिलाचें २ रें वाचन आटपलें. बिलाला अनूकूल २२८ मतें पडून विरुद्ध १५७ पडलीं. सत्याचा नेहमीं जयच होणार! दे० से०

आज हिंदुस्थानांत दुष्काळ कामावर २४,६७,००० लोक आहेत. यांत दुष्काळ कामावर काम करणार १९,९८,००० असून बाकी ४,६८,००० फुकट खाणारे आहेत.

आह्मी इंग्रजापासून कर्ज घेणें कायदेशीर आहे व त्यामुळें तुमच्या अधिकारास कांहीं व्यत्यय येत नाहीं असा इजिप्त सरकारानें फ्रान्स व रशिया यांस जबाब दिला.

सर हिकबिच यांच्या या भाषणावरून फ्रेंच पत्रें अगदीं चवताळून गेलीं आहेत तीं ह्मणतात कीं इंग्रजाच हें ह्मणणें फ्रान्स व रशिया यांस उघडपणें फसविणें आहे.

चालू वर्षाच्या अखेरीच्या आंत इजिप्तचें राज्य इंग्रजांचें मांडलीक होईल असें एका फ्रेंच पत्राचें अनुमान आहे.

सर हिकबीच्या या ह्मणण्यावरून रशिय नपत्रें अगदीं खवळलीं आहेत आणि इजिप्त देश इंग्रजांच्या हातांत कायमचा जाण्यापूर्वीं फ्रांसाच्या मदतीनें शेवटचा उपाय करणें अवश्य आहे असें ह्मणत आहेत.

फ्रेंच सरकार आपले हक्क व अधिकार कमी करून घेण्यास तयार नाहीं असें फ्रेंच प्रधानाचें ह्मणणें आहे.

१,३८,८२१ बुशेल गहूं व इतर धान्याचीं ६,००० पोतीं इतकें अमेरिकेंतलें धान्य घेऊन एक गलबत गेल्या गुरुवारीं मुंबईस दाखल झालें व दुसरें एकही लवकरच येणार आहे. आतां आह्मांस अमेरिकन गहूं खावयास मिळतील.

सर्व मुसलमानांनीं हत्यार घेऊन राजवाड्यांतल्या अंदाधुंदीचा कत्तल करण्यास तयार रहावें असे टर्कीच्या राज्यांतल्या तरुणांनीं जाहिरनामे लाविले आहेत.

टर्कीच्या राज्यांतल्या इटलियन लोकांस ट्रेबिझोंड येथें वालवून दिलें त्यामुळें टर्कीच्या दरबारच्या इटलीच्या वकिलानें टर्की सरकारास असें कळविलें आहे कीं, त्या लोकांस सोडून द्यावें नाहीं तर त्यांस सोडविण्याकरितां इटलीचें आरमार तेथें जाईल.

कलकत्यास मागच्या आठवड्यांत ११ लाख मण तांदूळ शिल्लक होते त्याच्या बदला आज १३ लाख मण आहेत.

कंदाहार येथें मुंबईच्या तापाची सांथ सुरूं झाल्याचें ऐकून रशियानें बुखाऱ्या-सरहद्दीवर बंदोबस्त केला.

ग्रीस देशांत मोठी चळवळ सुरूं होऊन ग्रीस सरकारानें आपल्या ४ लढाऊ गलबतांस कानियावर चाल करून जाण्याचा हुकूम केला.

इंग्रज, फ्रेंच व इटाली यांच्या गलबतांवरचे सेलर कानिया येथें हल्लीं पहारा करीत आहेत.

सर्व ख्रिस्ती कुटुंबें परकीय राजांच्या आरमारांवर जाऊन राहिलीं आहे.

बेटांतले सगळे लोक बंडावा करण्यास प्रवर्तक होण्याचा रंग आहे.

ग्रीकची लढाऊ गलबतें कानिया येथें येऊन दाखल झालीं पण लोक जास्त चवताळतील या सबबीवर टर्कीच्या बावड्यास सलामी दिली नाहीं.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.